

# अयोध्याकांड

आदिकवी

श्री वाल्मिकी

विरचित


मूळ संस्कृत

# रामायण

## ८

मराठी श्लोक

श्री. श्याम कुलकर्णी



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# -श्रीवाल्मिकी रामायण-

## खंड ८- अयोध्याकांड

**मूळ संस्कृत व मराठी श्लोकमय अनुवाद-श्री.श्याम कुलकर्णी**

# -श्रीवाल्मिकी रामायण – खंड ८

## मराठी समश्लोकी अनुवाद : श्री. श्याम कुलकर्णी

पत्ता : द्वाराश्री. जयवंत कुलकर्णी, ”गन्धार” फ़्लॅटक्र. ५/४
आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे४११०२९
संपर्क – व्हॉट्सऍपक्र. ९७६५४५६५८१
Email : sgk६६४२@gmail. com

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act १९५७ provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १९ सप्टेंबर २०२३ गणेशचतुर्थी २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्री श्याम कुलकर्णी (काव्यानुवादक)



यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E. १९७५
अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त. लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित

# प्रास्ताविक

ग्रन्थ पूर्ण होण्यापूर्वीच प्रस्तावना लिहिणे हा मर्यादातिभङ्ग आहे आणि 24,000 श्लोकांच्या “वाल्मीकीय रामायण” या ग्रन्थातील 350-400 श्लोकांचे रूपान्तरण हे तर मूळ ग्रन्थाचा साठावा भाग पूर्ण करण्यासारखे आहे. त्यामुळे हे दोन शब्द केवळ ईसाहित्य चे श्री. सुनिळ सामन्त यांचे ऋण मान्य करण्यासाठी लिहीत आहे. केवळ त्यांच्या आग्रहामुळेच मी हे मोठे काम अंगावर घेतले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

या ग्रन्थास डॉ. रविन थत्ते यांच्यासारख्या महान व्यक्तीचा आशीर्वाद लाभणे हे माझे महद्भाग्य!

हे काम माझ्या हातून पूर्ण होण्याचे भाग्य मला लाभो येवढीच ईश्वरचरणी प्रार्थना !

श्याम कुलकर्णी




Dr. Ravin Thatte

श्याम कुलकर्णी ह्यांची आणि माझी ओळख खरे तर माझ्या व्यवसायामुळे (प्लास्टिक सर्जन \ सुघटन शल्य) झाली होती ह्याची त्यांनी मला हल्लीच ह्या त्यांच्या प्रकल्पाबद्दल चर्चा करतांना करून दिली . पुढे मी ज्ञानेश्वरीवर लिहिण्यास सुरुवात केल्या नंतर देखील आमची भेट झाली होती हे मात्र आठवते. हा रामायणावरचा त्यांचा प्रयत्न \प्रकल्प बघून आणि वाचून मी थक्क झालो आहे . केवढे प्रचंड काम आहे हे! ह्या पूर्वी त्यांनी भगवत गीतेवर, रामरक्षेवर आणि मेघदूतावर अशीच समश्लोकी लिहिण्याची कामगिरी केली आहे हे कळल्यावर तर मी अवाक झालो . असला माणूस माझ्या परिचयाचा

आहे हे कळून धन्य वाटले. त्यांनी हे सगळे काम "मी स्वानंदासाठी करत आहे" असे लिहिले आहे . सगळ्या मोठ्या कृती ह्या स्वानंदातूनच निर्माण होतात हे फार जुने सत्य इथे परत उजळले आहे. ही हल्लीची समश्लोकी , रामायणाची, आताच वाचली. ती फार छान उतरली आहे आणि वाचतांना खिळवून ठेवते. प्रकल्प अजून पूर्ण व्हायचा आहे तो नक्कीच पूर्ण होईल अशी खात्री आहे आणि त्यासाठी माझ्या सारख्या अनेकांच्या शुभेच्छा पोहोचवण्याचे काम मी आनंदाने करतो आहे.


Dr. रविन थत्ते


**(प्लॅस्टिक सर्जन व संस्कृत पंडित. अध्यात्मावर ११ पुस्तके प्रकाशित)**





श्रीवाल्मिकी रामायण-


१ ते ७ वाचण्यासाठी मुखपृष्ठांवर क्लिक करावे




आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
४
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी


आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
५
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी


आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
६
अयोध्याकांड
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी


आदिकवी
श्री वाल्मिकी
विरचित
मूळ संस्कृत
रामायण
७
मराठी श्लोक
श्री. श्याम
कुलकर्णी

# -अथ श्रीवाल्मिकी रामायण- ८

# अयोध्याकाण्ड सर्ग 65

अथ रात्र्यां व्यतीतायां प्रतरेवापरेऽहनि ।
वन्दिनः पर्युपातिष्ठत्पार्थिवनिवेशनम् ॥1॥

संपता रात्र भवनात उपस्थित वन्दीजन ।
करण्या महाराजांची स्तुति नित्यदिनापरी ॥1॥

**सूता: परमसंस्कारा मागधाश्चोत्तमश्रुता:।**

**गायका: श्रुतिशीलश्च निगदन्त: पृथक्पृथक ॥2॥**

सुसंस्कारित सूत रूपे उत्तम मागध ।

गाननिपुण गायक येति यशोगानास्तव ॥2॥

**राजानं स्तुवतां तेषामुदात्ताभिहिताशिषाम् ।**

**प्रासादाभोगविस्तीर्ण: स्तुतिशब्दो ह्यवर्तत ॥3॥**

स्तुति आशिर्वच देती त्यांच्या उच्च स्वरामुळे ।

प्रासादाचा अन्तर्भाग निनादुन जातसे ॥3॥

ततस्तु स्तुवतां तेषां सूतानां पाणिवादका:।

अपदानान्युदाहृत्य पाणिवादान्यवादयन् ।।4।।

स्तुति ही होत असता पाणिवादक येति ते ।

नृपकर्मे वाजवुनी टाळ्या अद्भुत बोलती ।।4।।

तेन शब्देन विहगा: प्रतिबद्धाश्च सस्वनु:।

शाखास्था: पञ्जरस्थाश्च ये राजकुलगोचरा:।।5।।

शब्द ऐकुनिया पक्षी वृक्षशाखांवरि स्थित ।

पंजरी भवनी तैसे कलकल करु लागती ।।5।।

व्याहृता: पुण्यशब्दाश्च वीणानां चापि नि:स्वना: ।

आशीर्गेयं च गाथानां पूरयामास वेश्म तत ॥6॥

पवित्र ब्राह्मणशब्द वीणाझंकार त्यासह ।

आशीर्वाद गायने भरे भवन सर्वही ॥6॥

तत: शुचिसमाचारा: पर्युपस्थानकोविदा:।

स्त्रीवर्षवरभूयिष्ठा उपतरस्थुर्यथापुरा ॥7॥

सदाचारी परिचर्या कुशल सेवक स्त्रीगण ।

उपस्थित प्रासादी सदा असति त्यापरी ॥7॥

हरिचन्दनसम्पृक्तमुदकं काञ्चनैर्घटैः।

आनिन्युः स्नानशिक्षाज्ञा यथाकालं यथाविधि ॥8॥

जाणकार स्नानविधि सुवर्णघटि घेउनी ।

चंदनमिश्रित जला योग्यकाली उपस्थित ॥8॥

मङ्गलालम्भनीयानि प्राशनीयान्युपस्करान् ।

उपानिन्युस्तथा पुण्याः कुमारीबहुलाः स्त्रियः॥9॥

कुमारी बहुल नारी उपस्थित जल घेउनी ।

दर्पणासह उपकरणे वस्त्राभूषणासह ॥9॥

**सर्वलक्षणसंपन्न सर्वं विधिवदर्चितम्।**

**सर्वं सुगुणलक्ष्मीवत तदभूदाभिहारिकम् ॥10॥**

शुभलक्षण संपन्न विधिवत उत्तम गुणी ।

आभिहारिक सर्व नृपा मङ्गलदायक ॥10॥

प्रात:काली राजाचे मङ्गल होण्यासाठी ज्या वस्तु आणतात त्यास आभिहारिक असे म्हणतात.

**ततः सूर्योदयं यावत सर्वं परिसमुत्सुकम् ।**

**तस्थावनुपसम्प्राप्तं किंस्विदित्युपशङ्कितम् ॥11॥**

राजसेवक उत्सुक ते सूर्योदय होण्यास्तव ।

नृप येता न बाहेरी शंका उद्भवते मनी ॥11॥

**अथ याः कोसलेन्द्रस्य शयनं प्रत्यनन्तराः।**

**ता स्त्रियस्तु समागम्य भर्तारं प्रत्यबोधयन् ॥12॥**

स्त्रिया नृपाजवळी ज्या शय्येजवळि जाउनी ।

जागृत करण्या स्वामींना प्रयत्न करु लागती ॥12॥

**अथाप्युचितवृत्तास्ता विनयेन नयेन च ।**

**नह्यस्य शयनं स्पृष्ट्वा किंचिदप्युपलेभिरे ॥13॥**

स्त्रिया उचित स्पर्शाया स्पर्शे उठवु लागती ।
परी न चिह्न दिसे त्यां होण्याचे नृप जागृत ॥13॥

**ताः स्त्रियाः स्वप्नशीलज्ञाश्चेष्टां संचलनादिषु ।**
**ता वेपथुपरीताश्च राज्ञः प्राणेषु शङ्किताः॥14॥**

निद्राधीना जाणति त्या म्हणुनी शङ्कित मने ।
नाडी पाहुनी निष्प्राण वाटे त्या नृप होतसे ॥14॥

**प्रतिस्त्रोतस्तृणाग्राणां सदृशं संचकाशिरे ।**
**अथ संदेहमानानां स्त्रीणां दृष्ट्वा च पार्थिवम् ।**

**यत तदाशङ्कितम्‌ पापं तदा जज्ञे विनिश्चयः॥15॥**

राजाच्या मृत्युची शंका पाहुनि त्याचे पार्थिव ।
सत्य ती होतसे याचा निश्चय त्यांचा होतसे ।
तृणाग्रे जलाजवळी तश्या त्या कांपु लागल्या ॥15॥

**कौसल्या च सुमित्रा च पुत्रशोकपराजिते ।**
**प्रसुप्ते न प्रबुध्येते यथा कालसमन्विते ॥16॥**

कौसल्या सुमित्रा दोघी मृतवत पुत्रशोके ।
निद्रा न संपे त्यांची बहु काळ लोटला तरी ॥16॥

**निष्प्रभासा विवर्णा च राजा शोकेन संनता ।**

**न व्यराजत कौसल्या तारेव तिमिरावृता ॥17॥**

शोकाने निष्प्रभ सुप्त कौसल्या दिसतसे तशी।

आच्छादित अंध:कारे विदीर्ण जणु तारका ॥17॥

**कौसल्यानंतरं राज्ञः सुमित्रा तदनन्तरम् ।**

**न स्म विभ्राजते देवी शोकाश्रुलुलितानना ॥18॥**

राजाजवळ कौसल्या सुमित्रा जवळी तिच्या ।

निद्रामग्न शोभाहीन अश्रुमुख शोकपीडित ॥18॥

ते च दृष्ट्वा तदा सुप्ते उभे देव्यौ च तं नृपम् ।
सुप्तमेवोद्गतप्राणमन्त:पुरमन्यत ॥19॥

पाहुनी राण्यांना दोन्ही सुप्त आणि सवे नृप ।
सुप्त असता मृत राजा वाटे अंत:पुरी स्त्रियां॥19॥

तत: प्रचक्रुशुर्दीना सस्वरं ता वराङ्गना:।
करेणैव इवारण्ये स्थानप्रच्युतयूथपा: ॥20॥

वनी जाता गजराज अन्यत्र हत्तिणी जश्या ।
चित्कारती स्त्रिया दु:खित आर्तनाद करीति त्या ॥20॥

मागील सर्गात कौसल्या व दशरथ दोघेच असतात व शेवटी दशरथाचा अन्त होतो तरी दोन्ही राण्या झोपतात त्यात सुमित्रा प्रथम तेथे नसते.व सकाळी मात्र असते.दशरथ मृत असून त्यांना गाढ झोप लागते हे सर्व अघटितच !

**तासमाक्रन्दशब्देन सहसोद्गतचेतने।**

**कौसल्या च सुमित्रा च त्यक्तनिद्रे बभूवतु:॥21॥**

त्यांच्या आक्रोशशब्दांनी निद्रा भंग होउनी ।

कौसल्या सुमित्रा दोघी होति जागृत त्यामुळे ॥21॥

**कौसल्या च सुमित्रा च दृष्ट्वा स्पृष्ट्वा च पार्थिवम् ।**

**हा नाथेति परिक्रुश्य पेततुर्धर्णीतले ॥22॥**

कौसल्या सुमित्रा दोघी पार्थिव देह पाहुनी ।

हे नाथा हुंदका ऐसा देत पडती भूमीवरी ॥22॥

**सा कोसलेन्द्रदुहिता चेष्टमाना महीतले।**

**न भ्राजते रजोध्वस्ता तारेव गगन्च्युता ॥23॥**

कोसल्या करी यत्न उठण्याचा भूमिवरी ।

आकाशातून तुटल्या ताऱ्यापरी दिसतसे ॥23॥

**नृपे शान्तगुणे जाते कौसल्या पतितां भुवि।**

**अपश्यंस्ता: स्त्रिय: सर्वा हतां नागवधूमिव ॥24॥**

दिसे शान्त नृपापाशी कौसल्या पतित भूवरी।

अन्त:पुर स्त्रीगणांस मृत नागिणीपरी ॥24॥

**तत: सर्व नरेन्द्रस्य कैकेयीप्रमुखा: स्त्रिय:।**

**रूदन्त्य शोकसंतप्ता निपेतुर्गतचेतना:॥25॥**

कैकेयीप्रमुख सर्व नृपभार्या शोक होउनी ।

आक्रंदती अचेतन होत पतित भूवरी ॥25॥

ताभि: स बलवान् नाद: क्रोशन्तीभिरनुद्रुत:।
येन स्फीतीकृतो भुयस्तद् गृहं समनादयत् ॥25॥
शोकग्रस्त स्त्रिया सर्व आक्रंदती स्वरे उच्च ।
राजभवन निनादे शोकध्वनिने सर्व त्या ॥25॥
तत् परित्रस्तसम्भ्रान्तपर्युत्सुकजनाकुलम् ।
सएवतस्तुमुलाक्रन्दं परितापार्तबान्धवम् ॥27॥
सद्योनिपतितानन्दं दीनं विक्लवदर्शनम् ।
बभूव नरदेवस्य सद्म दिष्टान्तमीयुष:॥28॥

नृप देहान्त झाल्याने जन उत्सुक दु:खित ।
जमती राजभवनी आक्रन्दू लागती तिथे ॥27॥
नृपबान्धव तैसेही शोकसंतापपीडित ।
दिसे आनन्दशून्य भवन दु:खी व्याकुळ॥28॥

**अतीतमाज्ञाय तु पार्थिवर्षभं यशस्विनं तं परिवार्य यत्नय: ।**
**भृशंरुदन्त्य: करुणं सुदु:खिता: प्रगृह्य बाहू व्यलपन्ननाथवत ॥29॥**

भूपालशिरोमणि यशस्वी दिवङ्गत तयासभोवति सर्व स्त्रिया तयाच्या ।
विलाप दु:खे करती अनाथापरि बाहू नृपाचे धरुनी स्वहस्ते ॥29॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे पञ्चषष्ट्तिमः सर्गः ॥65॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 66

तमाग्निमिव संशान्तमम्बुहीनमिवार्णवम् ।
गतप्रभामिवादित्यं स्वर्गस्थं प्रेक्ष्य भूमिपम् ॥1॥
कौसल्या बाष्पपूर्णाक्षी विविधं शोकदर्शिता ।
उपगृह्य शिरो राज्ञः कैकेयीं प्रत्यभाषत ॥2॥

जणु विझलेली आग जलाविण सागर जसा ।
निष्प्रभ आदित्य तसे राजाचे शव पाहुनी ॥1॥
कौसल्या साश्रु नयने त्याचे मस्तक घेउनी ।
अंकावर शोकाकुल ती कैकेयीस असे वदे ॥2॥

**सकामा भव कैकेयी भुक्ष्व राज्यमकण्टकम् ।**
**त्यक्त्वा राजानमेकाना नृषंसे दुष्ट्चारिणी ॥3॥**

दुष्ट क्रूर दुराचारी कैकेयी तव कामना ।
पूर्ण होई निष्कंटक राज्या भोग नृपाविण॥3॥

**विहाय मां गतो रामो भर्ता च स्वर्गतो मम ।**

**विपथे सार्थहीनेव नाहं जीवितुमुत्सहे ॥4॥**

वनासी श्रीराम जाई स्वामी स्वर्गस्थ जाहले ।

दुर्गम पथि अबला तशी जगु न इच्छिते ॥4॥

**भर्तारं तु परित्यज्य का स्त्री दैवतमात्मनः।**

**इच्छेज्जीवितुमन्यत्र कैकेय्यास्त्यक्तधर्मणः॥5॥**

कैकेयीविण आपुल्या त्यजुनि भ्रात्या दैवता ।

अशी कोण असे नारी जीवित जी राहू शके ॥5॥

न लुब्धो बुध्यते दोषान् किंपाकमिव भक्षयन् ।
कुब्जानिमित्तं कैकेय्या राघवाणां कुलं हतम् ॥6॥

धनलोभी विष देई अन्या दोषा विसरुनी ।
कुब्जानिमित्ते कैकेयी नाशि रघुवंशा तशी ॥6॥

अभियोगे नियुक्तेन राज्ञा रामं विवासितम् ।
सभार्य जनकः श्रुत्वा परितप्स्यत्यहं यथा ॥7॥

दुराग्रहे राजाद्वारे रामा पत्नीसवे वनी ।
पाठवी हे जनकास कळता दुःखित होइल ॥7॥

स मामनाथां विधवां नाद्य जानाति धार्मिक:।
राम: कमलपत्राक्षो जीवन्नाशमितो गत: ॥8॥

अनाथ विधवा झाले ज्ञात न हे पुत्रा मम ।
कमलनयन श्रीरामा जणु जीवित अदृश्य तो ॥8॥

विदेहराजस्य सुता तथा चारुतपस्विनी ।
दु:खस्यानुचिता दु:खं वने पर्युद्विजिष्यति॥9॥

पतिसेवा व्रती सीता अयोग्य दु:खा भोगण्या ।
वनी अनुभव घेऊन अतिदु:खित होइल ॥9॥

**नदतां भीमघोषाणां निशात्सु मृहपक्षिणाम् ।**

**निशम्यमाना संत्रस्ता राघचं संश्रयिष्यति ॥10॥**

भयानक स्वर रात्री पशुपक्ष्यांचे ऐकता ।

भयभीत ती जाईल राघवाच्या आश्रया ॥10॥

**वृद्धश्चैवाल्पपुत्रश्च वैदेहीमनुचिन्तयन्।**

**सोऽपि शोकसमाविष्टो नूनं त्यक्ष्यति जीवितम् ॥11॥**

वृद्ध जनक ज्या पुत्र नसे केवळ कन्यका ।

सीतेच्या चिन्तेने त्याग प्राणांचाही करेल तो ॥11॥

**साहमयैव दिष्टान्तं गमिष्यामि पतिव्रता ।**

**इदंशरीरमालिङ्ग्य प्रवेक्ष्यामि हुताशनम् ॥12॥**

कवटाळिन मृत्यू मी पतीसंगे चितेमध्ये ।

पतिव्रतेसम अग्नीत प्रवेशून तयासवे ॥12॥

**तां ततः: सम्परिष्वज्य विलपन्तीं तपस्विनीम् ।**

**व्यपनिन्युः सुदुःखार्ता कौसल्यां व्यावहारिका ॥13॥**

पतीशरीरा धरुनी विलपित तपस्विनी ।

कौसल्येस अन्य स्थानी मन्त्रीगण हलविती ॥13॥

तैलद्रोण्यां तदात्मात्या: संवेश्य जगतीपतिम् ।
राज्ञ: सर्वाण्यथादिष्टाश्चक्रु: कर्माण्यनन्तरम् ॥14॥

नृपशरीर नावेत तैलयुक्त ठेवुनिया ।
शवरक्षा तशी योग्य राजकर्मे आरंभती ॥14॥

न तु संकालनं राज्ञो विनापुत्रेण मन्त्रिण:।
सर्वज्ञा: कर्तुमीषुस्ते ततो रक्षन्ति भूमिपम् ॥15॥

पुत्राविना करण्यास अग्निसंस्कार शक्य ना ।
म्हणुनी मन्त्री करती शवाचे योग्य रक्षण ॥15॥

तैलद्रोण्या शायितं तं सचिवैस्तु नराधिपम् ।
हा मृतोऽयमिति ज्ञात्वा स्त्रियस्ताः पर्यदेवयन् ॥16॥
शव तैलनावेत हे जाणुनी हाय महाराज ।
सोडुनी गेले आम्हा राजस्त्रिया विलापती ॥16॥
बाहूनुच्छ्रित्य कृपणा नेत्रप्रस्रवणैर्मुखैः।
रुदत्यः शोकसंतप्ताः कृपणं पर्यदेवयन् ॥17॥
अश्रु नेत्रातुनि येती करां उंचावुनी दीन ।
स्वरे करती विलाप दीनभावे सर्व स्त्रिया ॥17॥

**विहीना: हा महाराज रामेण सततं प्रियवादिना ।**

**सत्यसंधेन किमर्थं विजहासि न: ॥18॥**

म्हणती हा महाराज रामास प्रियवादिनी ।

प्रियवचनी तुम्हीही सोडले आम्हा असे ॥18॥

**कैकय्या दुष्टभावाया राघवेण विवर्जिता:।**

**कथं सपत्न्या वत्स्याम: समीपे विधवा वयम् ॥19॥**

श्रीरामापासुनि दूर दुष्ट कैकेयीसह ।

सर्व विधवा आम्ही कश्या राहु शकू थे ॥19॥

**स हि नाथः स चास्माकं तव च प्रभुरात्मवान् ।**

**वनं रामो गतः श्रीमान् विहाय नृपतिश्रियम् ॥20॥**

आपले तसे आमुचे रक्षक मनस्वी प्रभु ।

श्रीरामचंद्र वनी जाती राजलक्ष्मी सोडुनी ॥20॥

**त्वया तेन च वीरेण विना व्यसनमोहिताः।**

**कथं वयं निवत्स्यामः कैकेय्या च विदूषिताः॥21॥**

श्रीराम तुम्ही दोघे नसता बिकट संकटी ।

तिरस्कृत आम्ही राहू कैकेयिकडुनी कश्या ॥21॥

**यया च राजा रामश्च लक्ष्मणश्च महाबलः।**

**सीतया सह संत्यक्ताः सा कमन्यं न हास्यति ॥22॥**

जिने राजा तसा राम सीतेसह लक्ष्मणा ।

त्यागिले ती दुसऱ्या कोणासहि त्यागू शके ॥22॥

**ता बाष्पेण य संवीताः शोकेन विपुलेन च ।**

**व्यचेष्टत निरानन्दा राघवस्य वरस्त्रियः ॥23॥**

दशरथस्त्रिया सर्व शोकाने अश्रुपीडित ।

विलपती हरपुनी सर्व आनंद जीवनातला ॥23॥

निशा नक्षत्रहीनेव स्त्रीव भर्तृविवर्जिता ।

पुरी नाराजतायोध्या हीना राज्ञा महात्मना ॥24॥

नक्षत्राविण रात्र नारी पतिविहीन तशी ।

महात्मा दशरथाविण अयोध्या श्रीहीन ती ॥24॥

बाष्पपर्याकुलजना हाहाभूतकुलाङ्गना ।

शून्यचत्वरवेश्मान्ताः न बभ्राज यथापुरम् ॥25॥

पौरजन अश्रुपूर्ण नेत्र दु:खित कुलस्त्रिया ।

निर्मनुष्य घरे मार्ग नगरी विशोभित अशी ॥25॥

**गते तु शोकात त्रिदिवं नराधिपे महीतलस्थासु नृपाङ्गनासु च ।**
**निवृत्तवार: सहसा गतो रवि: प्रवृत्तधारा रजनी ह्युपस्थिता ॥26॥**

स्वर्गी जाई शोके दशरथ राण्या तयाच्या शोकमग्न धरेवरी ।
अस्तंगत होति किरणे रवीची घेऊनि अन्ध:कार रजनी येतसे ॥26॥

**ऋते तु पुत्राद् दहनं महीपते रोचयंस्ते सुहृद समागता:।**
**इतीव तस्मिन शयने न्यवेशयन विचिन्त्य राजानमचिन्त्यदर्शनम ॥27॥**

सुहृद येति न त्यांस मान्य पुत्राविना करणे दाहसंस्कार नृपाचा ।
अचिन्त्य होतसे दर्शन नृपाचे म्हणून तैलनावेत सुरक्षित ठेवती तया ॥27॥

**गतप्रभा द्योरिव भास्करं विना व्यपेतनक्षत्रगणेव शर्वरी।**

**पुरी बभासे रहिता महात्मना कण्ठास्रकण्ठाकुलमार्गचत्वरा॥28॥**

सूर्याविना निष्प्रभ व्योम तैसी ताऱ्यांविना रात्र विशोभित दिसे।

भासे उदास पुरी अयोध्या महात्म्याविण जन चौकाचौकात जमती ॥28॥

**नराश्च नार्यश्च समेत्य संघशो विगर्हमाणा भरतस्य मातरम् ।**

**तदा नगर्या नरदेवसंक्षये बभूवुरार्ता न च शर्म लेभिरे ॥29॥**

एकत्र जमुनी नरनारिसंघ भरतमाता कैकेयिची करति सर्व निन्दा ।

अयोध्यापुरीतिल शोकमग्न जन सर्व न शान्ति कोणासहि मिळे ॥29॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे षट्षष्टितमः सर्गः॥66॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 67

आक्रन्दिता निरानन्दा सास्त्रकण्ठ्जनाविला।
अयोध्यायामवतता सा व्यतियाय शर्वरी॥1॥

आनंदरहित साश्रु कंठे अयोध्यावासि रात्र ती ।
काढती सर्व दु:खाने त्यामुळे दीर्घ वाटली ॥1॥

व्यतीतायां तु शर्वर्यामादित्यस्योदये ततः।
समेत्य राजकर्तारः सभामीयुर्द्विजातयः ॥2॥

होता सूर्योदय येती करती राज्यप्रबन्ध जे ।
जमती ब्राह्मण सर्व सभेत विचारास्तव ॥2॥

मार्कण्डेयोऽथ मौद्गल्यो वामदेवश्च कश्यपः।
कात्यायनो गौतमश्च जाबालिश्च महायशाः॥3॥

एते द्विजाः महामात्यैः पृथग्वाचमुदीरयन् ।
वसिष्ठमेवाभिमुखाः श्रेष्ठं राजपुरोहितम् ॥4॥

मार्कंडेय वामदेव मौद्गल्य कश्यपांसह ।
कात्यायन गौतमही जाबालीही महायश ॥3॥
हे सर्व ब्राह्मणश्रेष्ठ स्वमते मांडती पुढे ।
मन्त्र्यांसह द्विजश्रेष्ठ वसिष्ठांपुढती तिथे ॥4॥
**अतीता शर्वरी दुःखं या नो वर्षशतोपमा ।**
**अस्मिन् पञ्चत्वमापन्ने पुत्रशोकेन पार्थिवे ॥5॥**
बोलती ते पुत्रशोके महाराज स्वर्गवासी ।
रात्र त्यामुळे दुःखे भासे शत वर्षापरि ॥5॥

**स्वर्गस्थश्च महाराजो रामश्चारण्यमाश्रित:।**

**लक्ष्मणश्चापि तेजस्वी रामेणैव गत: सह ॥6॥**

स्वर्गवासी महाराज श्रीरामचंद्र ते वनी ।

त्यांच्यासवे लक्ष्मणही तेजस्वी जात निघोनि ते ॥6॥

**उभौ भरतशत्रुघ्नौ केकयेषु परंतपौ ।**

**पुरे राजगृहे रम्ये मातामहनिवेशने ॥7॥**

भरतशत्रुघ्न दोघे मातुलगृहि राहती ।

कैकेय परंतप यांच्या राजगृहि रम्य जे ॥7॥

**इक्ष्वाकूणामिहाचैव कश्चिद् राजा विधीयताम् ।**

**अराजकं हि नो राष्ट्रं विनाशं समवाप्नुयात ॥8॥**

इक्ष्वाकुवंशी राजकुमारा कोणा आजच नृप ।

करावे कारण राज्य नृपहीन नाश पावते ॥8॥

**नाराजके जनपदे विद्युन्माली महास्वनः।**

**अभिवर्षति पर्जन्यो महीं दिव्येन वारिणा ॥9॥**

जनपदी नृपहीन गर्जना करणारे मेघ ।

विद्युन्मालासह दिव्य जलवर्षा करति ना ॥9॥

**नाराजके जनपदे बीजमुष्टिः प्रकीर्यते ।**

**नाराजके पितुः पुत्रो भार्या वा वरतते वशे ॥10॥**

जनपदी नृपहीन पेरले बीज जाइ ना ।

पित्याच्या पुत्र तशी भार्या पतीच्या वचनी नसे ॥10॥

**अराजके धनं नास्ति नास्ति भार्याप्यराजके ।**

**इदमत्याहितं चान्यत कुतः सत्यमराजके ॥11॥**

धन नसे राजा नसता पत्नीहि नसे आपली ।

असे असता दुसरे सत्य कसे राहू शकेल ते?॥11॥

**नाराजके कनपदे कारयन्ति सभां नरा:।**

**उद्यानानि च रम्याणि हृष्टा: पुण्यगृहाणि च ॥12॥**

राजाविण पंचायत नसे उद्यान निर्मिती ।

मन्दिरे धर्मशालाही निर्मिती कुणि ना करे ॥12॥

**नाराजके जनपदे यज्ञशीलाद्विजातय:।**

**सत्राण्यन्वासते दान्ता ब्राह्मण; संशितव्रता:॥13॥**

नृपहीन जनपदी यज्ञ करणारे द्विज ।

तसे व्रत करणारे जितेंद्रिय नसती तिथे ॥13॥

**नाराजके जनपदे महायज्ञेषु यज्वनः।**

**ब्राह्मणा वसुसम्पूर्णा विसृजन्त्याप्तदक्षिणाः॥14॥**

जनपदी महायज्ञ ऐश्या जरी धनी जन।

करती परि ऋत्विजा दक्षिणा देति न योग्य ते ॥14॥

**नाराजके जनपदे प्रहृष्टनटनर्तकाः।**

**उत्सावाथ समाजाथ वर्धन्ते राष्ट्रवर्धनाः॥15॥**

जनपदी ऐश्या नसति उन्नतिकारक उत्सव।

नटनर्तक आनन्दी नसति राष्ट्रवर्धक ॥15॥

**नाराजके जनपदे सिद्धार्था व्यवहारिणः।**

**कथाभिरज्यन्ते कथाशीलाः कथाप्रियैः॥16॥**

जनपदी ऐश्या वाद प्रतिवाद अनिर्णित ।

वणिक्जन असंतुष्ट अप्रसन्न कथाप्रिय ॥16॥

**नाराजके जनपदे तूयानानि समागताः।**

**सायाह्ने क्रीडित्यं यान्ति कुमार्यो हेमभूषिताः॥17॥**

जनपदी नृपहीन सुवर्णभूषणे अलंकृत ।

उद्यानामध्ये कन्या क्रीडा करण्या जाति ना ॥17॥

**नाराजके जनपदे धनवन्तः सुरक्षिताअः।**

**शेरते विवृतद्वाराः कृषिगोरक्षजीविनः॥18॥**

नृपहीन जनपदी धनवान असुरक्षित ।

कृषि गोरक्षक वैश्यां गृह बंदिस्त झोपता ॥18॥

**नाराजके जनपदे वाहनैः शीघ्रवाहिभिः।**

**नरः निर्यान्त्यरण्यानि नारीभिः सह कामिनः ॥19॥**

नृपहीन जनपदी शीघ्र रथि स्त्रियांसह ।

वनविहारा न जाऊ शकती रंगेल नर ॥19॥

**नाराजके जनपदे बद्धघंटा विषाणिनः।**

**अटन्ति राजमार्गेषु कुञ्जराः षष्टिहायनाः॥20॥**

नृपहीन जनपदी गज घण्टा बान्धुन ।

साठ वर्षीय रस्त्यात हस्तिदन्ती न चालती ॥20॥

**नाराजके जनपदे शरान् संततमस्यताम् ।**

**श्रूयते तलनिर्घोष इष्वस्त्राणामुपासने ॥21॥**

नृपहीन जनपदी धनुर्विद्या उपासक ।

कर प्रत्यंचा नाद ऐकण्या नच येतसे ॥21॥

**नाराजके जनपदे वणिजो दूरगामिनः।**

**गच्छन्ति क्षेममध्यानं बहुपण्यसमाचिता: ॥22॥**

नृपहीन जनपदी व्यापारी वस्तु घेउनी ।

धजती न दूर देशी जाउनी विकण्यास त्या ॥22॥

**नाराजके जनपदे चरत्येकचरो वशी ।**

**भावयन्नात्मनाऽऽत्मानं यत्र सायं गृहो मुनिः॥23॥**

नृपहीन जनपदी ध्यान करणारे मुनी ।

एकटे फिरती रात्री कुठे न दिसती असे ॥23॥

**नाराजके जनपदे योगक्षेमः प्रवर्तते।**

**न चाप्यराजके सेना शत्रून् विषहते युधि ॥24॥**

नृपहीन देशी होई योगक्षेम कसाबसा ।

न शत्रूसह लढण्या सेना युद्ध करू शके॥24॥

**नाराजके जनपदे हृष्टैः परमवाजिभिः।**

**नराः संयान्ति सहसा रथेश्च प्रतिमण्डिताः॥25॥**

नृपहीन देशि लोक विभूषित वस्त्रभूषणे ।

उत्तम अश्व रथी यात्रा सहसा टाळती भये ॥25॥

**नाराजके जनपदे नरा: शास्त्रविशारदा:।**

**संवदन्तोपतिष्ठन्ते वनेषूपवनेषु वा ॥26॥**

नृपहीन देशी शास्त्री विद्वान वनीउपवनी ।

व्याख्या करीत शास्त्रांची राहण्या शकती न ते ॥26॥

**नाराजके जनपदे माल्यमोदकदक्षिणा:।**

**देवताभ्यर्चनार्थाय कल्प्यन्ते नियतैर्जनै:॥27॥**

नृपहीन देशी लोक देवता पूजनास्तव ।

दक्षिणा पुष्पे खाद्य योजण्या असमर्थ ते ॥27॥

**नाराजके जनपदे चन्दनागुरुरूषिता:।**

**राजपुत्रा विराजन्ते वसन्ते इव शाकिन:॥28॥**

राजपुत्र नृपहीन देशे चन्दन अगुरु लेपित ।

वसन्तातिल वृक्षासम दिसती न विराजित ॥28॥

**यथा ह्यनुदका नद्यो यथा वाप्यतृणं वनम् ।**

**अगोपाला यथा गावस्तथा राष्ट्रमराजकम् ॥29॥**

जश्या नद्या जलहीन किंवा वन तृणाविना ।

गोपालाशिवाय गाई तसे राष्ट्र नृपाविण ॥29॥

**ध्वजो रथस्य प्रज्ञानं धूमो ज्ञानं विभावसो:।**

**तेषां यो नो ध्वजो राजा स देवत्वमितो गत:।।30।।**

ध्वज रथदर्शक तो धूम्र अग्नि निबोधक ।

तसा राजकर्मि आम्हा नृप देवत्वि विलीन तो।।30।।

**नाराजके जनपदे स्वकं भवति कस्यचित ।**

**मत्स्या इव जना भक्षयन्ति परस्परम् ।।31।।**

नृपहीन देशे स्वत्व न राहे जसे जली।

भक्षिती मत्स्य एकमेका तैसेच जन ही वर्तती ।।31।।

**ये हि सम्भिन्नमर्यादा नास्तिकाश्छिन्नसंशया:।**

**तेऽपि भावाय कल्पन्ते राजदण्डनिपीडिता:॥32॥**

नास्तिक न जे मर्यादा पाळती नि:शङ्क हो उनी ।

राजदण्ड नसल्याने प्रभुत्वे वागती जनी ॥32॥

**यथा दृष्टिः शरीरस्य नित्यमेव प्रवर्तते ।**

**तदा नरेन्द्रो राष्ट्रस्य प्रभव: सत्यधर्मयो: ॥33॥**

शरीरहित साधाया प्रवृत्त दृष्टि जशी असे ।

तसा नृप सत्य धर्म प्रवर्तक राज्यास्तव ॥33॥

**राजा सत्यं च धर्मश्च राजा कुलवतां कुलम् ।**

**राजा माता पिता चैव राजा हितकरो नृणाम् ॥34॥**

राजा सत्य धर्म तोच कुलवानांचे कुल ।

राजा माता पिता तसा सर्वां असे तो हितकारक ॥34॥

**यमो वैश्रवणः शक्रो वरुणश्च महाबलः।**

**विशिष्यते नरेन्द्रेण वृत्तेन महता ततः॥35॥**

कुबेर यम इन्द्र तसा महाबलि वरुणाहुनी ।

जनी असे नृप श्रेष्ठ कल्याणप्रद त्यां असे ॥35॥

**अहो तम इवेदं स्यान्न प्रज्ञायेत किंचन ।**

**राजा चेन्न भवेल्लोके विभजन् साध्वसाधुनी॥36॥**

जगी योग्य अयोग्याचा करी जो न्याय्य निश्चय ।

नृप असा नसे तर सर्वत्र अन्ध:कारच होइल ॥36॥

**जीवत्यपि महाराजे तवैव वचनं वयम् ।**

**नातिक्रमामहे सर्वे बेलां प्राप्येव सागर ॥37॥**

सागर जसा न उल्लङ्घे किनारा तैसे आम्ही ।

महाराज असताही मता आपल्या मानतो आम्ही ॥37॥

स नः समीक्ष्य द्विजवर्य वत्तं नृपं विना राष्ट्रमरण्यभूतम् ।
कुमारमिक्ष्वाकुसुतं तथान्यं त्वमेव राजानमिहाभिषेचय ॥38॥

म्हणून ऐकोनि आमुच्या मतास नृपाविण राष्ट्र जणु अरण्य होतसे ।
इक्ष्वाकु वंशज कुमार नसता दुसऱ्या योग्य पुरुषा करावा अभिषेक ॥38॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे सप्तषष्टितमः सर्गः॥67॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 68

**तेषां तद्वचनं श्रुत्वा वसिष्ठः प्रत्युवाच ह ।**
**मित्रामात्यजनान् सर्वान् ब्राह्मणांस्तानिदं वचः॥1॥**

त्यांचे विचार ऐकून मित्रां मन्त्र्यां व ब्राह्मणां ।
महर्षि वसिष्ठांनी सर्वां उत्तर हे दिले ॥1॥

**यदसौ मातुलकुले दत्तराज्य: परं सुखी ।**

**भरतो वसति भ्राता शत्रुघ्नेन मुदान्वित: ॥2॥**

महाराज ज्यास देती राज्य तो मातुलगृही ।

भरत शत्रुघ्नासह राही सुखी प्रसन्नही॥2॥

**तच्छीघ्रं जवना दूता गच्छन्तु त्वरितं हयैः।**

**आनेतुं भ्रातरौ वीरौ किं समीक्षामहे वयम ॥3॥**

आणण्या बन्धुना दोघां वीरां पाठवुनी त्वरे ।

वायुवेगे चालणाऱ्या अश्वावरि स्वार दूत जो ॥3॥

**गच्छन्त्विति ततः सर्वे वसिष्ठं वाक्यमब्रुवम् ।**

**तेषां तद् वचनं श्रुत्वा वसिष्ठो वाक्यमब्रवीत ॥4॥**

म्हणती पाठवा दूत वसिष्ठ वचना ऐकुनी ।

त्यांचे वचन ऐकून वसिष्ठ दूतां सांगती ॥4॥

**एहि सिद्धार्थ विजय जयन्ताशोकनन्दन ।**

**श्रयतामितिकर्तव्यं सर्वानेव ब्रवीमि वः ॥5॥**

सिद्धार्था विजय जयन्ता तसे नन्दन या इथे ।

ऐका काम करण्याचे सांगतो मी जे तुम्हा ॥5॥

**पुरं राजगृहं गत्वा शीघ्रं शीघ्रजवैर्हयैः।**

**त्यक्तशोकैरिदं वाच्य शासनाद् भरतो मम ||6||**

अश्वावरी वेगवान स्वार होउनि शीघ्र जा ।

राजगृहि भरता सांगा शोकभावाविना वच ||6||

**पुरोहितस्त्वां कुशलं प्राह सर्वे च मन्त्रिणः।**

**त्वरमाणश्च निर्याहि कृत्यमात्ययिकं त्वया ||7||**

पुरोहित मन्त्री सर्व कुशल मङ्गल सांगती ।

त्वरा करा अयोध्येत आवश्यक कार्य आपणा ||7||

**मा चास्मै प्रोषितं रामं मा चास्मै पितरं मृतं ।**

**भवन्त: शंसिषुर्गत्वा राघवाणामित: क्षयम् ॥8॥**

वनवास राघवाचा पित्याचा मृत्यु वृत्त हे ।

तसा येथिल शोक याविषयी न चर्चा करा ॥8॥

**कौशेयानि च वस्त्राणि भूषणानि वराणि च ।**

**क्षिप्रमादाय राज्ञश्च भरतस्य च गच्छत ॥9॥**

केकयराजा भरता रेशमी वस्त्रे आभूषणे ।

देण्या घेउनी त्वरित शीघ्र तुम्ही इथूनि जा ॥9॥

**दत्तपथ्यशना दूता जग्मु: स्वं स्वं निवेशनम् ।**

**केकयांस्ते गमिष्यन्तो हयानारुह्य सम्मतान् ॥10॥**

दूत केकय देशात जाणारे घेउनी धन ।

खर्चास्तव अश्वारूढ होउनी जाति स्वगृही ॥10॥

**तत: प्रास्थानिकं कृत्वा कार्यशेषमनन्तरम् ।**

**वसिष्ठेनाभ्यनुज्ञाता दूता: संत्वरितं ययु: ॥11॥**

यात्रेस्तव सज्ज होऊनी वसिष्ठाज्ञा घेउनी ।

प्रस्थान करती सर्व त्वरे ते दूत तेथुनी ॥11॥

**न्यन्तेनापरतालस्य प्रलम्बस्योत्तरं प्रति ।**

**निषेवमाणास्ते जग्मुर्नदीं मध्येन मालिनीम् ॥12॥**

अपरताल पर्वत प्रलम्बगिरि यांमध्ये ।

वाहे ज्या मालिनी तटी जात पुढती दूत ते॥12॥

**ते हास्तिनपुरे गङ्गां तीर्वा प्रत्यङ्मुखा ययुः ।**

**पाञ्चालदेशमासाद्य मध्येन कुरुजाङ्गलम् ॥13॥**

हस्तिनापुरी गंगा पार करुनी पश्चिमी ।

पाञ्चाली जाउनि जाती कुरुजाङ्गलातुन पुढे ॥13॥

**सरांसि च सुफुल्लानि नदीश्च विमलोदकाः।**

**निरीक्षमाना जग्मुस्ते दूताः कार्यवशाद्द्रुतम् ॥14॥**

सरोवर नद्या सुंदर विमल जल ज्यांमधे ।

पहात दूत ते जाती द्रुतवेगे कार्यास्तव ॥14॥

**ते प्रसन्नोदकां दिव्यां नानाविहगसेविताम्।**

**उपातिजग्मुर्वेगेन शरदण्डां जनाकुलाम् ॥15॥**

प्रसन्नजल जिचे शोभे नाना पक्षी जिच्यावरी ।

जात शरदण्डा तीरी वेगे उल्लंघती तिला ॥15॥

निकूलवृक्षमासाद्य दिव्यं सत्योपयाचनम् ।
अभिगम्याभिवाद्यं तं कुलिङ्गा प्राविशन् पुरीम् ॥16॥

पश्चिम तटी वृक्ष दिव्य सत्योपयाचन ।
प्रार्थुनी त्या पुढे जाती कुलिङ्गा नगरीमध्ये ॥16॥

सत्योपयाचन नाव, कारण त्यावर देवता असून त्यांना केलेली याचना सफल होते असा समज होता.

अभिकालं ततः प्राप्यतेजोऽभिभवनाच्च्युताः।
पितृपेतामहीं पुण्यां तेरुरिक्षुमतीं नदीम् ॥17॥

तेजोऽभिभवन ग्राम करुनी पार प्रवेशती ।

अभिकाल ग्रामे पुढे ओलांडती इक्षुमती ।
नदी जी पुण्यसलिला दशरथ पूर्वज सेविती ॥17॥

**अवेक्ष्याञ्जलिपानांश्च ब्राह्मणान् वेदपारगान् ।**
**ययुर्मध्येन बालीकान् सुदामानं च पर्वतम् ॥18॥**

अञ्जुलि इतुके जल पिउनी करती जे तप ।
वेदपारंगत मुनींचे दर्शन करुनी पुढे ।
मध्याभागि बालिक देशी सुदामा नाम पर्वत ।
असे स्थित तयापाशी जाउनी पोचतात ते ॥18॥

**विष्णोः पदं प्रेक्ष्यमाणा विपाशां चापि शाल्मलीम् ।**

**नदीर्वापीतटाकानि पल्वलानि सरांसि च ॥19॥**

**पश्यन्तो विविधांश्चापि सिंहान् व्याघ्रान् मृगान् द्विपान् ।**

**ययुः पथातिमहता शासनं भर्तुरीप्सवः॥20॥**

विष्णुपद दर्शन तेथे करुनी विपाशा नदी ।

जवळी शाल्मली वृक्षाजवळुनी जाती पुढे ॥19॥

सिंह व्याघ्र मृग प्राणी पहात विशाल पथी ।

त्वरा करुनिया जाती स्वामीइच्छा जशी असे ॥20॥

**ते श्रान्तवाहना दूता विकृष्टेन सता पथा:।**

**गिरिव्रजं पुरवरं शीघ्रमासेदुरञ्जसा ॥21॥**

श्रान्त होती परी मार्ग उपद्रवरहित असे ।

त्यामुळे पोचती शीघ्र गिरिव्रज नगरीमध्ये ॥21॥

**भर्तुः प्रियार्थं कुलरक्षणार्थं भर्तुश्च वंशस्य परिग्रहार्थम् ।**

**अहेडमानास्त्वरया स्म दूता रात्र्यां तु ते तत्पुरमेव याता:॥॥22॥**

पाळण्या स्वामिआज्ञेस प्रजाहित करण्यास्तव ।

महाराज दशरथांचा वंश चालवण्या पुढे ॥

दूत तत्पर सादर ते उत्कंठेने जाती पुढे ।
आणि रात्रीच नगरात जाउनी पोचती तसे ॥22॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डेऽष्टषष्टितम: सर्ग:॥68॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 69

**यामेव रात्रिं ते दूताः प्रविशन्ति स्म तां पुरीम्।**
**भरतेनापि तां रात्रिं स्वप्नो दृष्टोऽयमप्रियः॥1॥**

ज्या रात्रि ते दूत नगरीत प्रवेशती।
भरतासहि त्या रात्री दुःस्वप्न पडतसे ॥1॥

**व्युष्टामेव तु तां रात्रिं दृष्ट्वा तं स्वप्नमप्रियम् ।**

**पुत्रो राजाधिराजस्य सुभृशं पर्यतप्यत॥2॥**

रात्र संपून प्रभाती अप्रिय स्वप्न पाहता ।

पुरे राजाधिराजाचा बहु खेद मनी करी ॥2॥

**तप्यमानं तमाज्ञाय वयस्या:प्रियवादिन:।**

**आयासं विनयिष्यन्त: सभायां चक्रिरे कथा ॥3॥**

प्रियवादी मित्र त्याचे चिन्तेत पाहुनि तया ।

क्लेश दूर करण्यासाठी करती संभाषण ॥3॥

**वादयन्ति तदा शान्तिं लासयन्त्यपि चापरे।**

**नाटकान्यपरे स्माहुर्हास्यानि विविधानि च ॥4॥**

वीणा वाजवती काही नृत्य काही करूनिया।

नाट्य हास्यपूर्ण काही करती शान्तवाया तया ॥4॥

**स तैर्महात्मा भरत:सखिभि: प्रियवादिभि:।**

**गोष्ठीहास्यानिकुर्वद्भिर्न प्राहष्यत राघव:॥5॥**

प्रियवादी मित्रांच्या त्या यत्ने रघुकुलभूषणा ।

हास्यकारी जरी त्याला नच लाभे प्रसन्नता ॥5॥

तमब्रवीत प्रयसखो भरतंसखिभिर्वृतम् ।
सुहृद्धिः पर्युपासीनः किं सखे नानुमोदसे ॥6॥

मित्रगणांनी आवृत्त प्रिय एक मित्र तया ।
विचारी मित्रा आज प्रसन्न होसी न का ॥6॥

एवं ब्रुवाणं सुहृदं भरतः प्रत्युवाच ह ।
श्रुणु त्वं यन्निमित्तं मे दैन्यमेतदुपागतम् ॥7॥
स्वप्ने पितर्मद्राक्षं मलिनं मुक्तमूर्धजम् ।
पतन्तमद्रिशिखरात्कलुषे गोमये हृदे ॥8॥

विचारता त्याने ऐसे भरत उत्तरे तया ।
दु:खी मी कारण स्वप्नी पित्यास मम पाहिले॥7॥
मुख मलिन मुक्त केश गिरिवरुनि खालती ।
गोमये भरलेल्या खोल जागेत पडति ते ॥8॥

**प्लवमानश्च मे दृष्टः स तस्मिन् गोमये ह्रदे ।**
**पिबन्नञ्जलिना तैलं हसन्निव मुहुर्मुहुः॥9॥**

गोमययुक्त कुंडात करता तैल प्राशन ।
ओंजळिने तसे दिसती हासत पुन:पुन्हा ॥9॥

ततस्तिलोदनं भुक्त्वा पुनः पुनरधःशिराः

तैलेनाभ्यक्तसर्वाङ्गस्तिलम्र्वान्वगाहत ॥10॥

खाती तीळ तसा भात सर्वाङ्गा तैल नंतर ।

घेती लावुन तेलात अधोमुख पडुनि राहती ॥10॥

स्वप्नेऽपि सागरंशुष्कं चन्द्रं च पतितं भुवि।

उपरुद्धां च जगतीं तमसेव समावृताम् ॥11॥

स्वप्नात सागर शुष्क पडे चंद्र धरेवरी ।

धरा उपद्रवग्रस्त अन्धारे आच्छादित ॥11॥

**औपवाह्यस्य नागस्य विषाणं शकलीकृतम् ।**

**सहसा चापि संशान्ता ज्वलिता जातवेदस:॥12॥**

महाराज ज्यावरि स्वार गजाचा दांत त्या तुटे ।

अचानक हो शान्त अग्नि प्रज्वलित जो असे ॥12॥

**अवदीर्णां च पृथिवींशुष्काश्च विविधान् द्रुमान् ।**

**अहं पश्यामि विध्वस्तान् सधूमांश्चैव पर्वतान् ॥13॥**

पृथ्वी विदीर्ण झालेली शुष्क सर्वत्र वृक्षही ।

दिसे मज धूम्रयुक्त उध्वस्त पर्वत तसे ॥13॥

**पीठे कार्णायसे चैव निषण्णं कृष्णवाससम् ।**

**प्रहरन्ति स्म राजानं प्रमदाः कृष्णपिङ्गलाः॥14॥**

महाराज दशरथ स्थित लोह सिंहासनावरी ।

कृष्णपिङ्गल वर्णाच्या प्रहार करती स्त्रिया ॥14॥

**त्वरमाणाश्च धर्मात्मा रक्तमाल्यानुलेपनः।**

**रथेन खरयुक्तेन प्रयातो दक्षिणामुखः॥15॥**

कंठी रक्त पुष्पमाला रकतचंदन लेपित।

बसुनी गर्दभयुक्त रथी जाती दक्षिणेकडे ॥15॥

**प्रहसन्तीव राजानं प्रमदा रक्तवासिनी ।**

**प्रकर्षन्ती मया दृष्टा राक्षसी विकृतानना ॥16॥**

रक्त वस्त्रान्कित ती स्त्री राक्षसी विकृतमुखी ।

ओढत नेत महाराजा दृश्य ऐसे पाहिले ॥16॥

**एवमेतन्मया दृष्टमिमां रात्रिं भयावहाम् ।**

**अहं रामोऽथवा राजा लक्ष्मणो वा मरिष्यति ॥17॥**

स्वप्न हे भयानक रात्री पाहुनी वाटते मज ।

श्रीराम,लक्ष्मण किंवा महाराज मृत्युदर्शक ॥17॥

नरो यानेन यः स्वप्ने खरयुक्तेन याति हि ।
अचिरात्तस्य धूम्राग्रं चितायां सम्प्रदृष्यते ॥18॥
एतन्निमित्तं दीनोऽहं न वचः प्रतिपूजये ।
शुष्यतीव च मे कण्ठो न स्वस्थमिव मे मनः॥19॥

स्वप्नात गर्दभरथी बसुनी नर जात जो ।
शीघ्र त्याच्या दिसे धूर चितेचा त्यानंतर ॥18॥
त्यामुळे असे चिन्तित बोलत न आपणासवे।
कण्ठ शुष्क पडे माझा अस्वस्थ मन होतसे ॥19॥

न पश्यामि भयस्थानं भयं चैवोपधारये।

भ्रष्टश्च स्वरयोगो मे छाया चापगता मम ॥

जुगप्सु इव चात्मानं न च पश्यामि कारणम् ॥20॥

भयाचे कारण नसता तरी मी भयकंपित ।

स्वर खोल मम जाई देह कान्ति फिकी पडे ।

स्वत:चीच घृणा वाटे न कळे काय कारण ॥20॥

इमां च दु:स्वप्नगतिं निशम्य हि त्वनेकरूपामवितर्कितां पुरा ।

भयं महत् तुद् हृदयान्न याति मे विचिन्त्य राजानमचिन्त्यदर्शनम् ॥21॥

विचार नसता मनि ज्या प्रकारचा दु:स्वप्नि महाराजांस पाहुनीया।
अकल्पनीय पाहुनि स्वप्न भीती मनातुनी जात नसे ती दूर ॥21॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे एकोनसप्ततितम: सर्ग:॥69॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 70

भरते ब्रुवति स्वप्नं दूतास्ते क्लान्तवाहना:।
प्रविष्यासह्यपरिखं रम्यं राजगृहं पुरम् ॥1॥

भरत सांगतसे स्वप्न मित्रां दूत प्रवेशती ।
श्रान्तवाहन राजगृहे अनुल्लंघीय शत्रुना ॥1॥

समागम्य च राज्ञा ते राजपुत्रेण चार्चिता:।

**राज्ञः पादौ गृहीत्वा च तमूचुर्भरतं वचः॥2॥**

भेटती राजपुत्र नृपा त्यांचा सत्कार स्वीकारती ।

चरणस्पर्शिति भरता नृपा भावी बोलती त्याला असे ॥2॥

**पुरोहितस्त्वां कुशलं प्राह सर्वे च मन्त्रिणः।**

**त्वरमाणश्च निर्याहि कृत्यामात्ययिकं त्वया ॥3॥**

पुरोहित तसे मन्त्री सांगती कुशल मङ्गल ।

अयोध्येत असे कार्य जे आवश्यक आपणा ॥3॥

**इमानि च महार्हाणि वस्त्राण्याभरणानि च ।**

प्रतिगृह्य विशालाक्ष मातुलस्य च दापय ॥4॥

राजपुत्रा विशालक्ष अमूल्य वस्त्राभूषणे ।

करा ग्रहण स्वत:साठी तसेच द्या मातुला ॥4॥

अत्र विंशतिकोट्यस्तु नृपतेर्मातुलस्य ते ।

दशकोट्यस्तु सम्पूर्णास्तथैव च नृपात्मज ॥5॥

बहुमूल्य सामग्री जी कैकेयनरेशास्तव ।

असे ती वीस कोटींची दश कोटींची मातुला ॥5॥

प्रतिगृह्य तु तत सर्वं स्वनुरक्तः सुहृज्जने।

दूतानुवाच भरत: कामै: सम्प्रतिपुज्य तान ॥6॥

मातुलादि सुहृदा देई भरत दूतां नंतर ।

देउनी सत्कारवस्तू त्यांसवे बोलतो असा ॥6॥

कच्चित स कुशली राजा पिता दशरथो मम ।

कच्चिदारोग्यता रामे लक्ष्मणे च महात्मनि ॥7॥

असती सकुशल ना पिताश्री मम दशरथ?

कैसे आरोग्य महात्मा श्रीराम लक्ष्मणांचे असे ?॥7॥

आर्या च धर्मनिरता धर्मज्ञा धर्मवादिनी ।

**अरोगा चापि कौसल्या माता रामस्य धीमता ॥8॥**

धर्मज्ञ श्रीराम माता कौसल्या धर्मपरायण ।

तिजला होत ना काही कष्ट वा रोग त्रासद? ॥8॥

**कच्चित सुमित्रा धर्मज्ञा जननी लक्ष्मणश्च या।**

**शत्रुघ्नस्य च वीरस्य अरोगा चापि मध्यमा ॥9॥**

माता लक्ष्मण शत्रुघ्ना सुमित्रा मम मध्यमा ।

वीरांची त्या जी धर्मज्ञ असे स्वस्थ आणि सुखी ॥9॥

**आत्मकामा सदा चण्डी क्रोधना प्राज्ञमानिनी ।**

**अरोगा चापि मे माता कैकेयी किमुवाच ह ॥10॥**

आत्ममग्न सदा माने बुद्धीमति स्वत:स जी ।

क्रोधी कैकेयी मम माता आहे ना सुखात ती ?॥10॥

एकूण भरतालाही आपली आई कशी आहे हे चांगलेच ज्ञात आहे.

**एवमुक्तास्तु ते दूता भरतेन महात्मना ।**

**ऊचुः सम्प्रश्रितं वाकमिदं तं भरतं तदा ॥11॥**

ऐसे भरत महात्मा विचारी दूतास तदा ।

विनयपूर्वक दूताने वार्ता सांगितली अशी ॥11॥

कुशलास्ते नरव्याघ्र येषां कुशलमिच्छसि ।
श्रीश्च त्वां वृणुते पद्मा युज्यतां चापि ते रथः॥12॥
पुरुषसिंह कुशल ज्यांचे विचारता सकुशल ते ।
प्रसन्न पद्मा लक्ष्मी रथ जोडुनी तयार व्हा ॥12॥
भरतश्चापि तान् दूतानेवमुक्तोऽभ्यभाषत ।
आपृच्छेऽहं महाराजं दूताः संत्वरयन्ति माम् ॥13॥
वदे भरत तयां दूतां महाराजां विचारतो ।
निघण्या सत्वर दूत सांगुनीया हे तयां ॥13॥

**एवमुक्त्वा तु तान् दूतान् भरतः पार्थिवात्मजः।**

**दूतैःसंचोदिता वाक्यं मातामहमुवाच ह ॥14॥**

दूतांस सांगुनि ऐसे भरत राजपुत्र वदे ।

मातामहांस हे शब्द दूतांनी जे बोलिले ॥14॥

**राजन् पितुर्गमिष्यामि सकाशं दूतचोदितः।**

**पुनरप्यहमेष्यामि यदा मे त्वं स्मरिष्यसि ॥15॥**

राजन् पित्याकडे जातो दूतांनी सांगितले तसे ।

पुन्हा परत येईन स्मरता आपण मला ॥15॥

भरतेनैवमुक्तस्तु नृपो मातामहस्तदा ।
तमुवाच शुभं वाक्यं शिरस्याघ्राय राघवम् ॥16॥
नृपा मातामहा ऐसे सांगे भरत जेधवा ।
मस्तका चुंबुनि त्याच्या शुभवचना बोलती ॥16॥
गच्छ तातानुजाने त्वां कैकेयी सुप्रजास्त्वया ।
मातरं कुशलं ब्रूयाः पितरं च परंतप ॥17॥
कैकेयीच्या सुपुत्रा तू जा तातवचना मानुनी ।
कुशल आमुचे सांग मातापित्यांना तुझ्या ॥17॥

पुरोहितं च कुशलं ये चान्ये द्विजसत्तमाः।
तौ च तात महेष्वासौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ॥18॥

पुरोहितांस तसे अन्य कुशल सांग द्विजोत्तमां ।
तसेच बंधु श्रीरामा लक्ष्मणा महाधनुर्धरां ॥18॥

तस्मै हस्त्युत्तमांचित्रान् कम्बलानजिनानि च ।
सत्कृत्य केकयो राजा भरताय ददौ धनम् ॥19॥

सत्कारार्थ भरताच्या देती ते उत्तम गज ।
तैश्या उत्तम शाली मृगचर्म आणिक धन ॥19॥

**अन्त:पुरेऽतिसंवृद्धान्‌ व्याघ्रवीर्यबलोपमान्‌ ।**

**दंष्ट्रायुक्तान्‌ महाकायान्‌ शुनश्चोपायनं ददौ ॥20॥**

वाढवुनी अन्त:पुरी व्याघ्रसम पराक्रमी ।

श्वानही अनेक ऐसे भरता भेट देति ते ॥20॥

**रुक्मनिष्कसहस्रे द्वे षोडशाश्वशतानि च ।**

**सत्कृत्य केकयी पुत्रं केकयो धनमादिशत्‌ ॥21॥**

द्विसहस्र सुवर्णमुद्रा अश्व षोडशशत तसे ।

केकयकुमार भरता सत्कारुनि धन देति ते ॥21॥

तदामात्यानभिप्रेतान् विश्वास्यांश्च गुणान्वितान् ।
ददावश्वपतिः शीघ्रं भरतायानुयायिनः॥22॥

इष्ट विश्वासु मन्त्र्यांना केकय नृप आपल्या
आज्ञापति अश्वपति जाण्यास भरतासवे ॥22॥

ऐरावतानैन्द्रशिरान् नागान् वै प्रियदर्शनान् ।
खरान् शीघ्रान् सुसंयुक्तान् मातुलोऽस्मै धनं ददौ ॥23॥

ऐरावते इन्द्रशिरे उत्पन्न गज नामांकित ।
तशी खेचरे शिक्षित दिली शीघ्र वेगी तशी ॥23॥

ऐरावत व इन्द्रशिर हे नामांकित हती अनुक्रमे इरावान पर्वत व इन्द्रशिर या स्थानाच्या आसपास पैदा होत असत.

**स दत्तं केकयेन्द्रेण धनं तन्नाभ्यनन्दत ।**

**भरत: केकयीपुत्रो गमनत्वरया तदा ॥24॥**

केकयराज देई जे धन भरता त्यास्तव ।

आभारी होणे न जमे त्वरेने निघण्यामुळे ॥24॥

**बभूव ह्यस्य हृदये चिन्ता सुमहती तदा ।**

**त्वरया वापि दूतानां स्वप्नस्यापि च दर्शनात ॥25॥**

अतिशय त्याच्या तेव्हां चिन्ता वास करीतसे ।
हृदये कारण स्वप्ने तशी दूते त्वरा कृता ॥25॥

**स स्ववेश्माभ्यतिक्रम्य नरनानाश्वसंकुलम् ।**
**प्रपेदे सुमहच्छ्रीमान् राजमारगमनुत्तमम् ॥26॥**

तयार होण्या स्वस्थानी जाती तेथुनी पुढे ।
राजमार्गी धन सर्व गज अश्वादि घेउनी ॥26॥

**अभ्यतीय ततोऽपश्यदन्त:पुरमनुत्तमम् ।**
**ततस्तद् भरत: श्रीमानाविवेशानिवारित: ॥27॥**

मार्ग आक्रमुनी पाही अन्त:पुर परमोत्तम ।
त्वरेने शिरती मध्ये कुठेही नच थांबता ॥27॥

**स मातामहमापृच्छय मातुलं च युधाजितम् ।**
**रथमारुह्य भरतः शत्रुघ्नसहितो ययौ ॥28॥**

आज्जी आजोबा मामा युधाजित मामीसवे ।
भेटुनी सर्वां शत्रुघ्ना सह निघे रथातुनी ॥28॥

**रथान् मण्डलचक्रांश्च योजयित्वा परः शतम् ।**
**उष्टगोऽश्वखरैर्भृत्या भरतं यान्तमन्वयु:॥29॥**

शंभराहुन अधिक रथा अश्वादि जुंपुनी ।

सेवक अनुसरती जाणाऱ्या भरतास त्या ॥29॥

**बलेन गुप्ता भरतो महात्मा सहार्यकस्यात्मसमैरमात्यैः।**

**आदाय शत्रुघ्नमपेतशत्रुहाद् ययौ सिद्ध इवेन्द्रलोकात ॥30॥**

घेउनि शत्रुघ्न सवे महामना भरत रक्षित मातुल सेनेकडुनी।

नाना रथी निघे जणु सिद्ध कोणी इन्द्रलोकातुनी अन्य स्थळी ॥30॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकियेऽयोध्याकाण्डे सप्ततितमः सर्गः॥70॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 71

सा प्राण्मुखो राजा गृहादभिनिर्याय वीर्यवान्।
ततः सुदामाम् द्युतिमान संतीर्वर्ववेक्ष्य तम् नदीम् ॥1॥
ह्लादिनीं दूरपारां च प्रत्यक्स्त्रोत्स्तरंगिणीम् ।
शतद्रुमतरच्छ्रीमान् नदीमिक्ष्वाकुनन्दनः ॥2॥

राजगृहातून निघून भरत जाई पूर्व दिशेकडे ।
सुदामा सरिता पार करी दर्शन घेउनी ॥1॥
ह्लादिनी वाहिनी दूर ओलांडुन ती नदी ।
पश्चिमाभिनुख शतद्रु तीही पार करीतसे ॥2॥
**ऐलधाने नदीं तीप्राप्य चापरपर्वतान् ।**
**शिलामाकुर्वंती ती आग्नेयं शल्यकर्षणम् ॥3॥**
ऐलधान ग्रामे करी पार नदी अपरपर्वती ।
शिला नाम नदी करी जी शिला तीत पडेल त्या।

ती पार करुनी जाई भरत आग्नेयेकडे ।

शल्यकर्षण देशी जिथे उपलब्ध वनस्पती ।

शरीरातिल कांटा काढण्या उपयुक्त जी ॥3॥

ऐलधान,अपरपर्वत व शल्यकर्षण ही गावांची व शिला हे नदीचे नांव आहे

**सत्यसंघः शुचिर्भूत्वा प्रेक्षमाणः शिलावहाम् ।**

**अभ्यगात स महाशैलान् वनं चैत्ररथं प्रति ॥4॥**

शूचिर्भूत सत्यव्रत भरत पाही शिलावहा ।

भव्य पर्वत ओलांडी जाई चित्ररथ वनी ॥4॥

सरस्वतीं च गङ्गां च युग्मेन प्रतिपद्य च ।
उत्तरान् वीरमत्स्यानां भारुण्डं प्राविशत् वनम् ॥5॥

मिळे सरस्वतीस गंगा, देशी वीरमत्स्य त्यापुढे ।
त्यापुढे उत्तरावर्ती देशी करी पदार्पण ।
पुढे जाउन शिरती भारुण्ड नाम वनी ॥5॥

वेगिनीं च कुलिङ्गाख्यां ह्लादिनीं परवतावृताम् ।
यमुनां प्राप्य संतीर्णो बलमाश्वासयत् तदा ॥6॥

पर्वतावृत्त अतिशीघ्र खळाळे जी कुलिङ्गा नदी ।
पार करुनी यमुना तटी थांबती सेनेसह ॥6॥

**शीतीकृत्य तु गात्राणि क्लान्तानाश्वास वाजिनः।**
**तत्र स्नात्वा च पीत्वा च प्रायादादाय चोदकम् ॥7॥**
**राजपुत्रो महारणमनभीक्ष्णोपसेवितम् ।**
**भद्रो भद्रेण् यानेन् मारुत्: खमिवात्यगात् ॥8॥**

श्रान्त अश्वां स्नाने थंड करुनी छायेत खाण्या ।
देउनी स्वत: भरत करुनी स्नान भोजन ॥7॥

जलासह जाती पुढती वेगवान रथातुनि ।
वनातुनी निर्जन त्या वेगे वायु नभी जसा ॥8॥

भागीरथीं दुष्प्रतरां सोंऽशुधाने महानदीम् ।
उपायाद् राघवस्तूर्ण प्राग्वटे विश्रुते पुरे ॥9॥

अंशुधान ग्रामापाशी गंगा दुस्तर पाहुनी ।
विख्यात प्राग्वट ग्रामी भरतसेना येतसे ॥9॥

स गङ्गां प्राग्वटे तीर्वा समायात कुटिकोष्टिकाम् ।
सबलस्तां स तीर्थि समगाद् धर्मवर्धनम् ॥10॥

प्राग्वटी गंगा पार करुनी कुटिकोष्टिका।
नदी पार करूनीया येत ग्रामी धर्मवर्धन ॥10॥

**तोरणं दक्षिणार्धेन जम्बूप्रस्थं समागतम् ।**
**वरूथं च ययौ रम्यं ग्रामं दशरथात्मजः॥11॥**

तोरण ग्रामे दक्षिणार्धे जम्बूप्रस्थे तेथुनी ।
येती दशरथपुत्र रम्य वरूथ ग्रामि ॥11॥

**तत्र रम्ये वने वासं कृत्वासौ प्राङ्मुखो ययौ ।**
**उद्यानमज्जिहानाया: प्रियका यत्र पादपा: ॥12॥**

रम्य वनी करुनी वास प्रात:कालि पूर्वेकडे ।
उज्जिहाना नगरीत उद्यानी कदम्ब वृक्ष बहु ॥12॥

**स तांस्तु प्रियकान् प्राप्य शीघ्रानास्थाय वाजिनः।**
**अनुज्ञाप्याय भरतो वाहिनीं त्वरितो ययौ ॥13॥**

कदम्बवनात शीघ्र रथी भरत बैसुनी ।
आज्ञापि सेनेस येण्या मंद गतीने पुढे ॥13॥

**वासं कृत्वा सर्वतीर्थे तीर्वा चोत्तानिकां नदीम् ।**
**अन्या नदीश्च विविधैः पार्वतीयैस्तुरङ्गमैः॥14॥**

**हस्तिपृष्ठकमासाद्य कुटिकामप्यवर्तत ।**

**ततार च नरव्याघ्रो लोहित्ये च कपीवतीम् ॥15॥**

राहुनी सर्वतीर्थ ग्रामे नद्या उत्तानिकासह ।

ओलांडुनि अश्वरथी पर्वतीय पोचे जाउनी ।

नरश्रेष्ठ भरत ग्रामी हस्तपृष्ठक पुढे नदी ।

कुटिका करी पार पुढे लोहित्य ग्रामातुनी ।

जाउनी करी पार नदी कपीवती नाम जिचे ॥15॥

**एकसाले स्थाणुमती विनते गोमती नदीम् ।**

**कलिङ्गनगरे चापि प्राप्य सालवनं तदा ॥16॥**

स्थाणुमती विनतग्रामापाशी गोमती ओलांडुनी ।

कलिङ्गनगरापाशी सालवनी ते पोचती ॥16॥

**भरतः क्षिप्रमागच्छत सुपरिश्रान्तवाहनः।**

**वनं च समतीत्याशु सर्वर्यामरुणोदये॥17॥**

**अयोध्यां मनुना राज्ञा निर्मितां स ददर्श ह ।**

**तां पुरी पुरुषव्याघ्रः सप्तरात्रोषितःपथि ॥18॥**

अश्व श्रान्त म्हणुनी त्यां देउनि विश्राम शीघ्र ।

सालवन ओलांडुनी प्रभाती मनुनिर्मित ||17||

पुरुषश्रेष्ठ भरता अयोध्या दर्शन होतसे |

सात रात्रि पुऱ्या होता आठव्या दिवशी तयां ||18||

अयोध्याग्रतो दृष्ट्वा सारथिं चेदमब्रवीत |

एषा नातिप्रतीता मे पुण्योद्याना यशस्विनी ||19||

अयोध्या दृष्यते दूरात सारथे पाण्डुमृत्तिका|

यज्विभिर्गणसंपन्नौब्राह्मणैर्वेदपारगै:||20||

भूयिष्ठमृद्धैराकीर्णा राजर्षिवरपालिता |

अयोद्या पुढे पाहून सारथ्या तो वदे असे ।
शोभित पुण्य उद्याने प्रसन्न न दिसे मला ॥18॥
निरंतर यज्ञ करणारे वेदसंपन्न ब्राह्मण ।
राहती तशी धनिक वस्ती ज्यांचे रक्षण ॥19॥
नृपश्रेष्ठ दशरथ करती अयोध्या आज ती ।
दुरून मृत्तिका श्वेत समान दिसते मला ।

**अयोध्यायां पुरा शब्दः श्रूयते तुमुलो महान् ॥21॥**
**समन्तान्नरनारीणां तमद्य न श्रुणोम्यहम् ॥**

उच्चनाद नरनारींचा नेहमी ऐकु येतसे ॥21॥

अयोध्येत तसा आज ऐकू येत नसे मला ।

**उद्यानानि हि सायाह्ने क्रीडित्वोपर्तैर्नरैः॥22॥**

**समन्ताद् विप्रधावद्भिः प्रकाशन्ते ममान्यथा ।**

**तान्यद्यानुरुदन्तीव परित्यक्तानि कामिभिः॥23॥**

उद्यानात सायंकाळी क्रीडा करुनि निवृत्त ॥22॥

जन ते परत जाताना मनोहर दृश्य जे दिसे।

ते जनांनी परित्यक्त केल्याने रडते जणु ॥23॥

अरण्यभूतेव पुरी सारथे प्रतिभाति माम ।
नह्यत्र यानैर्दृश्यन्ते न गजै च वाजिभि:।
निर्यान्तो वाभियान्तो वा नरमुख्या यथा पुरा ॥24॥

अरण्यासम भासे ही पुरी सारथ्या मला ।
न दिसती नरश्रेष्ठ किंवा जन जाति जे।
गज अश्वारूढ किंवा यानातुनि पथावरी ॥24॥

उद्यानानि पुरा भान्ति मत्तप्रमुदितानि च ।
जनानां रतिसंयोगेष्वन्तगुणवन्ति च ॥25॥

**तान्येतान्यद्य पश्यामि निरानन्दानि सर्वशः।**

**स्त्रस्तपरणैरनपथं विक्रोशद्भिरिव द्रुमैः ॥26॥**

उद्यानी असती पूर्वी मदमत्त भ्रमर ,कोकिल।

प्रेममीलनास्तव प्रेमी जनांचे जे प्रीतिस्थळ ॥25॥

पाहतो आनन्दशून्य झालेले वृक्ष पर्णे गाळुनी ।

जणु व्यक्त खेद करती आक्रंदन करूनिया ॥26॥

**नाद्यापि भ्रूयते स्गब्दो मत्तानां मृगपक्षिणाम् ।**

**सरक्तां मधुरां वाणी कलं व्याहरतां बहु ॥27॥**

पक्षी मृग रागयुक्त कलरव मधुरस्वरे ।
करती तोही अद्याप ऐकू येत नसे मज ॥27॥

**चन्दनागुरुसंपृक्तो धूपसम्मूर्च्छितोऽमलः।**
**प्रवाति पवनः श्रीमान्‌ किं नु नाद्य यथा पुरा ॥28॥**

चन्दन अगुरु धूप मिश्रित सुगंधी वायु ।
वाहत पूर्वीप्रमाणे नसे का भासत मज ॥28॥

**भेरीमृदङ्गवीणानां कोणसंघट्टितः पुनः।**
**किमद्य शब्दो विरतः सदादीनगतिः पुरा ॥29॥**

भेरी मृदंग वीणा या वाद्यांचा गजर पूर्वि जो ।
सदा चाले अयोध्येत आज ऐकू का न ये ॥29॥

**अनिष्टानि च पापानि पश्यामि विविधानि च ।**
**निमित्तान्यमनोज्ञानि तेन सीदंति मे मन: ॥30॥**

शकुन अनिष्टकारी विविध दिसती मला ।
मन खिन्न मम होई अशुभसूचक कारणे ॥30॥

**सर्वथा कुशलं सूत दुर्लभं मम बन्धुषु ।**
**तथा ह्यसति सम्मोहे हृदयं मे सीदतीव मे ॥31॥**

वाटे मम बान्धवांचे दुर्लभ कुशलमंगल ।
अकारण त्यामुळेच दु:खित हृदय हे मम ॥31॥

**विषण्णः भ्रान्तहृदयस्त्रस्तः संलुलितेंद्रियः।**
**भरतः प्रविवेशाशु पुरीमिक्ष्वाकुपालितम् ॥32॥**

मन खिन्न हृदय भ्रान्त क्षुब्ध सारी इन्द्रिये ।
अवस्थेत अश्या भरत प्रवेशी इक्ष्वाकुपुरी ॥32॥

**द्वारेण वैजयन्तेन प्राविशच्छ्रान्तवाहनः।**
**द्वाःस्थैरुत्थाय विजयमुक्तेस्तैः सहितो ययौ ॥33॥**

द्वारातुन वैजयन्ती प्रवेशी श्रान्त अश्वांसह ।

“जय हो”बोलून संगे द्वारपालहि चालत ॥33॥

प्रवेशद्वारावर वैजयन्ती पताका फडके म्हणून वैजयन्ती द्वार

स त्वनेकाग्रहृदयो द्वाःस्थं प्रत्यर्च्य तं जनम् ।

सूतमश्वपतेः क्लान्तमब्रवीत तत्र राघवः ॥34॥

अस्वस्थ मने भरत द्वारपाला परतवी ।

अश्वपतीच्या श्रान्त सारथ्यास असे म्हणे ॥34॥

किमहं त्वरयाऽऽनीतः कारणेन विनानघ ।

**अशुभाशङ्कि हृदयं शीलं च पततिव मे ॥35॥**

त्वरेने इतक्या मज का अनघा बोलाविले ।

अशुभशंकेने मम हृदय स्वभाव भ्रष्ट हो ॥35॥

**श्रुता नु यादृशा:पूर्वं नृपतीनां विनाशने ।**

**आकारांस्तानहं सर्वानिह पश्यामि सारथे ॥36॥**

यापूर्वी ऐकले होते विनाशाचे लक्षण जे ।

राजाच्या पहातो येथे ते ते आज मी सुता ॥36॥

**सम्मर्जनविहीतानि परुषाण्युपलक्षये ।**

असंयतकवाटानि श्रीविहीनानि सर्वशः॥37॥
बलिकर्मविहीनानि धूपसम्मोदनेन च ।
अनाशितकुटुम्बानि प्रभाहीनजनानि च ॥38॥
अलक्ष्मीकानि पश्यामि कुटुम्बिभवनान्यहम् ।

सडासंमार्जनाविण रुक्ष उदास गृहे ही ।
बलिवैश्व देवकर्म नसे कवाडे उघडी ॥37॥
धूपसुगन्ध नसे येथे दिसती जन येथिल ।
भोजनाविण उपाशी औदास्य मुखावरी ॥38॥

वाटते घरामधूनी निवास लक्ष्मीचा नसे ।

अपेतमाल्यशोभानि असम्मृष्टाजिराणि च ॥39।

देवागाराणि शून्यानि न भान्तीह यथा पुरा ।

मन्दिरे पुष्पविहीन अस्वच्छ प्रांगणे तशी ॥39॥

देवालये जनविहीन शोभा पूर्वीचि न दिसे ।

देवतार्चाः प्रविद्धाश्च यज्ञगोष्ठास्तथैव च ॥40॥

माल्यापणेषु राहन्ते नाद्य पण्यानि वा तथा ।

दृश्यन्ते वणिजोऽप्यद्य न यथापूर्वमत्र वै ॥41॥

**ध्यानसंविग्नहृदया नष्टव्यापारयन्त्रिताः।**

देवपूजा दिसे बन्द यज्ञशाळेत यज्ञही ॥40॥

विक्रय फूलमाळांचा दुकाने दिसती बन्द ।

विक्रेते पूर्वीप्रमाणे नसती उद्विग्न मुखे ॥41॥

नष्ट विक्रय होऊन व्यवहार थांबती जणु ।

**देवायतनचैत्येषु दीनाः पक्षिमृगास्तथा॥42॥**

**मलिनं चाश्रुपूर्णाक्षं दीनं ध्यानपरं कृशम् ।**

**सस्त्रीपुंसं च पश्यामि जनमुत्कंठितं पुरे ॥43॥**

पशु पक्षी देवालयी चैत्ये दीनवाणे हे ||42||

मलिन मुखे जन नेत्रात अश्रु भरुनी |

दिसती चिन्तित तैसे दुर्बल उत्कंठित ||43||

**इत्येवमुक्त्वा भरतः सूतं तं दीनमानसः|**

**तान्यनिष्टान्ययोध्यायां प्रेक्ष्य राजगृहं ययौ ||44||**

चिह्ने अनिष्टसूचक पहात भरत दीन |

सारथ्या बोलुनि ऐसे राजभवनी प्रवेशात ||44||

**तां शून्यश्रुङ्गाटकवेश्मरथ्यां रजोरुणद्वारकवाटयन्त्राम् |**

दृष्ट्वा पुरीमिन्द्रपुरीप्रकाशां दु:खेन सम्पूर्णतरो बभूव ॥45॥

ती शोभणारी नगरी इन्द्रपुरीसम चौक गृहे रस्ते जिचे ।

दीन शून्य गृहद्वारे धूलिधूसर पाहुनी भरत दु:खित ॥45॥

बभूव पश्यन् मनसोऽप्रियाणि यान्यन्यदा नास्य पुरे बभूवु:।

अवाक्शिरा दीनमना न हृष्टः पितुर्महात्मा प्रविवेश वेश्म ॥46॥

पूर्वी जी नगरात दिसली नवहृती दुर्दशा पाहुनी भरत मस्तक ।

झुकवुनी खाली दु:खित हृदये प्रवेशत भवनी पित्याच्या आपुल्या ॥46॥

**इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे एकसप्ततितमः सर्ग:॥71॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 72

अपश्यंस्तु ततस्तत्र पितरं पितरालये।
जगाम भरतो द्रष्टुं मातरं मातुरालये ॥1॥

पितृभवनि पहाता पिताश्री नच पाहुनी।
जाई भरत मातेस भेटण्यास मातृगृही ॥1॥

**अनुप्राप्तं तु तंदृष्ट्वा कैकेयी प्रोषितं सुतम् ।**

**उत्पपात तदा दृष्ट्वा त्यक्त्वा सौवर्नमासनम् ॥2॥**

परप्रांतातुनी पुत्रा परत येता पाहुनी ।

उठे आनंदित कैकेयी सुवर्णासन सोडुनी ॥2॥

**स प्रविश्यैवधर्मात्मा स्वगृहं श्रीविवर्जितम् ।**

**भरतः प्रेक्ष्य जग्राह जनन्याश्चरणौ शुभौ ॥3॥**

प्रवेशता भवनी पाही नष्ट आनंद तेजही ।

शुभचरणां मातेच्या धर्मात्मा करि स्पर्श तो ॥3॥

तं मूर्ध्नि समुपाघ्राय परिष्वज्य यशस्विनम् ।

अङ्के भरतमारोप्य प्रष्टुं समुपचक्रमे ॥4॥

पुत्रा यशस्वि छातीस लावून मस्तक हुंगुनी ।

अंकावर बसवून कुशल विचारू लागली ॥4॥

अद्य ते कतिचिद् रात्र्यश्च्युतस्यार्यकबेश्मनः।

अपि नाध्वश्रमः शीघ्रं रथेनापततस्तव ॥5॥

अनेक रात्री व्यतीत करुनी मातुलगृही ।

शीघ्र परतता श्रान्त झाला असशील तू ॥5॥

**आर्यकस्ते सुकुशली युधाजिन्मातुलस्तव।**

**प्रवासाच्च सुखं पुत्र सर्व मे वक्तुमर्हसि ॥6॥**

युधाजित मातुल तैसे पितामह कुशल ना ?।

गेल्यापासुनी तू कैसा राहिलास सांग हे मज ॥6॥

**एवं पृष्टस्तु कैकेय्या प्रिय पार्थिवनन्दनः।**

**आचष्ट भरतः सर्वं मात्रे राजीवलोचन ॥7॥**

कैकेयीने विचारता ऐसे प्रिय दशरथनन्दना ।

सर्व वृत्तान्त मातेला सांगे राजीवलोचन ॥7॥

अद्य मे सप्तमी रात्रिश्च्युतस्यार्यक्वेश्मन:।

अम्बाया: कुशलो तातो युधान्मातुलश्च मे ॥8॥

सांगे भरत सप्तरात्रि सोडुनी मातुलगृह ।

युधाजित तव भ्राता सकुशल मातामह ॥8॥

यन्मे धनं च रत्नं च ददौ राजा परंतप ।

परिश्रान्तं पथ्यभवत ततोऽहं पूर्वमागत:॥9॥

राजवाक्यहरैर्दूतैस्त्वर्यमाणोऽहमागत:।

यदहं प्रष्टुमिच्छामि तदम्बा वक्तुमर्हति ॥10॥

धन रत्न जे दिधले कैकेयनरेशे मज ।

वाहना भारे थकल्या सोडुनी शीघ्र वाहने ॥09॥

राजकीय दूतांच्या त्वरित मी येत पुढे ।

तरि आता विचारी मी माते ते सांग तू मला ॥10॥

**शून्योऽयं शयनीयस्ते पर्यङ्को हेमभूषितः।**

**न चायमिक्ष्वाकुजनः प्रहृष्टः प्रतिभाति मे ॥11॥**

सुवर्णभूषित शय्या रिकामी दिसते कशी।

परिजन सर्व पित्यांचे दिसती अप्रसन्न का ॥11॥

**राजा भवति भूयिष्ठमहाम्बाया निवेशने ।**

**तमहं नाद्य पश्यामि द्रष्टुमिच्छन्निहागत:॥12॥**

पिताजी इथे असती परि आज का न ते ।

त्यांच्या दर्शन इच्छेने आलो मी त्वरेने इथे ॥12॥

**पितुर्ग्रहीष्ये पादौ च तं ममाख्याहि पृच्छत:।**

**आहोस्विदम्बाज्येष्ठाया: कौसल्याया निवेशने ॥13॥**

असती पिताजी कोठे पाया त्यांच्या पडेन मी।

ज्येष्ठ मातेच्या भवनी गेले ते आहेत का ?॥13॥

तंप्रत्युवाच कैकेयी प्रियवद घोरमप्रियम् ।

अजानन्तं प्रजानन्ती राज्यलोभेन मोहिता ॥14॥

मोहित राज्यलोभे ती कैकेयी सांगू लागली।

अज्ञान भरता घोर वार्ता जणु प्रिय असे ॥14॥

या गतिः सर्वभूतानां तां गतिं ते पिता गतः।

राजा महात्मा तेजस्वी यायजूकः सतां गतिः॥15॥

तव पिता महाराज पुत्रा तेजस्वी महान् ।

सर्व प्राण्यांची गती अंती तीच त्यांची होतसे॥15॥

तच्छ्रुत्वा भरतो वाक्यं धर्माभिजनवाञ्छुचिः।
पपात सहसा भूमौ पितृशोकबलार्दितः॥16॥
हा हतोऽस्मि कृपणां दीनां वाचमुदीरयन्।
निपपात महाबाहुर्बाहू विक्षिप्य वीर्यवान्॥17॥

ऐकोनिया धर्मशील पुण्यहृदयी वाक्य ते ।
पीडित पितृशोकाने भरत भूमिवरी पडे ॥16॥
हाय मृत मी झालो आक्रंदे शोकमग्न तो ।
धरेवर आपटूनी हात पडे लोळे गडबडा ॥17॥

ततः शोकेन संवीतः पितुर्मरणदुःखितः।

विलालाप महातेजा भ्रान्ताकुलितचेतनः॥18॥

चेतना व्याकुळ भ्रान्त पितृ मरणे दुःखित ।

महातेजस्वी आक्रंदे राजपुत्र चित्ते व्याकुळ ॥18॥

एतत सुरुचिरं भाति पितुर्मे शयनं पुरा ।

शशिनेवामलं रात्रौ गगनं तोयदात्यये ॥19॥

तदिदं न विभात्यद्य विहीनं तेन धीमता ।

व्योमेव शशिना हीनम्प्शुष्क इव सागरः॥20॥

शय्यागृहि असता रात्री चन्द्रापरि सुशोभित ।
निर्मल शरदातिल आकाश होते तेव्हां भासत ॥19॥
तेच महाराज आज बुद्धिमान नसल्यामुळे ।
भासे चन्द्रहीन श्रीहीन सागरापरि शुष्क ते ॥20॥

**बाष्पमुत्सृज्य कण्ठेन स्वात्मना परिपीडितः।**
**प्रच्छाद्य वदनं श्रीमद् वस्त्रेण जयतां वरः॥21॥**

भरत श्रेष्ठ वीर वस्त्रे मुख सुन्दर झाकुनी ।
मने अतिदु:खित भूमी पतित विलाप करी ॥21॥

**तमार्तं देवसंकाशं समीक्ष्य पतितं भुवि।**

**निकृत्तमिवसालस्य स्कन्धं परशुना वने ॥22॥**

**माता मातङ्गसंकाशं चंद्रार्कसदृशंसुतम् ।**

**उत्थापयित्वा शोकार्तं वचनं वेदमब्रवीत ॥23॥**

भरता देवतुल्य पडता भूमीवरि पाहुनी ।

फांदी सालवृक्षाची परशुने कापुनी जशी ॥22॥

गजासम पुष्ट पुत्रा तेजस्वी चंद्रसूर्यासम ।

उठवुनी तया बोले भूमीवरुनि कैकेयी ॥23॥

**उत्तिष्ठोत्तिष्ठ किं शेषे रजन्नत्र महायश:।**

**त्वद्विधा नहि शोचन्ति सन्त: सदसि सम्मता:॥24॥**

उत्तिष्ठ राजकुमारा का पडसी भूमीवरी ।

तुझ्यासम सम्मानित शोक ना करती जनी ॥24॥

**दानयज्ञाधिकारा हि शीलश्रुतितपोनुगा ।**

**बुद्धिस्ते बुद्धिसंपन्न प्रभेवार्कस्य मन्दिरे ॥25॥**

बुद्धि सुस्थिर ज्याची सूर्यमंडल प्रभेसम ।

दान यज्ञ अधिकारी शीलश्रुति अनुसरे ॥25॥

**सरुदित्वा चिरं कालं भूमौ परिविवृत्य च ।**

**जननीं प्रत्युवाचेदं शोकैर्बहुभिरावृत:॥26॥**

करि रूदन बहुकाळ अधिकच शोकाकुल ।

भरत भूमीवरुनी मातेस असे म्हणे ॥26॥

**अभिषेक्ष्यति रामं तु राजा यज्ञं तु यक्ष्यते ।**

**इत्यहं कृतसंकल्पो हृष्टो यात्रामयासिषम् ॥27॥**

श्रीरामा राज्याभिषेक करुनी यज्ञ नृप: स्वत:।

विचारे संतुष्ट होत यात्रा हर्षे मी करी ॥27॥

**तदिदं ह्यन्यथाभूतं व्यवदीर्णं मनो मम ।**

**पितरं यो न पश्यामि नित्यं प्रियहिते रतम् ॥28॥**

पाहुनी सर्व विपरीत विदीर्ण मन हो मम ।

न पाहत पित्या मी जे प्रियजन हितात रत ॥28॥

**अम्ब केनात्यगाद् राजा व्याधिना मय्यनागते ।**

**धन्या रामादयः सर्वे यैः पिता संस्कृतः स्वयम् ॥29॥**

मृत कोणत्या व्याधीने पिता येण्यापूर्वी मम ।

धन्य श्रीरामासह बन्धु करिती अन्त्यसंस्कार जे ॥29॥

**न नूनं मां महाराजः प्राप्तं जानाति कीर्तिमान् ।**

**उपजिघ्रेत तु मां मूर्ध्नि तातः तातः संनाम्य सत्वरम् ॥30॥**

पिता पुज्य महाराज न जाणति आलो मी इथे ।

अन्यथा येउनी शीघ्र मस्तक माझे हुंगती ॥30॥

**क्व स पाणिः सुखस्पर्शतातस्याक्लिष्टकर्मणः।**

**यो हि मां रजसा ध्वस्तमभीक्ष्णं परिमार्जति ॥31॥**

कोठे तातांचा कोमल हस्त कर्म महान जो ।

कर्मे करी विनायास कुरवाळती प्रेमे मज ॥31॥

**यो मे भ्रातापिताबन्धुर्यस्य दासोऽस्मि सम्मत:।**

**तस्य मां शीघ्रमाख्याहि रामस्यक्लिष्टकर्मण:।।32।।**

भ्राता पिता मम बन्धु ज्याचा प्रिय दास मी ।

महान पराक्रमि रामा त्वरे कळव येइ मी ।।32।।

**पिता हि भवति ज्येष्ठो धर्ममार्यस्य जानत:।**

**तस्य पादौ ग्रहीष्यामि स हीदानीं गतिर्मम ।।33।।**

पित्यासम ज्येष्ठ बन्धु धर्मज्ञात्या श्रेष्ठ नरा ।

पद वंदीन मी त्याचे तोच आता गति मला ।।33।।

धर्मविद् धर्मशीलस्य महाभागी दृढव्रत:।

आर्ये किमब्रवीद् राजा पिता मे सत्यविक्रम:।।34।।

पश्चिमं साधुसंदेशमिच्छामि श्रोतुमात्मन:।

धर्माचरणी महाभाग व्रताचरणी दृढव्रत ।

सत्यशील महाराज म्हणाले काय शेवटी ।।34।।

संदेश अन्तिम त्यांचा मज काय ऐकु इच्छितो ।

इति पृष्ट्वा यथातत्त्वं कैकेयी वाक्यमब्रवीत ।।35।।

रामेति राजा विलपन् हा सीते लक्ष्मणेति च ।

**स महात्मा परं लोकं गतो मतिमतां वर:॥36॥**

विचारता भरताने कैकेय़ी सर्व सांगूनी ।

वदे हा राम हा सीते विलाप करुनी पिता ॥36॥

महात्मा मतिश्रेष्ठ प्रस्थान परलोकी करी ।

**इतीमा पश्चिमां वाचं व्याजहार पिता तव ।**

**कालधर्म परिक्षिप्त: पाशेरिव महागज:॥37॥**

पाशबद्ध गजासम विवश होत पिता तव ।

हेच अन्तिम शब्द महाराज बोलले ॥37॥

**सिद्ध्थास्तु नरा राममागतं सह सीतया ।**

**लक्ष्मणं च महाबाहुं द्रक्ष्यन्ति पुनरागतम् ॥38॥**

कृतार्थ होतिल लोक पाहतील येता पुन्हा ।

सीतेसह महाबाहू रामलक्ष्मण सर्वांस या ॥38॥

**तच्छ्रुत्वा विषसादैव द्वितीयाप्रियसंसनात ।**

**विषण्णवदनो भूत्वा भूयः पप्रच्छ मातरम् ॥39॥**

अन्य ही अप्रिय गोष्ट ऐकता भरत दु:खित ।

विषण्ण हो उनि पुन्हा मातेस विचारी पुन्हा ॥39॥

**क्व चेदानीं स धर्मात्मा कौसल्यानन्दवर्धनः।**

**लक्ष्मणेन सह भ्राता सीतया समागतः॥40॥**

कौसल्या मातेचा धर्मात्मा आनंदवर्धन ।

सीता लक्ष्मणासह या क्षणी गेला कुठे ॥40॥।

**तथा पृष्टा यथान्यायमाख्यातुमुपचक्रमे ।**

**मातास्य युगपद्वाक्यं विप्रियं प्रियशंसया ॥41॥**

विचारता भरताने यथाक्रम कैकेयिने ।

तो अप्रिय संवाद कथण्या त्या आरंभिला ॥41॥

स हि राजसुत: पुत्र चीरवासा महावनम् ।

दण्डकान् सह वैदेह्या लक्ष्मणानुवरो गत:॥42॥

श्रीराम राजकुमार वनी दण्डक जातसे ।

वल्कला धारूनी सीतेसह लक्ष्मण त्यासवे ॥42॥

तच्छ्रुत्वा भरतस्त्रस्तो भ्रातुश्चारित्रशङ्कया ।

स्वस्य वंशस्य माहात्म्यात् प्रष्टं समुपचक्रमे ॥43॥

ऐकून भरत शङ्कित भ्रातृश्चारित्र्याप्रति ।

स्मरुनी वंशमहिमा कैकेयिला विचारित ॥43॥

**कच्चिन्न ब्राह्मणधनं हृतं रामेण कस्यचित्।**

**कच्चिन्नाढ्यो दरिद्रो वा तेनापापो विहिंसितः॥44॥**

अपहरण धनाचे रामाने ब्राह्माणाचे कुण्या।

किंवा निष्पाप दरिद्री धनाढ्य वधिला का ?॥44॥

**कच्चिन्न परदारान् वा राजपुत्रोऽभिमन्यते।**

**कस्मात् स दण्डकारण्ये भ्राता रामो विवासितः ॥45॥**

परस्त्रीस श्रीराम मनी वाञ्छीतसे कि काय ते।

अपराध कोणता झाला दण्डकी धाडण्या तया ॥45॥

अथास्य चपला माता तत स्वकर्म यथातथम् ।
तेनेव स्त्रीस्वभावेन व्याहर्तुमुपचक्रमे ॥46॥

स्वभावे चंचल माता अनुसरुन स्त्रीस्वभावा ।
आपले कर्तृत्व यथातथ्य सांगाया मग लागली ॥46॥

एवमुक्त्वा तु कैकेयी भरतेन महात्मना ।
उवाच वचनं हृष्टा वृथापण्डितमानिनी ॥47॥

विचारता भरताने स्वत: पण्डिता मानुनी ।
कर्तृत्वा प्रौढिने हर्षे आपुल्या सांगते तया ॥47॥

**न ब्राह्मणधनं किंचिद्धृतं रामेण कस्यचित ।**

**कश्चिन्नाढ्यो दरिद्रो वा तेनापापो विहीसित:।**

**न राम: परदारान्‍ स चक्षुमपि पश्यति॥48।**

ब्राह्मणधन थोडेही बळे रामे न घेतले ।

किंवा दरिद्रा धनिका निष्पाप वधिले नसे ।

परस्त्रीकडे किंचित दृष्टि त्याची न जातसे ॥48॥

**मया तु पुत्र श्रुत्वैव रामस्येहाभिषेचनम्‍ ।**

**याचितस्ते पिता राज्यं रामस्य विवासनम्‍ ॥49॥**

मीच राज्याभिषेक रामा होणार ऐकुनी।

पित्या मागितले राज्य वनवास रामास्तव ॥49॥

स स्ववृतिं समास्थाय पिता ते तत तथाकरोत ।

रामस्त सहसौमित्रिः प्रेषितः सह सीतया ॥50॥

तमपश्यन प्रियं पुत्रं महीपालो महायशाः।

पुत्रशोकपरिघुनः पञ्चत्वमुपपेदिवान ॥51॥

सत्यप्रतिज्ञ स्वभावे पित्यांनी मानले तसे ।

रामा लक्ष्मणा सीतेस पाठवले त्यांनी वनी ॥50॥

प्रिय पुत्र दृष्टीआड महीपाल महायश।
शोके पीडित होउनी परलोकवासी होति ते ॥51॥

**त्वया त्विदानीं धर्मज्ञ राजत्वमवलम्ब्यताम्।**
**त्वत्कृतेहि मया सर्वमिदमेवंविधंकृतम् ॥52॥**

स्वीकार आता धर्मज्ञा राजपद मी ज्यास्तव।
तुझ्यासाठी सर्व काही केले प्रकाराने अश्या ॥52॥

**मा शोकं मा च संतापं धैर्यमाश्रय पुत्रकः।**
**त्वदधीना हि नगरी राज्यं चैतदनामयन् ॥53॥**

न शोक करि संताप पुत्रा धीर धरी आता ।

नगर निष्कंटक राज्य आता स्वाधीन तुझ्या ॥53॥

**तत पुत्र शीघ्रं विधिना विधिज्ञैर्वसिष्ठमुख्यैः सहितो द्विजेन्द्रैः।**

**संकाल्य राजानमदीनस्त्वमात्मानमुमभिषेचस्व ॥54॥**

तरी विधिवत पुत्रा शीघ्र वसिष्ठादि प्रमुख द्विजां सवे ।

करून महाराजांचा अन्त्यसंस्कार घे राज्याभिषेक करूनिया ॥54॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे द्विसप्ततितमः सर्ग :॥72॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 73

श्रुत्वा च स पितुर्वृत्तं भ्रातरौ च विवासितौ ।
भरतो दु:खसंतप्तो इदं वचनमब्रवीत ॥1॥
पित्याचे वृत्त बंधूंना वनी पाठवले ऐकुनी।
दु:खाने क्रुद्ध होऊनी भरत वचना बोलला ॥1॥
किं नु कार्यं हतस्येह मम राज्येन शोचत:।

**विहीनस्याथ पित्रा च भ्रात्रा पितृसमेन च ॥2॥**

मृत मी असे वाटे पित्याविन पित्यासम ।

भ्राताही सोडुनि जाता करू काय राज्य घेउन॥2॥

**दु:खे मे दु:खमकरोणे क्षारमिवाददा:।**

**राजानं प्रेतभावस्थं कृत्वा रामं च तापसम् ॥3॥**

परलोकीवासी केले महाराजांस तू तसे ।

तपस्वी करुनी रामा मम दु:खावर डागुनी।

चोळलेस जणू मीठ जखमेवर मनी मज ॥3॥

कुलस्य त्वमभावाय कालरात्रिरिवागता ।
अङ्गारमुपगृह्य स्म पिता मे नावबुद्धवान् ॥4॥
करण्या कुलविनाश काळरात्रीसम आलिस ।
पित्याने अनवधाने जणु अङ्गार वेचिला ॥4॥
मृत्युमापादितो राजा त्वया मे पापदर्शिनि ।
सुखं परिहृतं मोहात् कुलेऽस्मिन् कुलपांसनि ॥5॥
पापिणी महाराजांचा मृत्यु घडवुनि या कुला ।
मोहवश ढकलून दु:खात कुलकलङ्किनी ॥5॥

**त्वां प्राप्य हि पिता मेऽयं सत्यसंधो महायशा:।**

**तीव्रदु:खाभिसंतप्तो वृत्तो दशरथो नृप:॥6॥**

सत्यव्रत महायशस्वी पिता मम तुझ्यामुळे ।

दु:खसंतप्त होऊनी प्राणत्याग करीतसे ॥6॥

**विनाशितो महाराज: पिता मे धर्मवत्सल:।**

**कस्मात प्रव्राजितो राम: कस्मादेव वनं गत:॥7॥**

सांग का नाशियलेस धर्मवत्सल मम पित्या ।

रामास घर सोडूनी विवश वनी जावया ॥7॥

**कौसल्या च सुमित्रा च पुत्रशोकाभिपीडिते।**

**दुष्करं यदि जीवेतां प्राप्य त्वां जननीं मम ॥8॥**

कौसल्या आंणि सुमित्रा पुत्रशोके दु:खित ।

तुझ्यामुळे मम माते जगणेहि दुष्कर तयां ॥8॥

**नन्वार्योऽपि च धर्मात्मा त्वयि वृत्तिमनुत्तमाम् ।**

**वर्तते गुरुवृत्तिज्ञो यथा मातरि वर्तते ॥9॥**

श्रीराम धर्मात्मा जाणे वागावे गुरूंशी कसे ।

स्वमातेसम तुजशी वागत होते उत्तम ॥9॥

**तथा ज्येष्ठा हि मे माता कौसल्या दीर्घदर्शिनी ।**

**त्वयि धर्मं समास्थाय भगिन्यामिव वर्तते ॥10॥**

ज्येष्ठ माता तशी माझी कौसल्या दूरदर्शिनी ।

धर्मवत्सल तुजसंगे भगिनीसम वागते ॥10॥

**तस्याः पुत्रं महात्मानं चीरवल्कलवाससम् ।**

**प्रव्राज्य चीरवसनं किं नु पश्यसि कारणम् ॥11॥**

पापिणी तिच्या पुत्रास वल्कल धारुनि धाडसी ।

वनी रहावया खेद तुज किञ्चित न होतसे ॥11॥

**अपापदर्शिनं शूरं कृतात्मानं यशस्विनम् ।**

**प्रव्राज्य चीरवसनं किं नु पश्यसि कारणम् ॥12॥**

यशस्वी श्रीराम निष्पाप शूरवीर पवित्रात्मा ।

काय मिळविशी त्याला वल्कलधारी धाडुनी ॥12॥

**लुब्धाया विदितो मन्ये न तेऽहं राघवं यथा ।**

**तथा ह्यनर्थो राज्यार्थं त्वयाऽऽनीतो महानयम् ॥13॥**

लुब्धे न जाणसि माझा काय भाव रामाप्रति ।

त्याचमुळे राज्यासाठी करसी महाअनर्थ तू ॥13॥

**अहं हि पुरुषव्याघ्रावपश्यन् रामलक्ष्मणौ ।**

**केन शक्तिप्रभावेण राज्यं रक्षितमुत्सहे ॥14॥**

श्रीराम लक्ष्मण दोघां पुरुषसिंहां न पाहता ।

शक्तिप्रभावे कुठल्या रक्षण्या राज्य शक्त मी ॥14॥

**तं हि नित्यं महाराजो बलवन्तं महौजसम् ।**

**उपाश्रितोऽभूद् धर्मात्मा मेरुर्मेरुवनं यथा ॥15॥**

घेत असति रामाचा महाराजही आश्रय ।

बलवन्त गिरि मेरू जसा घेत वनश्रिचा ॥15॥

**सोऽहं कथमिमं भारं महाधुर्यसमुद्यतम् ।**

**सकामां न करिष्यामि त्वामहं पुत्रगर्द्धिनीम् ॥16॥**

धुरंधरासम भार करू धारण मी कसा ।

वासरु जसे भार न बैलासम घेतसे ॥16॥

**अथवा मे भवेच्छिक्तर्योगैर्बुद्धिबलेन वा।**

**सकामां न करिष्यामि त्वामहं पुत्रगर्द्धिनीम् ॥17॥**

जरी उपाये अन्य किंवा बुद्धिबले मम।

पोसू शकलो जनां तरी न करणार मी ॥17॥

**न मे विकांक्षा जायेत त्यक्तुं त्वां पापनिश्चयाम् ।**

**यदि रामस्य नावेक्षा त्वयि स्यान्मातृवत सदा ॥18॥**

जर मातेसम तुला राम न मानता तर ।

तुझ्यासम पापिणीस त्यागण्या क्षिति ना मज॥18॥

**उत्पन्न तु कथं बुद्धिस्तवेयं पापदर्शिनी ।**

**साधुचरित्रविभ्रष्टे पूर्वेषां नो विगर्हिता ॥19॥**

उत्तम कुलातुन भ्रष्ट निन्दित पूर्वजे मम ।

पापदृष्टि कशी बुद्धि उत्पन्न तुझ्यात ही ?॥19॥

**अस्मिन् कुले हि सर्वेषां ज्येष्ठो राज्योऽ भिषिच्यते ।**

**अपरे भ्तरस्तस्मिन् प्रवर्तन्ते समाहिता:॥20।**

कुळात आमुच्या ज्येष्ठ राज्याभिषेक हो तया ।

बंधु इतर आज्ञेत त्याच्या कार्य करीति ते ॥20॥

**नहि मन्यसे नृशंसे त्वं राजधर्ममवेक्षसे ।**

**गतिं वा न विजानासि राजवृत्तस्य शाश्वतीम् ॥21॥**

न जाणसि राजधर्म पाळण्या अनभिज्ञ तू।

क्रूर स्त्रिये अक्षम तू राजनियमां पाळण्या ॥21॥

**सततं राजपुत्रेषु ज्येष्ठो राजाभिषिच्यते ।**

**राज्ञामेतत समं तत स्यादिक्ष्वाकूणां विशेषत:।।22।।**

राजपुत्रातिल ज्येष्ठा राज्याभिषेक होतसे ।

नियम जो सर्वत्र इक्ष्वाकुकुले विशेषत:।।22।।

**तेषां धर्मैकरक्षाणां कुलचारित्रशोभिनाम्।**

**अद्य चारित्र्यशौटीर्यं त्वां प्राप्त विनिवर्तितम् ।।23।।**

सुशोभित सदाचारे पाळण्या धर्म जागृत ।

वैशिष्ट्य हे चारित्र्याचे नष्ट होत तुझ्यामुळे।।23।।

तथापि सुमहाभागे जनेन्द्रकुलपूर्वके ।
बुद्धिमोहः कथमयं सम्भूतस्त्वयि गर्हितः॥24॥

जन्म तुझा राजकुळी महाभागे तरीहि हा ।
निंद्य बुद्धिमोह असा कसा उत्पन्न होतसे ॥24॥

न तु कामं करिष्यामि तवाहं पापनिश्चये ।
यया व्यसनमारब्धं जीवितान्तकरं मम ॥25॥

इच्छा तव पापिणी हे पूर्ण ना करणार मी ।
संकटी लोटसी मजला प्राणही मम घेइ जे ॥25॥

**एष त्विदानीमेवाहमप्रियार्थं तवाघनम्।**

**निवर्तयिष्यामि वनाद् भ्रातरं स्वजनप्रियम् ॥26॥**

तुला अप्रिय करीन परत आणुनि वनातुनी ।

निष्पाप भ्रात्या श्रीरामा स्वजनां अतिप्रिय जो॥26॥

**निवर्तयित्वा रामं च तस्याहं दीप्ततेजसः।**

**दासभूतो भविष्यामि सुस्थितेनान्तरात्मना ॥27॥**

श्रीरामा दीप्ततेजस्वी परत आणुनि दास मी ।

त्याचा बनून व्यतीत स्वस्थचित्ते जीवन करी ॥27॥

इत्येवमुक्त्वा भरतो महात्मा प्रियेतरैर्वाक्यगणैस्तुदंस्ताम् ।
शोकार्दितश्चापि ननाद भूयः सिंहो यथा मन्दरकन्दरस्थः॥28॥

बोलूनि ऐसे भरत महात्मा कैकेयिला अपशब्द बोलुनी ।
स्वरे कृद्ध गर्जना करी अशी गुहेत बसलेला सिंहच जसा ॥28॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे त्रिसप्ततितमः सर्गः ॥73॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 74

**तां तथा गर्हयित्वा तु मातरं भरतस्तदा ।**
**रोषेण महताविष्टः पुनरेवाब्रवीद् वचः॥1॥**

निन्दा करुनि मातेची अशी भरताने पुन्हा ।
क्रोधाविष्ट होऊनी तो कठोर वचना वदे ॥1॥

राज्याद भ्रंशस्व कैकेयि नृशंसे दुष्टचारिणि ।
परित्याक्तासि धर्मेण मा मृतं रुदती भव ॥2॥
राज्यभ्रष्ट तू होशील कैकेयी दुष्ट चारिणी।
धर्मे परित्यक्ता व्यर्थ रुदन तव महाराजांस्तव॥2॥
किं नु तेऽदूषयद् रामो राजा वा भृशधार्मिकः।
यस्योर्मृत्युर्विवासश्च त्वत्कृते तुल्यमागतौ ॥3॥
श्रीराम वा पिताश्रींनी काय दु:ख तुला दिले ।
ज्यामुळे भोगण्या मृत्यु वनवासा तू कारण ॥3॥

**भ्रूणहत्यामसि प्राप्ता कुलस्यास्य विनाशनात ।**

**कैकेयि नरकं गच्छ मा च तातसलोकताम् ॥4॥**

कुलाचा विनाश करुनी पाप भ्रूणहत्येचे तुज।

नरकात जाशील तू पित्याच्या लोकि ना सवे ॥4॥

**यत्त्वया हीदृशं पापं कृत घोरेण कर्मणा।**

**सर्वलोकप्रियं हित्वा ममाप्यापादितं भयम् ॥5॥**

घोर पाप करसी जे सर्वलोकप्रिया रामा ।

पाठवून वनी केले मजही भय उपस्थित ॥5॥

**त्वत्कृते मे पिता वृत्तो रामश्चारण्यमाश्रित:।**

**अयशो जीवलोके च त्वयाहं प्रतिपादित:॥6॥**

तुजमुळे पित्या मृत्यु श्रीरामा वनवासही ।

अपयशा जीवलोकी त्यामुळे मीहि भोगतो ॥6॥

**मातृरूपे ममामित्रे नृशंसे राज्याकामुके ।**

**न तेऽहमभिभाष्योऽस्मि दुर्वृत्ते पतिघातिनी ॥7॥**

राज्यलोभे क्रूर कर्मे शत्रु तू मातृरूपे मम ।

तुजसवे न बोलीन दुष्कर्मी पतिघातिनी ॥7॥

**कौसल्या च सुमित्रा च याश्चान्या मम मातरः।**

**दुःखेन महताविष्टास्त्वां प्राप्य कुलदूषिणीम् ॥8॥**

कौसल्या सुमित्रा तैश्या माता इतर सर्वही ।

कुलकलङ्किनी दुःखी महान् तव कारणे ॥8॥

**न त्वमश्वपतेः कन्या धर्मराजस्य धीमतः ।**

**राक्षसी तत्र जातासि कुलप्रध्वंसिनी पितुः॥9॥**

धर्मराज अश्वपतीची कन्या नसुनि राक्षसी ।

जन्मुनी करि विध्वंस पित्याच्या कुलाचा मम ॥9॥

**यत त्वया धार्मिको रामो नित्यं सत्यपरायण:।**

**वनं प्रस्थापितो वीर: पितापि त्रिदिवं गत:॥10॥**

**यत प्रधानासि तत पापं मयि पित्रा विनाकृते ।**

**भ्रातृभ्यां च परित्यक्ते सर्वलोकस्य चाप्रिये ॥11॥**

ज्या तुजमुळे श्रीराम धार्मिक सत्यपरायण ।

वनी जाइ वीर तसे स्वर्गवासी पिता मम ॥10॥

मज या सर्व पापांनी पितृहीन केले तसे ।

बंधूंना मुकलो दोन अप्रिय मी सर्व जगा ॥11॥

कौसल्या धर्मसंयुक्ता वियुक्तां पापनिश्चये ।
कृत्वा कं प्राप्स्यसे ह्यद्य लोकं निरयगामिनि ॥12॥
कौसल्येस धर्मपरायण पति पुत्रा वञ्चित ।
करुनी कोणत्या लोकी जाशील नरकगामिनी ॥12॥
किं नावबुध्यसे क्रूरे नियतं बन्धुसंश्रयम् ।
ज्येष्ठं पितृसम रामं कौसल्यायात्मसम्भवम् ॥13॥
कौसल्यापुत्र श्रीराम ज्येष्ठ बन्धु पित्यासम ।
बन्धूंना आश्रय हे तू क्रूरे जाणसी न का ॥13॥

**अङ्गप्रत्यङ्गजः पुत्रो हृदयाच्चिभजायते ।**

**तस्मात प्रियतरो मातुः प्रिया एव तु बान्धवाः ॥14॥**

अंगप्रत्यंग मातेचे तसेच हृदयातुनी ।

पुत्र उत्पन्न मातेस अधिक प्रिय इतरांहुनी ॥14॥

**अन्यदा किल धर्मज्ञा सुरभिः सुरसम्मता ।**

**वहमानौ ददर्शोर्त्यां पुत्रौ विगतचेतसौ ॥15॥**

पूर्वी कधी सुरभीने पृथ्वीवर पुत्रा दोन।

पाहिले होती अचेत नांगर ओढता ओढता ॥15॥

**तावर्धदिवसं श्रान्तौ दृष्ट्वा पुत्रौ महीतले ।**

**रुरोद पुत्रशोकेन बाष्पपर्याकुलेक्षणम् ॥16॥**

माध्यान्ह पर्यंत श्रान्त पुत्रां पाहुनि आपल्या ।

पुत्रशोके रडे अश्रु येति नेत्रातुनी तिच्या ॥16॥

**अथस्ताद् व्रजतस्तस्या: सुरराज्ञो महात्मन:।**

**बिन्दव: पतिता गात्रे सुक्ष्मा: सुरभिगन्धिन:॥17॥**

समयी त्या देवराज असती जात खालुनी ।

अश्रुबिन्दु सुगन्धित पडती त्यांच्या देहावरी ॥17॥

**निरीक्षमाणस्तां शक्रो ददर्श सुरभिं स्थिताम् ।**

**आकाशे विष्ठितां दीनां रुदतीं भृशदु:खिताम् ॥18॥**

वर पहाता इन्द्राने पाहि सुरभि आकाशी ।

दीनभावे अत्यन्त रुदन ती करीतसे ॥18॥

**तांदृष्ट्वा शोकसंतप्तां वज्रपाणिर्यशस्विनीम् ।**

**इन्द्रः प्राञलिरुद्विग्नः सुरराजोऽब्रवीद् वचः॥19॥**

सुरभि यशस्विनीस शोकसंतप्त पाहुनी ।

उद्विग्न हात जोडूनी वज्रधारी म्हणे तिला ॥19॥

**भयं कच्चिन्न चास्मासु कुतश्चिद विद्यते महत ।**

**कुतोनिमित्त: शोकस्ते ब्रूहि सर्वहितैषिणि ॥20॥**

सर्वहितकारिणि देवी आम्हास भय नसे इथे ।

कोणत्या कारणे शोक तुज हा प्राप्त होतसे ॥20॥

**एवमुक्त्वा तु सुरभि: सुरराजेन धीमता ।**

**प्रत्युवाच ततो धीरं वाक्यं वाक्यविशारदा॥21॥**

बुद्धिमान इंद्राने ऐसे विचारता सुरभिने ।

चतुर धीर स्वभावे असे उत्तर दिले ॥21॥

**शान्तं पापं न वः किंचित कुतश्चिदमराधिप ।**

**अहं तु मग्नौ शोचामि स्व पत्रौ विषमे स्थितिः॥22॥**

शान्त व्हा देवेन्द्रा भय तुम्हा वाटो नये ।

मी केवळ मम पुत्रांचे हाल पाहुनी दुःखित ॥22॥

**एतौ दृष्ट्वा कृशौ दीनौ सूर्यरश्मिप्रतापितौ ।**

**वध्यमानौ बलीवर्दौ कर्षकेण दरात्मना ॥23॥**

दीन हे कृश वृषभ तप्त सूर्यकिरणांमुळे ।

यांशियाय त्यांना पीडा कृशक दुष्टहि देतसे ॥23॥

**मम कायात प्रसूतौ हि दु:खितौ भारपीडितौ।**

**यौ दृष्ट्वा परितप्येऽहं नास्ति पुत्रसम: प्रिय: ॥24॥**

मजपासून उत्पन्न दु:खी पीडित पाहुनी ।

शोकसंतप्त मातेस पुत्रासम प्रिय ना कुणी ॥24॥

**यस्या: पुत्रसहस्त्रेस्तु कृत्स्नं व्याप्तमिदं जगत ।**

**तां दृष्ट्वा रुदतीं शक्रो न सुतान्मन्यते परम् ॥25॥**

सहस्त्र पुत्र जिचे जगती त्या कामधेनुला ।

असे पाहून इंद्रास पुत्रांची महति कळे ॥25॥

**इन्द्रो ह्यश्रुनिपातं तं स्वगात्रे पुण्यगन्धिनम् ।**

**सुरभि मन्यते दृष्ट्वा भूयसी तामिहेश्वरः ॥26॥**

पवित्र गन्धित अश्रु पाहुनि देवेश्वरे तिला ।

देवी सुरभीस जगी सर्वश्रेष्ठ मानीयले ॥26॥

**समाप्रतिमवृत्ताया लोकधारणकाम्यया ।**

**श्रीमत्या गुणमुख्यायाः स्वभवपरिचेष्टया ॥27॥**

**यस्याः पुत्रसहस्राणि साप्पि शोचति कामधुक ।**

**किं पुनर्या विना रामं कौसल्या वर्तयिष्यति ॥28॥**

हितकर सर्व प्राण्यां समान रूपे जी असे ।
स्वभावे जिचे सम्पन्न सत्यरूप मुख्य गुण ।।।27।।
सहस्रावधि जिला पुत्र कष्ट होता दुःखि ती ।
जिचा एकच पुत्र कौसल्या रामाविना कशि ।।28।।

**एकपुत्राच साध्वी च विवत्सेयं त्वया कृता ।**
**तस्मात त्वं सततं दुःखं प्रेत्य चेह स लप्स्यसे ।।29।।**

एकपुत्रा कौसल्येस पुत्रहीन केलेस तू ।
त्यामुळे इथे परलोकी सदा दुःखित होशिल ।।29।।

**अहं त्वपचितिं भ्रातुः पितुष्च सकलामिमाम ।**

**वर्धनं यशसश्चापि करिष्यामि न संशयः ॥30॥**

राज्य देउनि बन्धूस पूजिन तसे पित्या।

करुनी अन्त्यसंस्कार पूर्णरूपे पूजिन ।

कर्म करिन ऐसे मी ज्यामुळे यश वर्धन ॥30॥

**आनाय्य च महाबाहुं कोसलेन्द्रं महाबलम् ।**

**स्वयमेव प्रवेक्ष्यामि वनं मुनिनिवेषेवितम् ॥31॥**

कोसलनरेश रामास महाबली महाबाहु ।

परत आणुनि जाईन मुनिजनसेवित मी वनी ॥31॥

**नह्यहं पापसंकल्पे पापे पापं त्वया कृतम् ।**

**शक्तो धारयितुं पौरैरश्रुकण्ठैर्निरीक्षित: ॥32॥**

पापिणि तुझ्या पापे दु:खी पाहुनि पौरजना ।

पापांचा भार सोसणे नसे होत शक्य मज ॥32॥

**सा त्वमग्निं प्रवेश वा स्वयं वा विश दण्डकान् ।**

**रज्जु बद्ध्वा कण्ठे नहि तेऽन्यत् परायणम् ।33॥**

प्रवेश करि आगीत किंवा जा दण्डकवनी ।

लावी वा गळ्यास फास नसे अन्य तुला गति ॥33॥

**अहमप्यवनीं प्राप्ते रामे सत्यपराक्रमे।**

**कृतकृत्यो भविष्यामि विप्रवासितकल्मषः॥34॥**

पदार्पण अयोध्येत रामाचे सत्यपराक्रमी ।

कलङ्क मम जाऊन कृतकृत्य होईन मी ॥34॥

**इति नाग इवारण्ये तोमराङ्कशतोदितः।**

**पपात भुवि संक्रुद्धो निःशसन्निव पन्नगः ॥35॥**

तोमर अंकुश पीडित गज मूर्च्छित जसा ।
पडुनि भरत कृद्ध फुत्कारत नागापरी ॥35॥

**संरक्तनेत्रः शिथिलाम्बरस्तथा विधूतसर्वाभरणः परंतपः।**
**बभूव भूमौ पतितो नृपात्मजः शचीपतेः केतुरिवोत्सवक्षये ॥36॥**

पडे खालि ध्वज उत्सवान्ती शचीपतीचा भरत राजपुत्र तसा ।
शिथील वस्त्रे संक्रुद्ध नेत्र तुटून आभूषणे सर्व राही पडून ॥36॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्येऽयोध्याखण्डे चतुःसप्ततितमः सर्गः॥74॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 75

दीर्घकालात समुत्थाय संज्ञां लब्ध्वा स वीर्यवान।

नेत्राभ्यामश्रूपूर्णाभ्यां दीनमुद्तीक्ष्य मातरम ॥1॥

सोऽमात्यमध्ये भरतो जननीमभ्यलुत्सयत।

दीर्घकाले शुद्धीवर येता भरत पराक्रमी ।

अश्रुपूर्ण नेत्रे दीन बैसल्या मातेकडे ॥1॥

मन्त्र्यांमध्ये तिची निंदा करी बोलुनि असे ।

राज्यं न कामये जातु मन्त्रये नापि मातरम् ॥2॥

अभिषेकं न जानामि योऽभूद् राज्ञा समीक्षित:।

विप्रकृष्ट ह्यहं देशे शत्रुघ्नसहितोऽभवम् ॥3॥

मज इच्छा न राज्याची मातेस नच बोललो ॥2॥

मन्त्रिवर महाराज जेव्हां वदति निश्चय ।

अभिषेक कुणा करणे मी दूर शत्रुघ्नासह ॥3॥

वनवासं न जानामि रामस्याहं महात्मन: ।

विवासनं च सौमित्रे: सीतायाश्च यथाभवत ॥4॥

महात्मा श्रीरामाचा मी वनवास नच जाणतो ।
तसेच लक्ष्मण सीता यांचे निर्वाचन कसे ॥4॥

**तथैव क्रोशतस्तस्य भरतस्य महात्मनः ।**
**कौसल्या शब्दमाज्ञाय सुमित्रा चेदमब्रवीत ॥5॥**

मातेस कोसता ऐसे महात्मा भरत ऐकुनी ।
जाणून स्वर कौसल्या सुमित्रेस तदा म्हणे ॥5॥

**आगतः क्रूरकार्यायाः कैकेय्या भरतः सुतः।**
**तमहं द्रष्टमिच्छामि भरतं दीर्घदर्शिनम ॥6॥**

क्रूरकर्मी कैकेयीचा पुत्र आलेला दिसे ।
भरत दूरदर्शी तो तया मी भेटु इच्छिते ॥6॥

**एवमुक्त्वा सुमित्रां तां विवर्णवदना कृशा ।**
**प्रतस्थे भरतो यत्र वेपमाना विचेतना ॥7॥**

सुमित्रेस बोलुनि ऐसे कौसल्या दीन दुर्बळ ।
भरत ज्या असे स्थानी जाई तेथ कांपत ॥7॥

**स तु राजात्मजश्चापि शत्रुघ्नसहितस्तदा ।**
**प्रतस्थे भरतो येन कौसल्याया निवेशनम् ॥8॥**

तदा भरत शत्रुघ्न तेही त्याच पथावरी ।
कौसल्या भवनाकडे जात पूर्वी असति ते ॥8॥

**ततः शत्रुघ्नभरतौ कौसल्या प्रेक्ष्य दुःखितौ ।**
**पर्यश्वजेतां दुःखार्ता पतितां नष्टचेतनाम् ॥9॥**
**रुदन्तौ रुदती दुःखात समेत्यार्या मनस्विनी ।**
**भरतं प्रत्युवाचेदं कौसल्या भृशदुःखिता ॥10॥**

भरत शत्रुघ्न दुरून पाहति माता येतसे ।
दुःखव्याकुळ कौसल्या पडे बेशुद्ध भूवरी ॥9॥

जाती ते तिच्याजवळी स्फुंदती कौसल्या तयां।

जवळ घेत रुदन करित भरतास असे म्हणे ॥10॥

**इदं ते राज्यकामस्य राज्यं प्राप्तमकंटकम् ।**

**सम्प्राप्तं बत कैकेय्या शीघ्रं क्रूरेण कर्मणा ॥11॥**

राज्याकांक्षी तुला राज्य निष्कंटक जरी मिळे।

कैकेयीने क्रूर कर्म करुनी ते मिळवले असे ॥11॥

**प्रस्थाप्य चीरवसनं पुत्रं मे वनवासिनम् ।**

**कैकेयी कं गुणं तत्र पश्यति क्रूरदर्शिनी ॥12॥**

वल्कले धारुनि पुत्रा पाठवूनी वनी मम ।
क्रूरदृष्टि कैकेयिने मिळविले काय त्यातुन ॥12॥

**क्षिप्रं मामपि कैकेयी प्रस्थापयितुमर्हति ।**
**हिरण्यनाभो यत्रास्ते सुतो मे सुमहायशाः ॥13॥**

कैकेयीने पाठवावे मज शीघ्र स्थानि जिथे।
जयाची सुवर्णनाभि पुत्र माझा जिथे असे ॥13॥

**अथवा स्वयमेवाहं सुमित्रानुचरा सुखम् ।**
**अग्निहोत्रं पुरस्कृत्य प्रस्थास्ये यत्र राघवः॥14॥**

किंवा स्वत: मीच सुखे सुमित्रेसह प्रस्थान ।

जाण्या करीन ज्या स्थानी श्रीराम निवास करी॥14॥

**कामं वा स्वयमेवाद्य तत्र मां नेतुमर्हसि।**

**यत्रासौ पुरुषव्याघ्रस्तप्यते मे सुतस्तप: ॥15॥**

किंवा तूच स्व इच्छेने घेउनी मज त्यास्थळी ।

जाइ जिथे मम पुत्र श्रीराम नरव्याघ्र करी तप ॥15॥

**इदं हि तव विस्तीर्णं धनधान्यसमाचितम् ।**

**हस्त्यश्वरथसंपूर्णं राज्यं निर्यातितं तया ॥16॥**

हे धनधान्यसम्पन्न गज अश्व रथे युक्त ।

राज्य विस्तीर्ण दिधले आहे कैकेयिने तुला ॥16॥

**इत्यादिबहुभिर्वाक्यैः क्रूरैः सम्भर्त्तितोऽनघः।**

**विव्यथे भरतोऽतीव व्रणे तुद्येव सूचिना ॥17॥**

कठोर वच बोलूनी भरता निरपराध जो ।

घावावर सुई टोचावी होई त्यास व्यथा तशी ॥17॥

**पपात चरणौ तस्यास्तदा सम्भ्रान्तचेतनः।**

**विलप्य बहुधासंज्ञो लब्धसंज्ञस्तदाभवत ॥18॥**

पडे चरणी सम्भ्रान्त बहु दु:ख चित्ती तया ।
विलपित हो बेशुद्ध सचेत अल्पावधीमधे ॥18॥

**एवं विलपमानां तां प्राञ्जलिर्भरतस्तदा ।**
**कौसल्यां प्रत्युवाचेदं शोकैर्बहभिरावृताम् ॥19॥**

शोके दु:खित विलाप माता कौसल्या करी ।
भरत हात जोडूनि तिला बोले वाक्य हे ॥19॥

**आर्ये कस्माजानन्तं गर्हसे मामकल्मषम् ।**
**विपुलां च मम प्रितं स्थितां जानासि राघवे ॥20॥**

मज ज्ञात नसे काही निरपराधी मी का मज ।

दोष देता मज श्रीराम किती प्रिय जाणता तुम्ही ?॥20॥

**कृतशास्त्रानुगा बुद्धिर्मा भूत् तस्य कदाचन ।**

**सत्यसंध: सतां श्रेष्ठो यस्यार्योऽनुमते गत:॥21॥**

वनी सत्यप्रिय राम जाई अनुमतीने जिच्या ।

पापी बुद्धि तिची शास्त्रा जाणत नसणार ती ॥21॥

**प्रेष्यं पापीयसां यातु सूर्य च प्रति मेहतु ।**

**हन्तु पादेन गा: सुप्ता यस्यार्योऽनुमते गत:॥22॥**

व्यक्ती पापी असणार करुनी मुख सूर्याकडे ।

करी मलमूत्रविसर्जन लाथाडी सुप्त गाइस ॥22॥

कारयित्वा महत् कर्म भर्ता भृत्यमनर्थकम् ।

अधर्मो योऽस्य सोऽस्यास्तु यस्यार्योऽनुमते गतः॥23॥

वनी पाठवि श्रीरामा लागे पाप त्या स्वामिचे ।

महत् कृत्य करणाऱ्या सेवका मूल्य न देतसे ॥23॥

परिपालयमानस्य राज्ञो भूतानि पुत्रवत् ।

ततस्तु द्रुह्यतां पापं यस्यार्योऽनुमते गतः॥24॥

नृपाचा प्रजापालन करणाऱ्या पुत्रापरि ।
करी द्रोह तया पाप लागे जे त्यास लागते ॥24॥

बलिषडभागमुद्धृत्य नृपस्यारक्षितुः प्रजाः।
अधर्मो योऽस्य सोऽस्यास्तु यस्यार्थोऽनुमते गतः॥25॥

आय शष्ठांश घेउनी प्रजारक्षण ना करी ।
नृपाचे पाप त्या लागे जो रामा वनि पाठवी ॥25॥

संश्रुत्य च तपस्विभ्यः सत्रे वै यज्ञदक्षिणाम् ।
तां चापलपतां पापं यस्यार्थोऽनुमते गत :॥26॥

यज्ञी श्रमती द्विजां त्या विहित दक्षिणा न जो ।

देई पाप तेच लागे जो रामा वनि पाठवी ॥26॥

**हस्त्यश्वरथसम्बाधे युद्धे शस्त्रसमाकुले ।**

**मा स्म कार्षीत सतां धर्मे यस्यार्योऽनुमते गतः॥27॥**

गज अश्व रथ युक्त संग्रामे शस्त्रपूरित।

सत्पुरुषधर्म न पाळे पाप लागेल ते तया ॥27॥

**उपदिष्टं सुसूक्ष्मार्थं शास्त्रं यत्नेन धीमता ।**

**स नाशयतु दुष्टात्मा यस्यार्योऽनुमते गतः ॥28॥**

पाठवी वनि श्रीरामा नाश पावेल दुष्टात्मा ।
बुद्धिमान् गुरु देई त्या शास्त्रा विसरेल तो ॥28॥

**मा च तं व्यूढ्बाह्रसं चन्द्रभास्करतेजसम् ।**
**द्राक्षीद् राज्यस्थमासीनं यस्यार्योऽनुमते गतः ॥29॥**

विशाल बाहु तेजस्वी चन्द्रसूर्यसम सिहासनी ।
श्रीराम बसे पाहू न शके पाठवि जो वनी तया ॥29॥

**पायसं कृसरं छागं वृथा सोऽश्नातु निघृणः।**
**गुरूंश्चाप्यवजानातु यस्यार्योऽनुमते गतः॥30॥**

पाठवी वनी श्रीरामा निष्फळ त्याचे होईल ।

भक्षण क्षीर खिचडी गुरु देवा न सांगता ॥30॥

**गाश्च स्पृशतु पादेन गुरून् परिवदेत च ।**

**मित्रे द्रुह्येत सोऽत्यर्थं यस्यार्योऽनुमते गतः॥31॥**

मित्रद्रोह पदस्पर्श धेनूस निंदा गुरुजन ।

पातके माथी त्याच्या पाठवी जो वनी तया॥31॥

**विश्वासात कथितं किंचित परिवादं मिथः क्वचित ।**

**विवृणोतु स दुष्टात्मा यस्यार्थोऽ न्नुमते गतः॥32॥**

विश्वासघात पातक माथी त्याच्या बसेल जो ।
दुष्टात्मा कारणे ज्याच्या वनी श्रीराम जातसे ॥32॥

**अकर्ता चाकृतज्ञश्च त्यक्तात्मा निरपत्रय: ।**
**लोके भवतु विद्विष्टो यस्यार्योऽ नुमते गत: ॥33॥**

उपकार न करी जो परित्यक्त द्वेषपात्र तो ।
कृतघ्न लारणे ज्याच्या श्रीराम वनि जातसे ॥33॥

**पुत्रेर्दासैश्च भृत्यैश्च स्वगृहे परिवारित:।**
**स एको मृष्टमश्नातु यस्यार्योऽनुमते गत:॥34॥**

असुनी सवे भृत्य दास मिष्टान्न भक्षण करी

एकांती पाप त्यास श्रीरामा जो वनि पाठवी ॥34॥

**अप्राप्य सदृशान् दाराननपत्य: प्रमीयताम् ।**

**अनवाप्य क्रियां धां यस्यार्योऽनुमते गत: ॥35॥**

पाठवी वनी जो रामा पत्नीविन अनुरूप ।

करता न धार्मिक कृत्ये मरेल संतानहीन तो ॥35॥

**माऽऽत्मन: संततिं द्राक्षीत स्वेषु दारेषु दु:खित: ।**

**आयु:समग्रमप्राप्य यस्यार्योऽ नुमते गत:॥36॥**

सदा दु:खी स्वपत्नीचे संतान पाहण्या पूर्ण ।
भोगण्या आयु असमर्थ रामा वनि जो पाठवी ॥36॥

**राजस्त्री बालवृद्धानां वचे यत पापमुच्यते ।**
**भृत्यत्यागे च यत पापं तत पापं प्रतिपद्यताम ॥37॥**

पाप लागे वधे राजा स्त्री बालक वृद्ध यां ।
किंवा त्यागुनिया भृत्या तेच लागेल त्यासही ॥37॥

**लाक्षया मधुमांसेन लोहेन च विषेण च ।**
**सदैव बिभृयाद् भृत्यान यस्यार्योऽनुमते गत:॥38॥**

पालन करील त्यांचे जगती विकुनी वस्तु जे ।
लाह मधु विष लोह मांस जो पाठवी वना ॥38॥

**संग्रामे समुपोढे च शत्रुपक्ष भयंकरे ।**
**पलायमानो वध्येत यस्यार्योऽनुमते गतः॥39॥**

रामा वनि पाठवी जो शत्रुपक्षा भयंकर ।
भिउनी युद्धात पळता वध त्याचा होइल ॥39॥

**कपालपाणिः पृथिवीमटतां वीरसंवृतः।**
**भिक्षमाणो यथोन्मत्तो यस्यार्योऽनुमते गतः॥40॥**

तो फिरेल मलिन वस्त्रे हाती खापर घेउनी ।
भीक मागत उन्मत्त ज्याने पाठवले वनी ।।40।।

**मद्यप्रसक्तो भवतु स्त्रीष्वक्षेषु च नित्यशः।**
**कामक्रोधाभिभूतश्च यस्यार्योऽनुमते गतः ।।41।।**

मद्यासक्त,द्यूतक्रीडा स्त्रीसमागम यांमधे ।
कामक्रोध वश राहील ज्याने पाठविले वनी ।।41।।

**मास्य धर्मो मनो भूयादधर्म स निषेवताम् ।**
**अपात्रवर्षी भवतु यस्यार्योऽनुमते गतः।।42।।**

धर्म सोडूनी अधर्म अपात्रा दान करील तो।
पाठविले श्रीरामास वनी ज्याने अकारण ॥42॥

**संचितान्यस्य वित्तानि विविधानि सहस्रशः।**
**दस्युभिर्विप्रलुप्तां यस्यार्योऽनुमते गतः॥43॥**

असेल हजारो मुद्रा जमविले धन नेतिल ।
चोर लुटुनी त्याचे जो रामास वनि पाठवी ॥43॥

**उभे संध्ये शयानस्य यत पापं परिकल्प्यते ।**
**तच्च पापं भवेत तस्य यस्यार्योऽ नुमते गतः॥44॥**

**यदग्निदायके पापं यत पापं गुरुतल्पगे ।**

**मित्रद्रोहे च यत पापं तत पापं प्रतिपद्यते॥45॥**

संध्यासमयी झोपे जो किंवा आग लावि जो ।

गुरुपत्नि गामी किंवा मित्रद्रोह करीतसे ॥44॥

दुष्कृत्ये करणाऱ्यां यां सर्वां लागे पाप जे ।

तेच लागेल त्या ज्याने रामा वनि धाडले ॥45॥

**देवतानां पितॄणां च मातापित्रोस्तथैवच ।**

**मा स्म कार्षीत स सुश्रूषा यस्यार्योऽनुमते गत:॥46॥**

देवता माता पितरांच्या सेवेपासुनि वञ्चित ।
पुण्य न लाभे त्यास जो रामा पाठवी वनी ||46||

**सतां लोकात सतां कीर्त्याः सज्जुष्टात कर्मणस्तथा ।**
**भ्रश्यतु क्षिप्रमद्यैव यस्यार्योऽनुमते गतः||47||**

सत्पुरुष लोक कीर्ती त्यांची कर्मे सेवित ।
भ्रष्ट त्यापासून होत रामा जो वनि पाठवी ||47||

**अपास्य मातृशुश्रूषामनर्थे सोऽवतिष्ठताम ।**
**दीर्घबाहर्नहावक्षा यस्यार्योऽनुमते गतः||48||**

विशालवक्ष दीर्घबाहु रामास ज्याने पाठवले वनी ।
सोडुनी मातृसेवा तो अनर्थ मार्गी जाइल ॥48॥

**बहुभृत्यो दरिद्रश्च ज्वररोगसमन्वितः।**
**समायत सततं क्लेशं यस्यार्योनुमते गतः ॥49॥**

श्रीरामा वनि धाडी जो दरिद्री बहु संतती ।
ज्वररोग पीडित क्लेश सदा भोगत राहिल ॥48॥

**आशामाशंसमानानां दीनानामूर्ध्वचक्षुषाम् ।**
**अर्थिनां विरथां कुर्याद् यस्यार्योऽनुमते गतः॥50॥**

दीन याचक आशेने पाही करि निराश त्या।

पाप हे तो करील जो श्रीरामा पाठवी वनी ॥50॥

**मायया रमतां नित्यं पुरुषः पिशुनोऽशुचिः।**

**राज्ञो भीतस्त्वधर्मात्मा यस्यार्योऽनुमते गतः॥51॥**

चुगलखोर पापात्मा छळ कपटी रमे तो।

सदा भयभीत नृपा जो रामा वनि पाठवी ॥51॥

**ऋतुस्नातां सती भार्यामृतुकालानुरोधिनीम् ।**

**अतिवर्तेत दुष्टात्मा यस्यार्योऽनुमते गतः॥52॥**

ऋतुस्नाता स्वपत्नीची इच्छा पूर्ण न करील ।
असा पापी तो असे रामा पाठवि जो वनी ॥52॥

**विप्रलुप्तप्रजातस्य दुष्कृतं ब्राह्मणस्य यत ।**
**तदेतत प्रतिपद्येत यस्यार्योऽनुमते गतः ॥53॥**

संतान नष्ट दुष्कृत्ये ब्राह्मणा त्या लागेल ते ।
पाप त्यासहि लागेल रामा पाठवि जो वनी॥53॥

**ब्राह्मणायोद्यतां पूजां विहन्तु कलिषेन्द्रियः।**
**बालवत्सां च गां दोग्धु यस्यार्योऽनुमते गतः॥54॥**

ब्राह्मणास्तव पूजेत मलिन इंद्रिय पुरुष जो।
विघ्न आणील चोरील वासराचे नवजात।
दूध त्या पाप ते लागे रामा वनि धाडी जो ।।54।।

**धर्मदारान् परित्यज्य परदारान् निषेवताम् ।**
**त्यक्तधर्मरतिमूढो यस्यार्योऽनुमते गतः।।55।।**

स्वधर्मपत्नी सोडूनि परस्त्री भोगि जो।
धर्मभ्रष्ट रतिमूढ रामा वनि धाडि तो ।।55।।

पानीयदूषके पापं तथैव विषदायके ।
यत्तदेकः स लभतां यस्यार्योऽनुमते गतः।।56।।
जल दूषित करी वा विष देई तया लागे ।
पाप ते तया लागेल जो रामा वनि पाठवी ।।56।।
तृषार्तं सति पानीये विप्रलम्भेन योजयन् ।
यत् पापं लबह्ते तत् स्याद् यस्यार्योऽनुमते गतः।।57।।
तृषार्ता वञ्चित करी उपलब्ध असता जल ।
पाप त्या तेच लागेल रामा जो वनि पाठवी।।57।।

**भक्त्या विवदमानेषु मार्गमाश्रित्य पश्यतः।**

**तेन पापेन युज्येत यस्यार्योऽनुमते गतः॥58॥**

पक्ष एकाचा घेइ जे वाद करति मार्गात ।

त्याचे पाप लागेल जो रामा पाठवी वनी ॥58॥

**एवमाश्वासयन्नेव दुःखार्तोऽनुपपात ह ।**

**विहीनां पतिपुत्राभ्यां कौसल्या पार्थिवात्मजः॥59॥**

कौसल्येस पतिपुत्र विहीन दुःखार्ता देत तो।

आश्वासन असे तेव्हां पडे भरत मूर्च्छित ॥59॥

**तदा ते शपथैः कष्टैः शपमानमचेतनम् ।**

**भरतं शोकसंतप्तं कौसल्या वाक्यमब्रवीत ॥60॥**

शपथा दुष्कर घेत सिद्ध करण्या आपुले ।

निर्दोषत्व मूर्च्छित भरता कौसल्या असे वदे ॥60॥

**मम दुःखिमदं पुत्र भूयः समुपजायते ।**

**शपथैः शपमानो हि प्राणानुपरुणत्सि मे ॥61॥**

शपथा अनेक घेत देसि प्राणा पिडा मम ।

अधिक त्यामुळे वाढे दुःख पुत्रा प्रिय मम॥61॥

**दिष्ट्या न चलितो धर्मादात्मा ते सहक्लक्षणा ।**

**वत्स सत्यप्रतिज्ञो हि सतां लोकानवाप्स्यसि ॥62॥**

विचलित तव चित्त नसे धर्मापासुनी ।

सत्यप्रतिज्ञ तू वत्स सत्पुरुष लोका पावसी ॥63॥

**एवं विलपमानस्य दुःखार्तस्य महात्मनः।**

**मोहाच्च शोकसंरम्भाद् बभूव लुलितं मनः॥64॥**

विलाप करि दुःखार्त भरत व्याकुल मने ।

मोह शोकावेगे आर्त महात्मा अति होतसे ॥64॥

**लालप्यमानस्य विचेतनस्य प्रणष्टबुद्धेः पतितस्य भूमौ ।**

**मुहुर्मुहुर्निःश्वसतश्च दीर्घं सा तस्य शोकेन जगाम रात्रिः॥65॥**

विवेकबुद्धि भरताचि नष्ट विलापितो घेउनि दीर्घ श्वास ।

शोकामध्ये तो हरवूनि शुद्ध पडूनि भूमीवर जाइ रात्र ॥65॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे पञ्चसप्ततितमः सर्गः॥75॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 76

तमेवं शोकसंतप्तं भरतं कैकयीसुतम् ।

उवाच वदतां श्रेष्ठो वसिष्ठः श्रेष्ठ वागृषिः॥1॥

शोकसंतप्त भरता कैकेयीसुत त्याजला ।

वसिष्ठ श्रेष्ठ महर्षि म्हणती उत्तम वाणिने ॥1॥

अलं शोकेन भद्रं ते राजपुत्र महायशः।

प्राप्तकालं नरपतेः कुरु संयानमुत्तमम् ॥2॥

शोक पुरे राजपुत्रा प्रबंध करण्याकडे ।

दाहसंस्कार नृपतीचा लक्ष देई महायशा ॥2॥

**वसिष्ठस्य वचः श्रुत्वा भरतो धरणीं गतः।**

**प्रेतकृत्यानि सर्वाणि कारयामास धर्मवित ॥3॥**

वसिष्ठवच ऐकून उठुनी भरत करी ।

मन्त्र्याना सांगुनी प्रेतसंस्कार प्रबंध त्वरे ॥3॥

**उद्धृत्य तैलसंसेकात स तु भूमौ निवेशितम ।**

**आपीतवर्णवदनं प्रसुप्तमिव भूमियम ॥4॥**

देह काढुनि बाहेर तेलाच्या कढईतुनी ।
भासे नृप जणु सुप्त मुख पीत झाल्यामुळे ॥4॥

**संदेश्य शयने चाग्रये नानारत्नपरिष्कृते ।**
**ततो दशरथं पुत्रो विललाप सदु:खित:॥5॥**

धुवुनी पुसुनी देहा रत्नभूषित शय्येवर ।
दशरथास्तव दु:खी करी भरत रुदन ॥5॥

**किं ते व्यवसितं राजन्‍ प्रोषिते मय्यनागते ।**
**विवास्य रामं धर्मज्ञं लक्ष्मणं च महाबलम्‍ ॥6॥**

मी नसता राजन् येथ धर्मज्ञ रामलक्ष्मणा ।

वनी पाठवुनि स्वर्गी जाण्या काय कारण ॥6॥

**क्व यास्यसि महाराज हित्वेमं दुःखितं जनम् ।**

**हीनं पुरुषसिंहेन रामेणाक्लिष्टकर्मणा ॥7॥**

महत्कृत्य अनायास करणाऱ्या रामाहुनि ।

हीन दुःखित सोडून मज गेला कुठे तुम्ही ॥7॥

**योगक्षेमं तु तेऽव्यग्रं कोऽस्मिन् कल्पयिता पुरे ।**

**त्वयि प्रयाते स्वस्तात रामे च वनमाश्रिते ॥8॥**

आपण स्वर्गी जाता श्रीराम वनि राहता ।

योगक्षेम प्रजा कृत्य करील कोण निश्चित ॥8॥

विधवा पृथिवी राजंस्त्वया हीना न राजते ।

हीनचंद्रेव रजनी नगरी प्रतिभाति माम ॥9॥

विधवेसम भासे पृथ्वी तुम्हाविण न शोभते ।

चन्द्रविहिन रात्री समान मज भासते ॥9॥

एवं विलपमानं तं भरतं दीनमानसम ।

अब्रवीद् वचनं भूयो वसिष्ठस्तु महामुनिः ॥10॥

दीनचित्त करी ऐसा विलाप भरतास त्या ।

महामुनि वसिष्ठानी म्हटले करण्या सांत्वन॥10॥

**प्रेतकार्याणि यान्यस्य कर्तव्यानि विशाम्पते:।**

**तान्यव्यग्रं महाबाहो क्रियतामविचारितम् ॥11॥**

महाबाहो प्रेतकर्म करावे महाराजांस्तव।

शान्तचित्ते व्यग्रचित्त योग्य जे करणे असे ॥11॥

**तथेति भरतो वाक्यं वसिष्ठस्याभिपूज्य तत ।**

**ऋत्विक्पुरोहिताचार्यास्त्वरयामास सर्वश:॥12॥**

वसिष्ठ आज्ञा मानून भरत ऋत्विकपुरोहित ।
आचार्य या सर्वांना कार्य करण्या त्वरा करी ॥12॥

**ये त्वग्नयो नरेन्द्रस्य अग्न्यगाराद् बहुष्कृता:।**
**त्विग्भिर्याजकेश्चैव ते हूयन्ते यथाविधि ॥13॥**

अग्निशालेतुनी अग्नी आणुनीया तयामध्ये ।
करती विधिपूर्वक हवन ऋत्विज याजक ॥13॥

**शिबिकायामथारोप्य राजानं गतचेतनम् ।**
**बाष्पकण्ठा विमनसस्तमूहः परिचारका:॥14॥**

शिबिकेत बसवूनी नृपदेह निष्प्राण जो ।
अश्रुपूर्ण नेत्रे दुःखी नेती परिचारक गण ॥14॥

**हिरण्यं च सुवर्णं च वासांसि विविधानि च ।**
**प्रलिरन्तो जना मार्गे नृपतेरग्रतो ययुः॥15॥**

राजपुरुष मार्गात हिरण्य सुवर्ण रुपे।
वस्त्रे विविध तशी लुटती नृपशवापुढे ॥15॥

**चन्दनागुरुनिर्यासान् सरलं पद्मकं तथा ।**
**देवदारूणि चाहृत्य क्षेपयन्ति तथापरे ॥16॥**

**गन्धानुच्चावचांश्चान्यांस्तत्र गत्वाय भूमिपम् ।**

**तत्र संवेशयामासुश्चितामध्ये तमृत्विजः ॥17॥**

स्मशानात चिता करण्यासाठी चन्दन गुग्गुळ ।

देवदारु सरल पद्मक वृक्षाची लाकडे आणति ॥16॥

आणती वेगवेगळे सुगन्धित पदार्थ ते ।

शव राजाचे नन्तर ते चितेवरी ठेवती ॥17॥

**तदा हुताशनं हुत्वा जेपुस्तस्य तदृत्विजः।**

**जगुश्च ते यथाशास्त्रं तत्र सामानि सामगाः ॥18॥**

अग्नीस आहुति देऊन जप करती ऋत्विज ।

सामग करती गायन सशास्त्र सामश्रुति ॥18॥

**शिबिकाभिश्च यानेन यथार्ह तस्य योषितः।**

**नगरान्निर्ययुस्तत्र वृद्धैः परिवृतास्तथा ॥19॥**

**प्रसव्यं चापि तं चक्रुरृत्विजोऽग्निचितं नृपम् ।**

**स्त्रियश्च शोकसंतप्ताः कौसल्याप्रमुखस्तदा ॥20॥**

रथी आरूढ होऊन कौसल्येसह रक्षित ।

सर्व दशरथस्त्रिया निघती नगरातुनी ॥19॥

शोकसंतप्त स्मशानी घालती प्रदक्षिणा ।

चितेस दशरथाच्या ऋत्विजहि त्यांच्यासवे ॥20॥

**क्रौञ्चीनामिव नारीणां निनादस्तत्र शुश्रुवे ।**

**आर्तानां करुणं काले क्रोशन्तीनां सहस्रशः॥21॥**

करुण आक्रोश शोके राण्यांचा सहस्र होइ जो ।

आर्तनाद ऐकू येत क्रौञ्ची चित्कारती जणु ॥21॥

**ततो रुदन्ती विवशा विलप्य च पुनःपुनः।**

**यानेभ्यः सरयूतीरमवतेरुनृपाङ्गनाः॥22॥**

तेथुनी विवश राण्या वारंवार विलपत ।
रथी बैसुनी सरयू तटी जाउनी थांबती ॥22॥

कृत्वोदकं ते भरतेन सार्धं नृपाङ्गना मन्त्रिपुरोहिताश्च ।
पुरं प्रविश्याश्रुपरीतनेत्रा भूमौ दशाह व्यनयन्त दुःखम् ॥23॥

जलाञ्जली भरतासवे देति राण्या पुरोहित मन्त्रि सर्व ।
वहात अश्रू नगरात येती भूमीवरी दिन दहा शयन करीती॥23॥

**इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे षट्सप्ततितमः सर्गः॥76॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 77

ततो दशाहेऽतिगते कृतशौचो नृपात्मजः।
द्वादशेऽहानि सम्प्राप्ते श्राद्धकर्माण्यकारयत ॥1॥
दहा दिवसानंतर आत्मशुद्धिस्नान करी ।
भरत एकादश श्राद्ध अन्य द्वादश दिनि करी ॥1॥
ब्राह्मणेभ्यो धनं रत्नं ददावन्नं च पुष्कलम् ।

**वासांसि च महारहाणि रत्नानि विविधानि च ।**

**वास्तिकं बहु शुक्लं च गाश्चापि बहुशस्तदा ॥2॥**

ज्यामधे ब्राह्मणा देई रत्ने धन पुष्कळ ।

वस्त्रे बहुमूल्य अन्न प्रचुर गोधन रुपे ।

अश्या प्रकारचे दान भरत तेव्हां करितसे ॥2॥

**दासीर्दासांश्च यानानि वेश्मानि सुमहन्तानि च ।**

**ब्राह्मणेभ्यो ददौ पुत्रो राज्ञस्तस्यौर्ध्वदेहिकम् ॥3॥**

पारलौकिक राजाच्या दास दासी हितास्तव ।

वाहने घरेही मोठी देई भरत ब्राह्मणां ॥3॥

**ततः प्रभातसमये दिवसे च त्रयोदशे ।**

**विललाप महाबहुर्भरतः शोकमूर्च्छितः॥4॥**

नंतर तेराव्या दिनी प्रात:काळी महाबाहु ।

मूर्च्छित भरत होई विलाप करुनी अति ॥4॥

**शब्दापिहितकण्ठश्च शोधनार्थमुपागतः।**

**चितामूले पितुर्वाक्यमिदमाह सुदुःखितः॥5॥**

**तात यस्मिन् निसृष्टोऽहं त्वया भ्रातरि राघवे ।**

**तस्मिन् वनं प्रव्रजिते शून्ये त्यक्तोम्यहम् त्वया ॥6॥**

पित्याच्या अस्थि न्यावया येता दाटुनि कण्ठ ये ।

चितास्थानी पित्या दु:खी होउनि तो ऐसे म्हणे ॥5॥

ज्या राघवाहाती तुम्ही सोपविले मला ।

वनी पाठवुनी त्याला केले निराधार मज ॥6॥

**यस्या गतिरनाथाया: पुत्र: प्रव्राजितो वनम् ।**

**तामम्बा तात कौसल्यां त्यक्त्वा त्वं क्व गतो नृप:॥7॥**

अनाथ देवीच्या सुता एकमात्र धाडुनी वनी ।

त्या कौसल्या मातेस सोडुनी गेला कुठे ॥7॥

**दृष्ट्वा भस्मारुणं तच्च दग्धास्थि स्थानमण्डलम् ।**

**पितुः शरीरनिर्वाणं निष्टनन् विषसाद ह ॥8॥**

अस्थि दग्ध चितास्थान दिसे लाल पाहून ते ।

निर्वाण स्थल पित्याचे पाहुनी भरत दुःखित ॥8॥

**स तु दृष्ट्वा रुदन् दीनः पपात धरणीतले ।**

**उत्थाप्यमानः शक्रस्य यन्त्रध्वज इविच्छ्रितः ॥9॥**

स्थान पाहुनि दुःखाने पडे भूवरि ध्वजापरि ।

इन्द्राच्या चढवता यन्त्रे निसटुनी भूवरी॥9॥

अभिपेतुस्ततः सर्वे तस्यामात्याः शुचिव्रतम् ।
अन्तकाले निपतितं ययातिमृषयो यथा ॥10॥

अमात्य सर्व जाति पवित्र व्रत भरताप्रति ।
ययातिजवळी सर्व अन्तकाळि जसे ऋषि ॥10॥

शत्रुघ्नश्चापि भरतं दृष्ट्वा शोकपरिप्लुतम् ।
विसंज्ञो न्यपतद् भूमौ भूमिपालमनुस्मरन् ॥11॥

भरतास शोकमग्न पाहुनी शत्रुघ्नही ।

पडे पित्यास स्मरुनि भूमीवर मूर्च्छित ॥11॥

**उन्मत्त इव निश्चित्तो विललाप सुदुःखितः।**

**स्मृत्वा पितुर्गुणाङ्गानि तानि तानि तदा तदा ॥12॥**

पित्याची स्मरुनी माया केली वेळोवेळि तये ।

दुःखी अत्यन्त होवोनी विलपती उन्मत्त होउनी॥12॥

**मन्थराप्रभवस्तीव्र कैकेयीग्राहसंकुलः।**

**वरदानमयोऽक्षोभ्योऽमज्जयच्छोकसागरः॥13॥**

मन्थरेच्या प्रभावाने कैकेयी वरदानरूपी।

समुद्रे उग्र निमग्न सर्व जन झालो आम्ही ॥13॥

**सुकुमारं च बालं च सततं लालितं त्वया ।**

**क्व तात भरतं हित्वा विलपन्तं गतो भवान् ॥14॥**

करुनी सतत लाड ज्याचे त्या भरता बालका ।

सोडून रडता त्यास तात गेला कुठे तुम्ही ॥14॥

**ननु भोज्येषु पानेषु वस्त्रेष्वाभरणेषु च ।**

**प्रवरयति सर्वान् नस्तन्नः कोऽद्य करिष्यति ॥15॥**

आवड सदा जपली खानपानवस्त्राभूषणी ।

आमची तसे आता करेल कोण आम्हास्तव ॥15

**अवदारेणकाले तु पृथिवी नावदीर्यते॥**

**विहीना या त्वया राज्ञा धर्मज्ञेन महात्मना ॥16॥**

धर्मज्ञ राजा नसता विदीर्ण व्हावे पृथ्वीने ।

तसे होत नसे गोष्ट आश्चर्याचीच ही असे ॥16॥

**पितरि स्वर्गमापन्ने रामे चारणमाश्रिते।**

**किं मे जीवितसामर्थ्यं प्रवेक्ष्यामि हुताशनम् ॥17॥**

स्वर्गवासी पिता राम जाता अरण्यामधे ।

नसे सामर्थ्य जगण्या अग्निप्रवेश करीन मी ॥17॥

**हीनो भ्राता च पित्रा च शून्यामिक्ष्वाकुपालिताम्।**

**अयोध्यां न प्रवेक्ष्यामि प्रवेक्ष्यामि तपोवनम् ॥18॥**

पिता भ्राता विना शून्य इक्ष्वाकुवंशे पालिता।

अयोध्येत अश्या मी न प्रवेशीन जाइन वनी ॥18॥

**तयोर्विलपितं श्रुत्वा व्यसनं चाप्यवेक्ष्य तत्।**

**भृशमार्ततरा भूयः सर्व एवानुगामिनः॥19॥**

पाहुनी उभयां रडता सर्व अनुचर वर्गही।

संकटी पडुनि पुन्हा शोकव्याकुळ जाहले ॥19॥

**ततो विषण्णौ श्रान्तौ च शत्रुघ्नभरतावुभौ ।**

**धरायां स्म व्यचेष्टेतां भग्नश्रृङ्गाविवर्षभौ ॥20॥**

भरत शत्रुघ्न दोघे दु:खी श्रान्त धरेवरी ।

पडती वृषभांपरी होउनी भग्न शृंग जे ॥20॥

**ततः प्रकृतिमान्‍ वैद्यः पितुरेषां पुरोहितः।**

**वसिष्ठो भरत वाक्यमुत्थाप्य तमुवाच ह ॥21॥**

नंतर दैवी प्रकृति युक्त सर्वज्ञ पुरोहित ।

सर्वांचे वसिष्ठ ऐसे बोल भरता बोलती ॥21॥

**त्रयोदशोऽयं दिवसः पितुर्वृत्तस्य ते विभो।**

**सावशेषास्थिनिचये किमिहं त्वं विलम्बसे॥22॥**

अस्थिसंचय तेराव्या दिनी दाहसंस्कारोत्तर ।

शेष कार्या त्या करण्या विलम्ब का करतोस तू ॥22॥

**त्रीणि द्वंद्वानि भूतेषु प्रवृत्तान्यविशेषतः।**

**तेषु चापरिहार्येषु नैवं भवितुमर्हसि ॥23॥**

सर्व प्राण्यांमध्ये तीन द्वंद्वे अपरिहार्यचि।

तृषा भूक शोक मोह जरा मृत्यु असती अशी ।
अस्म्भव टाळणे ती तरी आवर शोक तू ॥23॥

**सुमन्त्राश्चापि शत्रुघ्नमुत्थाप्याभिप्रसाद्य च ।**
**श्रावयामास तत्त्वज्ञः सर्वभूतभवाभवौ ॥24॥**

शत्रुघ्नास सुमन्त्राने उठवुनी करुनी शान्त ।
अनिवार्यता मृत्यूची प्राण्यां सर्व वदे तया ॥24॥

**उत्थितौ तौ नरव्याघ्रौ प्रकाशेते यशस्विनऊ ।**
**वर्षातपपरिग्लानौ पृथगिन्द्रध्वजाविव ॥25॥**

दोघे नरव्याघ्र उठता मलिन वर्षा तापे जणु ।
इन्द्रध्वजापरि दोन प्रकाशित दिसतात ते ॥25॥

**अश्रूणि परिमृद्‌मम्तौ रक्ताक्षौ दीनभाषिणौ ।**
**अमात्यास्त्वरयन्ति स्म तनयौ चापरा: क्रिया:॥26॥**

अश्रू पुसत रक्ताक्ष बोलती दीनवाणिने ।
त्वरा करती अमात्य अन्य कार्ये करावया ॥26॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे सप्तसप्ततितम: सर्ग:॥77॥

# अयोध्याकाण्ड सर्ग 78

अथ यात्रा समीहन्तं शत्रुघ्नो लक्ष्मणानुज ।
भरतं शोकसंतप्तमिदं वचनमब्रवीत ॥!॥
अंत्यसंस्कार करिता पूर्ण रामाकडे इच्छित ।
जाण्यास शोकसंतप्त भरता शत्रुघ्न वदे ॥1॥
गतिर्यः सर्वभूतानां दुःखे किं पुनरात्मनः।

**स रामः सत्त्वसंपन्नः स्त्रिया प्रव्रजितो वमन् ॥2॥**

आपल्या वा स्वजनांच्या दु:खाचे काय कौतुक ।
जिथे सत्त्वसंपन्न रामा स्त्रीने पाठविले वनी ॥2॥

**बलवान् वीर्यसंपन्नो लक्ष्मणो नाम योऽप्स्यसौ ।**
**किं न मोचयते रामं कृत्वापि पितृनिग्रहम् ॥3॥**

बलसंपन्न लक्ष्मण शूरवीर म्हणवितो ।
का न पित्यास रोखुनि रामा सोडविले तये ॥3॥

**पूर्वमेव तु विग्राह्यः समवेक्ष्य नयानयो ।**

**उत्पथं यः समारूढो नार्या राजा वशं गतः॥4॥**

नारीस वश होऊन अयोग्य पथि जाति ते ।

कैद करणे त्यांना ठरते न्यायदायक ॥4॥

**इति संभाषमाणे तु शत्रुघ्ने लक्ष्मणानुजे ।**

**प्राद्वारेऽभूत् तदा कुब्जा सर्वाभरणभूषिता ॥5॥**

लक्ष्मणानुज शत्रुघ्न बोलत असता असे ।

आभूषणे नटलेली कुब्जा पूर्वद्वारी दिसे ॥5॥

**लिप्ता चन्दनसारेण राजवस्त्राणि बिभ्रती ।**

**विविधं विविधैस्तैर्भूषणैश्च विभूषिता ॥6॥**

उत्तम चन्दनलेप राजवस्त्रे करुनि धारण ।

आभूषणे प्रकारची विविध घालुनि येइ ती ॥6॥

**मेखलादामभिश्चित्रैरन्यैश्च वरभूषणैः।**

**बभासे बहुभिर्बद्धा रज्जुअबवेव वानरी ॥7॥**

मेखला चित्रविचित्र अलंकारे अलंकृत ।

वानरीसम भासे ती बद्ध दोऱ्यांमध्ये बहु ॥7॥

**तां समीक्ष्य तदा द्वाःस्थो भृशं पापस्य कारिणीम् ।**

गृहीत्वाकरुणं कुब्जां शत्रुघ्नाय न्यवेदयत ॥8॥

पापाचे जी असे मूळ द्वरपाले पकडुनी ।

आणुनि शत्रुघ्नाकडे हाती देउनि तो वदे ॥8॥

यस्याः कृते वने रामो न्यस्तदेहश्च वः पिता ।

सेयं पापा नृशंसा च तस्याः कुरु यथामति ॥9॥

जिच्यामुळे वनी राम निर्वाण करती पिता ।

तीच ही पापिणी क्रूर योग्य शिक्षा तिज करा ॥9॥

शत्रुजश्च तदाज्ञाय वचनं भृशदुःखितः।

**अन्त:पुरचरान् सर्वानित्युवाच धृतव्रत:॥10॥**

वचन ऐकोनि त्याचे शत्रुघ्न दु:खित बहु ।

अन्त:पुरवासी सर्वां कर्तव्या स्मरुनी वदे ॥10॥

**तीव्रमुत्पादितं दु:खं भ्रातृणां मे तथा पितु:।**

**यथा सेयं नृशंसस्य कर्मण: फलमनुश्नताम् ॥11॥**

बन्धु आणि मम पित्या दु:सह दु:ख जसे मिळे।

वाक्रूर कर्मामुळे जिच्या तिला तसे फलही मिळो ॥11।

**एवमुक्त्वा च तेनाशु सखीजनसमावृता ।**

**गृहीता बलवत कुन्जा सा तद् गृहमनादयात ॥12॥**

ऐसे वदुनि शत्रुघ्न कुब्जेस पकडे बळे ।

सख्यांमध्ये असता ती ओरडे भवनी घुमे ॥12॥

**ततः सुभृशसंतप्तसतस्याः सर्वः सखीजनः।**

**कृद्धमाज्ञाय शत्रुघ्नं व्यपलायत सर्वशः॥13॥**

सख्या साऱ्या तिच्या होति संतप्त त्यामुळे ।

जाणुनि शत्रुघ्न कोप पळती त्या इतस्ततः॥13॥

**अमन्त्रयत कृत्स्नश्च तस्याः सर्व सखीजनः।**

**यथायं समुपक्रान्तो नि:शेषं न करिष्यति ॥14॥**

जमुनी सर्व एकत्र विचार करता तयां।
वाटे कुब्जेचि पाहुनि स्थिति शत्रुघ्न जी करी ।
जिवित आपण सर्वां राहणे शक्य ना दिसे ॥14॥

**सानुक्रोशां वदान्यां च धर्मज्ञां च यशस्विनीम् ।**
**कौसल्यां शरणं याम: सा हि नोऽस्ति ध्रुवा गति:॥15॥**

म्हणुनी परमदयालु धर्मज्ञ यशस्विनी ।
कौसल्येस जाऊ शरण तीच गति आपणा ॥15॥

**स च रोषेण संवीत: शत्रुघ्न: शत्रुशासन:।**

**विचकर्ष तदा कुब्जां क्रोशन्तीं पृथिवीतले ॥16॥**

शत्रुदमन शत्रुघ्न रोषे कुब्जेस आदळी ।

भूमीवर त्यामुळे ती चित्कारत पुन:पुन:॥16॥

**तस्यां ह्याकृष्यमाणायां मन्थरायां ततस्तत:।**

**चित्रंबहुविधं भाण्डं पृथिव्यां तद्व्यशीर्यत ॥17॥**

ओढता जमिनीवरुनी मन्थरेने जे घातले।

आभूषण पृथ्वीवर विचित्र तुटुनी लोळती॥17॥

तेन भाण्डेन विस्तीर्णं श्रीमद् राजनिवेशनम् ।
अशोभत तदा भूयः शारदं गगनं यथा ॥18॥

राजभवन शोभाशाली तुकड्यानी शोभे जसे ।
नक्षत्रांनी शरत्काली अलंकृत नभापरी ॥18॥

स बली बलवत् क्रोधाद् गृहीत्वा पुरुषर्षभ ।
कैकेयीमभिनिर्भयं बभाषे परुषं वचः॥19॥

तो बलवान क्रोधाने मन्थरेस ताडन करी ।
कैकेयी मध्ये पडता बोले तो कठोर तिज ॥19॥

**तैर्वाक्यैःपरुषदु:खैः कैकेयी भृशदु:खिता ।**

**शत्रुघ्नभयसंत्रस्ता पुत्रं शरणागताम् ॥20॥**

कठोर वचने त्याच्या कैकेयी बहुदु:खित ।

भिउनी शत्रुघ्नास भरता शरण येतसे ॥20॥

**तं प्रेक्ष्य भरतः क्रुद्धं शत्रुघ्नमिदमब्रवीत ।**

**अवध्याः सर्वभूतानां प्रमदाः क्षम्यतामिति ॥21॥**

भरत पाहूनि तिला शत्रुघ्ना कृद्ध जो वदे ।

शत्रुघ्ना अवध्य नारी सर्वभूती क्षमा करी ॥21॥

**हन्यामहमिमां पापां कैकेयीं दुष्टचारिणीम् ।**

**यदि मां धार्मिको रामो नासूयेन्मातघतकम् ॥22॥**

मातृघातक मानून श्रीराम घृणा करेल ।

भीतीने या कैकेयीस दुष्टेस न मारिले मी ॥22॥

**इमामपि हतां कुब्जां यदि जानाति राघवः।**

**त्वां च मां धर्मात्मा नाभिभाषिष्यते धृवम् ॥23॥**

कुब्जेस मारिले आम्ही जाणले जर राघवे ।

बोलणे तो आपल्याशी निश्चित सोडुन देइल ॥23॥

**भरतस्य वचः श्रुत्वा शत्रुघ्नो लक्ष्मणानुजः।**

**न्यवर्तत ततो दोषात ता मुमोच च मूर्च्छिताम् ॥24॥**

लक्ष्मणानुज शत्रुघ्न भरताचे बोल ऐकुनी ।

वध करणे सोडून कुब्जेस मूर्च्छित त्यजे ॥24॥

**सा पादमूले कैकेय्या मन्थरा निपपात ह ।**

**मिःश्वसन्ती सुदुःखार्ता कृपणं विललाप ह ॥25॥**

चरणी कैकेयीच्या मन्थरा पडे दुःखित ।

दीर्घ श्वास घेत करी विलाप करुणार्त ती ॥25॥

शत्रुघ्नविक्षेपविमूढसंज्ञां समीक्ष्य कुब्जां भरतस्य माता ।
शनैः समाश्वासयदार्तरूपां क्रौञ्ची विलग्नामिव वीक्षमाणाम् ॥26॥

बेशुद्ध कुब्जा शतृघ्न ताडने पाहूनि आश्वासी भरताचि माता ।
कुब्जा तदा कातर दृष्टि पाही क्रौञ्चीपरी पञ्जरि तिच्याकडे ॥26॥

**इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्येऽयोध्याकाण्डेऽष्टसप्ततितमः सर्गः॥78॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 79

ततः प्रभातसमये दिवसेऽथ चतुर्दशे ।
समेत्य राजकर्तारो भरतं वाक्यमब्रुवन् ॥1॥

राजकर्मचारी सर्व प्रभाती चौदाव्या दिनी ।
एकत्र येत म्हणती भरतास वाक्य असे ॥1॥

गतो दशरथः स्वर्गं यो नो गुरुतरो गुरुः।

रामं प्रव्राज्य वै ज्येष्ठं लक्ष्मणं च महाबलम् ॥2॥

त्वमद्य भव नो राजा राजपुत्रो महायशः।

संगत्या नापराध्नोति राज्यमेतदनायकम् ॥3॥

दशरथ सर्वश्रेष्ठ श्रीराम लक्ष्मणा वनी ।

पाठवून स्वर्गवासी राजपुत्रा होति ते ॥2॥

तू आता हो आम्हा राजा महाराजे आज्ञापिले।

योग्य तेच नसे अपराध तुझ्या राज्यारोहणी ॥3॥

आभिषेचनिकं सर्वमिदमादाय राघव ।

**प्रतीक्षते त्वां स्वजन: श्रेणयश्च नृपात्मज॥4॥**

स्वजन तुझे हे मन्त्री श्रेष्ठी पुरवासी जन ।

प्रतीक्षा तव करती अभिषेकसामग्री सह ॥4॥

**राज्यं गृहाणि भरत पितृपैतामहं ध्रुवम् ।**

**अभिषेचय चात्मानं पाहि चास्मान् नरर्षभ ॥5॥**

राज्य पितापितामहांचे करी ग्रहण अवश्य तू ।

अभिषेके होउनि राजा रक्ष तू सर्वा जनां ॥5॥

**आभिषेचनिकं भाण्डं कृत्वा सर्वं प्रदक्षिणम् ।**

**भरतस्तं जनं सर्वं प्रत्युवाच धृतव्रत: ॥6॥**

ऐकूनि हे भरत व्रती घालुनीया प्रदक्षिणा ।
अभिषेक सामग्रीस वदे उपस्थित जना ॥6॥

**ज्येष्ठस्य राजता नित्यमुचिता हि कुलस्य नः।**
**नैवं भवन्तो मां वक्तुमर्हन्ति कुशला जना ॥7॥**

राज्यपदी ज्येष्ठ पुत्र कुला उचित हे असे ।
बुद्धिमान आपण सर्व अयोग्य ऐसे सांगता ॥7॥

**रामः पूर्वो हि नो भ्राता भविष्यति म हिपतिः।**

अहं त्वरण्ये वत्स्यामि वर्षाणि नवपञ्च च ॥8॥

राम ज्येष्ठ आम्हा भ्राता तोच राजा होइल ।

त्याच्याजागि अरण्यात करेन वास मी स्वत:॥8॥

युज्यतां महती सेना चतुरङ्गमहाबला ।

आनयिष्याम्यहं ज्येष्ठ भ्रातरं राघवं वनात ॥9॥

चतुरंग दल विशाल तयार सबल करा ।

आणीन ज्येष्ठ भ्रात्यास श्रीरामा मी वनातुनी ॥9॥

आभिषेचनिकं चैव सर्वमेतदुपस्कृतम ।

पुरस्कृत्य गमिष्यामि रामहेतोर्वनं प्रति ॥10॥

तत्रेव तं नरच्याघ्रमभिषिच्य पुरस्कृतम् ।

आनयिष्यामि वै रामं हव्यवाहमिवाध्वरात ॥11॥

अभिषेक सामग्री ही सर्व घेउनि बरोबरी ।

हेतुने भेटण्या श्रीरामा जाउनी मी वनामध्ये ॥10॥

नरव्याघ्रास तेथेच अभिषेक करूनि मी ।

यज्ञाग्निसम पुढे त्यास घालुनी आणीन मी ॥11॥

न सकामां करिष्यामि स्वामिमां मातृगन्धिनीम् ।

वने वत्स्यामहं दुर्गे रामो राजा भविष्यति ॥12॥

माता म्हणवी माझी मनोरथ पूर्ण ना तिचे ।

वनी राहीन मी दुर्गे श्रीराम राजा होइल ॥12॥

क्रियतां शिल्पिभिः पन्थाः समानि विषमाणि ॥

रक्षिणधानुसंयान्तु पथि दुर्गविचारकाः ॥13॥

शिल्पी जाउनी पुढती मार्ग समतल करा ।

रक्षक जाणति जे मार्ग दुर्गम स्थाना असो सवे ॥13॥

एवं सम्भाषमाणं तं रामहेतोर्नृपात्मजम् ।

**प्रत्युवाच जनः सर्वः श्रीमद् वाक्यमनुत्तमम् ॥14॥**

हेतुने रामा आणण्या भरत वचन ऐकुनी ।
उद्गारति जन सर्व वाक्य उत्तम आपले ॥14॥

**एवं ते भाषमाणस्य पद्मा श्रीरुपतिष्ठताम् ।**
**यस्त्वं ज्येष्ठे नृपसुते पृथिवीं दातुमिच्छसि ॥15॥**

म्हणता ऐसे उत्तम सदैव लक्ष्मी प्रसन्न ।
जे तुम्ही ज्येष्ठ पुत्रास पृथ्वी परत करीता ॥15॥

**अनुत्तमं तद्वचनं नृपात्मजः प्रभाषितं संश्रवणे निशम्य च ।**

**प्रहर्षजास्तं प्रति बाष्पबिन्दवो निपेतुरार्याननेत्रसम्भवा:॥16॥**

आशीर्वचा ऐकुनिया तयांच्या प्रसन्न होऊनि भरत पाहतसे ।

सुशोभित करति जे नेत्र मुखमंडला आनंदाश्रु गळति त्यातुनि॥16॥

**ऊचुस्ते वचनमिदं निशम्य हृष्टा: सामात्या: सपरिषदो वियातशोका:॥।**

**पन्थानं नरवरभक्तिमान् जनश्च व्यादिष्टस्तव वचनाश्चच्च शिल्पिवर्ग:॥17॥**

वचन बोललेले श्रीरामा परत आणण्याचे ऐकुनि।

आनंदित सर्व होती मन्त्री सदस्य सभेतिल ॥

शोक दूर होउनि त्यांचा भरतास ते बोलती ।

नरश्रेष्ठ आज्ञा आपली मानुनी भक्तिमान जे ॥
राजपरिवाराप्रति त्यां कारागिर शिल्पी यांना ।
मार्ग निष्कंटक करण्या स्तव पाठविले आहे ॥17॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे एकोनाशीतितमः सर्गः ॥79॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 80

अथ भूमिप्रदेशज्ञा: सूत्रकर्मविशारदा:।

स्वकर्मभिरता: शूरा: खनका यन्त्रकास्तथा ॥1॥

कान्तिका: स्थपतय:पुरुषा यन्त्रकोविदा:।

तथा वर्धकयश्चैव मार्गिणो वृक्षतक्षका:॥2॥

सूपकारा: सुधाकारा: वंशचर्मकृतस्तथा ।

समर्था ये च द्रष्टार: पुरतश्च प्रतस्थिरे ॥3॥

तज्ञ भूप्रदेशाचे सूत्रकर्मविशारद ।
भूमि खोदाया यंत्रज्ञ शूर मार्गास रक्षण्या ॥1॥
नदी पार करायास जलप्रवाह रोखण्या ।
कारागिर रथ यन्त्री तोडण्यास वृक्ष तसे ॥2॥
स्वयंपाकी स्वच्छक कुशल कर्मी बांबुच्या ।
चर्मकार विशेषज्ञ बलवान जाती पुढती ॥3॥
**स तु हर्षत तमुद्देशं जनौघो विपुल: प्रयाम् ।**
**अशोभत महावेग: सागरस्येव पर्वणि ॥4॥**

विशाल जनसमुदाय हर्षाने समवेत त्यां।

निघती सागरासम शोभती पौर्णिमेच्या॥4॥

ते स्ववारं समास्थाय वर्मकर्माणि कोविदा:।

करणैर्विविधोपेतै: पुरस्तात सम्प्रतश्तिरे ॥5॥

मार्ग निर्मिति करणारे दलासह आपुल्या ।

उपकरणे घेऊनी निघती पुढती त्वरे ॥5॥

लता वल्लीश्च गुल्मांश्च स्थाणूमश्मन एव च ।

जनास्ते चक्रिरे मार्ग छिन्दन्तो विविधान् द्रुमान् ॥6॥

करती दूर मार्गस्थ वेली कंटक त्यापरी ।

मार्गा समतल करती तोडुनी वृक्षही तसे ॥6॥

अवृक्षेषु च देशेषु केचिद् वृक्षानरोपयन् ।

केचित् कुठारैष्टकैश्च दात्रैश्छिन्दन् क्वचित् क्वचित् ॥7॥

वैराण स्थळी काही करती वृक्षारोपण ।

कुठारे अनावश्यक वृक्ष तृण उच्चाटण ॥7॥

अपरे वीरणस्तन्बान् बलिनो बलवत्तरा:।

विधमन्ति स्म दुर्गाणि स्थलानि च ततस्तत:॥8॥

अपरेऽपूरयन् कूपान् पांसुभिः श्वभ्रमायतम् ।
निम्नभागांस्तथैवाशु समांश्चक्रुः समन्तत्:॥9॥

काही बलवान् लोक उखडुनी हस्ते टाकती ।
झाडोरे मुळे खोल सपाट करती दुर्गम ॥8॥
कूप खड्डे मार्गस्थ भरती माति लोटुनी ।
करती समतल जेथे उतार भर घालुनी ॥9॥

बबन्धर्बन्धनीयांश्च क्षोद्यान् संचुक्षुदुस्तथा ।
बिभिदुर्भेदनीयांश्च तांस्तान् देशान् नरास्तदा ॥10॥

पूल बान्धति जिथे पाणी खोल असे तिथे ।

खडकाळ भूमि ठोकून करती योग्य वाहना ।

आवश्यकता जिथे जैसी करती कार्य तिथे ॥10॥

**अचिरेण तु कालेन परिवाहान्‍ बहूदकान्‍ ।**

**चक्रुर्बहुविधाकारान्‍ सागरप्रतिमान्‍ बहून्‍ ॥11॥**

स्रोत अनेक बांधुनी छोटे तलाव मोठा निर्मिती ।

अगाध जले युक्त सागरासम भासतो ॥11॥

निर्जलेषु च देशेषु खानयामासुरुत्तमान् ।

उदपानान् बहुविधान् वेदिकापरिमण्डितान् ॥12॥

निर्जल स्थानी कूप विपुल जल युक्त तसे ।

सरोवरहि अगाध जले युक्त सागर जणु ॥12॥

ससुधकुट्टिमतल: प्रपुष्पितमहीरुह:।

मत्तोष्टद्विजगण: पताकाभिरलंकृत: ॥13॥

चन्दनोदकसंसिक्तो नानाकुसुमभिरलंकृत:।

बह्वशोभत सेनाया: पन्था: सुर्ज़्पथोपम:॥14॥

चुना माती खडी वरती ठोकून पक्का करति ते ।
दुतर्फा पुष्पित वृक्ष ज्यावरी पक्षि कूजती ॥13॥
देवतामार्गापरि तो पताकांनी सुशोभित ।
जल चन्दनमिश्रित सिंचित पुष्पे शोभित ॥14॥

**आज्ञाप्याथ यथाज्ञप्ति युक्तास्तेऽधिकृता नराः।**
**रमणीयेषु देशेषु बहुस्वादुफलेषु च ॥15॥**
**यो निवेशस्त्वभिप्रेतो भरतस्य महात्मनः।**
**भूयस्तं शोभयामासुभूषाभिभूषणोपमम् ॥16॥**

मार्ग निर्मिता करणे जेथे भरताज्ञेनुसार ।

कराया वास करति शोध रमणीय स्थळ ॥15॥

स्वदिष्ट फळे उपलब्ध स्थानी शिबिर अश्या ।

भूषणरूप असे ते सजलेले अलंकृत ॥16॥

**नक्षत्रेषु प्रशस्तेषु मुहूर्तेषु च तद्विदः।**

**निवेशान स्थापयामासुर्भरतस्य महात्मनः॥17॥**

भरतवास्तव्या स्थाने त्यांची प्रतिष्ठा उत्तम ।

करती वास्तुकर्मज्ञाता नक्षत्र मुहूर्त पाहुनी ॥17॥

बहुपांसुचयाश्चापि परिखाः परिवारिताः

तत्रेन्द्रनीलप्रतिमाः प्रतोलीवरशोभिताः॥18॥

प्रासादमालासंयुक्ताः सौधप्राकारसंवृताः।

पताकाशोभिताः सर्वे सुनिर्मितमहापथाः॥19॥

विसर्पद्भिरिवाकाशे विटङ्काग्रविमानकैः।

समच्छ्रितैर्निवेशास्ते बभुः शक्रपुरोपमाः॥20॥

मार्गावरील निवास इन्द्रपुरीसम शोभती।

इन्द्रनीलमणीयुक्त प्रतिमा बनवुनि ठेवती ॥18॥

खंदक चारी बाजूस मृत्तिका ढीगही तसे ।
मालाशोभित प्रासाद प्राकारे वेढलेले ते ॥19॥
पताकाशोभित निवास सुशोभित महापथ
विटङ्का विमानानी उंच शिबिरे शोभती भली॥20॥
जाह्नवीं तु समासाय विविधाद्रुमकाननाम् ।
शीतलामलपानीयां महामीनसमाकुलाम् ॥21॥
सच्चन्द्रतारागणमंडितं यथा नभः क्षपायाममलं विराजते ।
नरेन्द्रमारगे स तदा व्यराजत क्रमेण रम्यः शुभशिल्पि निर्मितः ॥22।

सुशोभित वृक्षयुक्त वने मार्ग रमणीय तो ।
शीतल जले युक्त मत्स्ये व्याप्त गंगातिरी ॥21॥
तारांगणे शोभित चंद्रम्यासह जणू नभ निर्मल रात्रसमयी ।
नरेंद्रमार्ग तो रमणीय विराजत कुशल कर्मींनी असे जो निर्मित॥22॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डेऽशीतितम: सर्ग:॥80॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 81

ततो नान्दीमुखिं रात्रिं भर्तं सूतमागधाः।
तुष्टवुःसविशेषज्ञाः स्तवैर्मङ्गलसंस्तवैः॥1॥

रात्र संपत असता स्तुतिपाठक मागध ।
स्तविती भरता सूत स्तुति करुनी मङ्गल ॥1॥

सुवर्णकोणाभिहत: प्राणदद्यामदुन्दुभि:।
दध्मु: शङ्खाश्च शतशो वाद्यांश्चोच्चावचस्वरान् ॥2॥
सुवर्णदंड नादे हो प्रहरसमाप्ति सूचित ।
वादक वाजवती शङ्ख वाद्ये शेकडो तशी ॥2॥
स तूर्यघोष: सुमहान् दिवमापूरयन्निव।
भरतं शोकसंतप्तं भूय: शोकैररन्धयत् ॥3॥
महाध्वनि वाद्यांचा भरे नभ ऐकुनी तया ।
भरत शोकसंतप्त शोकाग्नीत पुन्हा जळे ॥3॥

**ततः प्रबुद्धो भरतस्तं घोषं संनिवर्त्य च ।**

**नाहं राजेति चोक्त्वा तं शत्रुघ्नमिदमब्रवीत ॥4॥**

जागृत भरत करी बंद वाद्ये घोष थांबवी ।

मी न राजा म्हणोनीया शत्रुघ्ना नंतर वदे ॥4॥

**पश्य शत्रुघ्न कैकेय्या लोकस्यापकृतं महत ।**

**विसृज्य मयि दुःखानि राजा दशरथो गतः॥5॥**

शत्रुघ्ना पहा कैकेयी अपकार लोकांचा करी।

मज दुःखात टाकूनी जाति दशरथ पिता ॥5॥

**तस्यैषा धर्मराजस्य धर्ममूला महात्मनः।**

**परिभ्रमति राजश्रीनौरिवाकर्णिका जले ॥6॥**

धर्ममूला राजलक्ष्मी धर्मराजाची महान।

डगमगे नौकेसम जली नाविकाविना॥6॥

**यो हि नः सुमहान नाथः सोऽपि प्रव्राजितो वने ।**

**अनया धरममुत्सृज्य मात्रा मे राघवः स्वयम ॥7॥**

आमुचा जो श्रेष्ठ स्वामी त्यासही वनि धाडले।

राघवा मम मातेने धर्मा तिलाञ्जलि देउनी ॥7॥

**इत्येव भरतं वीक्ष्य विलपन्तमचेतसम् ।**

**कृपणा रूरुदुः सर्वाः सुस्वरं योषितस्तदा ॥8॥**

भरता पाहून असे अचेतन करि रूदन ।

अन्तःपुरी स्त्रिया दीन रुदती उच्चस्वरे ॥8॥

**तथा तस्मिन् विलपति वसिष्ठो राजधर्मवित्।**

**सभामिक्ष्वाकुनाथस्य प्रविवेश महायशाः॥9॥**

तो रडत असताना वसिष्ठ राजधर्मज्ञ ।

इक्ष्वाकुराज सभेत पवेशति महायश ॥9॥

**शातकुम्भमयीं रम्यां मणिहेमसमाकुलाम् ।**
**सुधर्मामिव धर्मात्मा सगण: प्रत्यपद्यत ॥10॥**
**स काञ्चनमयं पीठं स्वस्त्यास्तरणसंवृतम् ।**
**अध्यास्त सर्ववेदज्ञो दूताननुशशास च ॥11॥**

सुवर्णस्तंभ ज्यामध्ये सुवर्णमय सभागृह ।
शोभतसे देवतांची सुधर्मा सभाच जणु ॥10॥
वसिष्ठ सर्ववेदज्ञ शिष्यांसह प्रवेशती ।
बसुनी सुवर्णपीठे दूतांस आज्ञापिती ॥11॥

ब्राह्मणान्‌ क्षत्रियान्‌ योधानमात्यान्‌ गणवल्लभान्‌ ।

क्षिप्रमानयताव्यग्राः कृत्यमात्ययिकं हि नः ॥12॥

सराजपुत्रं शत्रुघ्नं भरतं च यशस्विनम्‌ ।

युधाजितं सुमन्त्रं च ये च तत्र हिताः जनाः॥13॥

आणा बोलावुनी सर्वां ब्राह्मणां क्षत्रियां झणी ।

सेनानायकां योध्यां अन्य राजपुत्रांसवे ॥12॥

यशस्वी भरत शत्रुघ्ना युधाजित सुमन्त्रासह ।

हितैषी या सर्वां कार्य आवश्यक करावया ॥13॥

ततो हलहलाशब्दो महान् समुदप्यत ।

रथैरश्वैर्गजैश्चापि जनानामुपगच्छताम् ॥14॥

तदा गज अश्व रथ जन ज्यातुनि येति हे ।

उत्पन्न ध्वनि त्यांचा होण्या आरंभ जाहला ॥14॥

ततो भरतमायान्तं शतक्रतुमिवामराः।

प्रत्यनन्दन् प्रकृतयो यथा दशरथं तथा ॥15॥

इन्द्रास अभिवादिति देव तसे भरतासही।

उत्थापती जन सर्व राजा दशरथापरी ॥15॥

हृद इव तिमिनागसंवृत: स्तिमितजलो अणिशङ्खशर्कर:।

दशरथसुतशोभिता सभा सदशरथेव बभूव सा पुरा ॥16॥

तिमि मत्स्य तसे जलचर मुक्ता मणि शङ्ख वालुकायुक्त ।

सागरासम दशरथपुत्रे शोभे सभा जशी पूर्वी राजा दशरथे ॥16॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे एकाशीतितम: सर्ग:॥81॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 82

तामर्यगणसंपूर्णा भरतः प्रग्रहां सभाम् ।
ददर्श बुद्धिसंपन्नः पूर्णचंद्रा निशामिव ॥1॥

भरत बुद्धिमान पाही भरलेली ती सभा ।
ती आर्यगणसंपन्न चंद्रासह जशी निशा ॥1॥

आसनानि यथान्यायमार्याणां विशतां तदा ।

वस्त्राङ्गरागप्रभया द्योतिता सा सभोत्तमा ॥2॥

यथायोग्य बसलेल्या आसनी आर्यांच्या तिथे।

वस्त्रे अङ्गराग प्रभा त्यांचि दीप्तिमान करी सभा॥2॥

सा विद्वज्जनसंपूर्णा सभा सुरुचिरा तथा ।

अदृश्यत घनापाये पूर्णचन्द्रेव शर्वरी॥3॥

शरदपौर्णिमा चन्द्र अलंकृत रजनीसम ।

विद्वज्जने भरलेली सभा शोभतसे तशी ॥3॥

राज्ञस्तु प्रकृतीः सर्वाः स सम्प्रेक्ष्य च धर्मवित ।

इदं पुरोहितो वाक्यं भरतं मृदु चाब्रवीत ॥4॥

सम्पूर्ण दल राजाचे पाहुनीया उपस्थित ।

वसिष्ठ धर्मज्ञ तेव्हां मधुर वचने बोलती ॥4॥

तात राजा दशरथः स्वर्गतो धर्ममाचरन् ।

धनधान्यवती स्फीतां प्रदाय पृथिवीं तव ॥5॥

धनधान्य परिपूर्ण पृथ्वी सोपवुनी तुज ।

दशरथ धर्मशील तात स्वर्गवासी जाहले ॥5॥

रामस्तथा सत्यवृत्तिः सतां धर्ममनुस्मरन् ।
नाजहात पितुरादेशं शशी ज्योत्स्नामिविदितः॥6॥

सत्यवृत्ति न उल्लंघी राम पितुराज्ञा जसा ।
उदित चन्द्रमा जसा ज्योत्स्नेस न सोडीतसे ॥6॥

पित्रा भ्रात्रा च ते दत्तं राज्यं निहतकण्टकम् ।
तद् भुक्ष्व मुदितामात्यः क्षिप्रमेवाभिषेचय ॥7॥
उदीच्या श्च प्रतीच्याश्च दाक्षिणात्याश्च केवलाः।
कोट्यापरान्ताः सामुद्रा रत्नान्युपहरन्तु ते ॥8॥

ज्येष्ठ भ्राता पिता यांनी राज्य निष्कंटक दिले ।
प्रसन्न राखुनी मन्त्र्यां करी पालन त्यास तू ॥7॥
नृप देशोदेशीचे व्यापारी सागरावरी ।
प्रदान असंख्य रत्ने करतील तुम्हास ते ॥8॥

**तत्छ्रुत्वा भरतो वाक्यं शोकेनाभिपरिप्लुत:।**
**जगाम मनसा रामं धर्मज्ञो धर्मकांक्षया ॥9॥**

ऐकुनी भरत धर्मज्ञ शोकग्रस्त होउनी ।
धर्मपालन इच्छेने स्मरे श्रीरामा मनी ॥9॥

सबाष्पकलया वाचा कलहंसस्वरो युवा ।
विललाप सभामध्ये जगहे च पुरोहितम् ॥10॥

करी सभेत रूदन कलहंस गद्गद स्वरे ।
भरत वदे ऐसे विलपित पुरोहितां ॥10॥

चरितब्रह्मचर्यस्य विद्यास्नातस्य धीमतः।
धर्मे प्रयतमानस्य को राज्यं मद्विधो हरेत् ॥11॥

ब्रह्मचारी व्रते होई निष्णात सर्व विद्यांमध्ये ।
धर्मशील त्या रामाच्या कोण राज्या अपहरे ॥11॥

**कथं दशरथाज्जातो भवेद् राज्यापहारक:।**

**राज्यं चाहं च रामस्य धर्मं वक्तुमिहार्हसि ॥12॥**

ज्येष्ठ बंधूचे हरण राज्य दशरथपुत्रचि ।

कैसे करी जर राज्य मीही रामाचा असे ॥12॥

**ज्येष्ठ: श्रेष्ठश्च धर्मात्मा दिलीपनहुषोपम:।**

**लब्धुमर्हति काकुत्स्थो राज्यं दशरथो यथा ॥13॥**

मज ज्येष्ठ तसा श्रेष्ठ दिलीप नहुषापरी ।

दशरथासम त्याचा हक्क राज्यावर असे ॥13॥

**अनार्यजुष्टमस्वयं कुर्यां पापमहं यदि ।**

**इक्ष्वाकुणामहं लोके भवेयं कुलपांसनः॥14॥**

करती पुरुष नीच पाप नरकात जाति ते ।

इक्ष्वाकुकुला मीही कलंक जर केले तसे॥14॥

**यद्धि मात्रा कृतं पापं नाहं तदपि रोचये।**

**इहस्थो वनदुर्गस्थं नमस्यामि कृताञ्जलिः॥15॥**

पाप मातेने केले जे न रुचे मज येथुनी ।

वनदुर्गस्थ रामास वन्दतो हात जोडुनी ॥15॥

**राममेवाभिगच्छामि स राजा द्विपदां वरः।**

**त्रयाणामपि लोकानां राघवो राज्यमर्हति ॥16॥**

नरश्रेष्ठ श्रीरामा अनुसरेन मी वनी ।

योग्य तो तिन्ही लोकांचे राज्य करण्या राघव ॥16॥

**तद्वाक्यं धर्मसंयुक्तं श्रुत्वा सर्वे सभासदः।**

**हर्षान्मुमुचुरश्रूणि रामे निहितचेतसः॥17॥**

धर्मयुक्त वचन त्याचे सभासद सर्व ऐकुनी।

हर्षे नेत्रातुनि रामा स्मरुनी अश्रु गाळती ॥17॥

**यसि त्वार्यं न शक्ष्यामि विनिवर्तयितुं वनात ।**

**वने तत्रैव वत्स्यामि यथार्यो लक्ष्मणस्तथा ॥18॥**

जर मी न श्रीरामा परतवीन वनातुनी ।

वनी मीहि राहीन जसा लक्ष्मण राहतो ॥18॥

**सर्वोपायं तु वर्तिष्ये विनिवर्तयितुं बलात ।**

**समक्षमार्यमिश्राणां साधूना गुणवर्तिनाम ॥19॥**

सर्व उपाय करीन श्रीरामा परतविण्या बळे ।

पूजनीय सभासदां समक्ष सांगतो असे ॥19॥

**विष्टिकान्तिका: सर्वे मार्गशोधकदक्षका:**

**प्रस्थापिता मया पूर्वं यात्रा च मम रोचते ॥20॥**

कुशल सेवकां सर्व मी मार्गशोधकांसह ।

पाठविले पूर्वीच यात्रा आवडणार मज ॥20॥

**एवमुक्त्वा तु धर्मात्मा भरतो भ्रातृवत्सल:।**

**समीपस्थमुवाचेदं सुमन्त्रं मन्त्रकोविदम् ॥21॥**

बोलून असे भरत भ्रातृवत्सल धर्मात्मा ।

जवळ बसलेल्या बोले मन्त्रवेत्त्या सुमन्त्रास॥21॥

**तूर्णमुत्थाय गच्छ त्वं सुमन्त्र मम शासनात ।**

**यात्रामाज्ञापय क्षिप्रं बलं चैव समानय ॥22॥**

शीघ्र उठुनी जाऊन सुमन्त्रा सांग सर्वांना ।

वनी निघण्या बोलाव सैन्यासहि तयांसवे ॥22॥

**एवमुक्तः सुमन्त्रस्तु भरतेन महात्मना ।**

**प्रहृष्टः सोऽदिशात सर्वं यथासंदिष्टमिष्टवत ॥23॥**

भरताने सांगता हर्षे सुमन्त्र सर्वां ऐकवी ।

महात्मा भरताने जो संदेश दिला असे ॥23॥

**ताः प्रहृष्टाः प्रकृतयो बलाध्यक्षा बलस्य च ।**

**श्रुत्वा यात्रां समाज्ञप्तां राघवस्य निवर्तने ॥24॥**

सेनापति प्रजाजन ऐकुनी भरत आणण्या ।

सेनेसह परत रामास जातो मुदित होत ते ॥24॥

**ततो योधाङ्गनाः सर्वा भर्तृन्‍ सर्वान्‍ गृहे गृहे ।**

**यात्रागमनमाज्ञाय त्वरयन्ति स्म हर्षिता ॥25॥**

योद्‍ध्यांच्या स्त्रिया सर्व आनंदे योध्यांस त्या।

त्वरे सज्ज होण्यास प्रेरित करू लागल्या ॥25॥

ते हयैर्गोरथैः शीघ्रं स्यन्दनैश्च मनोजवैः।

सह योषितद्बलाध्यक्षा बलं सर्वमचोदयन् ॥26॥

अश्व गोरथ सहित वेगवान सेना सज्ज।

स्त्रियांसह होण्यास आज्ञापिति सेनापती ॥26॥

सज्जं तु तद् बलं दृष्ट्वा भरतो गुरुसन्निधौ।

रथं मे त्वरयस्वेति सुमन्त्रं पार्श्वतोऽब्रवीत् ॥27॥

सेना सज्ज तशी पाहून सुमन्त्रा गुरुसमीप जो ।

वदे भरत रथ शीघ्र सज्ज करुनी आणसी ॥27॥

**भरतस्य तु तस्याज्ञां परिगृह्य प्रहर्षित:।**

**रथं गृहीत्वोपययौ युक्तं परमवाजिभि:॥28॥**

भरताज्ञा शिरोधार्य करी हर्षे सुमन्त्र तो ।

रथ घेउनिया येई अश्व उत्तम जोडुनी ॥28॥

**स राघव: सत्यधृति: प्रतापवान् ब्रुवन् सुयुक्तं दृढसत्यविक्रम:।**

**गुरुं महारण्यगतं यशस्विनं प्रसादयिष्यन् भरतोऽब्रवीत् तदा ॥29॥**

भरत सुदृढ तो सत्यपरायण यशस्वी ज्येष्ठ बन्धूस आणावयास ।

विशाल वनात जाउनि त्यास प्रस्न्न करण्यास्तव बोलतो असे ॥29॥

तूर्णं त्वमुत्थाय सुमन्त्र गच्छ बलस्य योगाय बलप्रधानान्।
आनेतुमिच्छामि हि तं वनस्थं प्रसाद्य रामं जगति हिताय ॥30॥

सेनापतींकडे शीघ्र जाउनि सज्ज होण्या वदे निघाया उदयीक सर्व।
श्रीराम कल्याणकारि जगास सर्व प्रसन्न त्या करुनी आणाया ॥30॥

स सूतपुत्रो भरतेन सम्यगाज्ञापित: सम्परिपूर्णकाम:।
शशास सर्वान् प्रकृतिप्रधानान् बलस्य मुख्यां च सुहृज्जानं च ॥31॥

भरताचि आज्ञा उत्तम मिळोनी सुमन्त्रा स्वमनोरथ पूर्ण वाटे।
प्रधान सर्व प्रजाजनी जे सेनापती सुहृद यां भरत आदेश सांगे ॥31॥

ततः समुत्थाय कुले कुले ते राजन्यवैश्या वृषलाश्च विप्राः।

अयूयुजन्नुष्ट्ररथान् खरांश्च नागान् हयाश्चैव कुलप्रसूतान् ॥32॥

ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र प्रत्येक घरी जोडावया लागति ।

अश्वा गजा गर्दभ उष्ट्र तैसे उत्तम रथ निघावयास्तव ॥32॥इत्यार्थे **श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्यऽयोध्याकाण्डे व्यशीतितमः सर्गः॥82**

# अयोध्याकाण्ड सर्ग 83

ततः समुत्थितः कल्यमास्थाय स्यन्दनोत्तरम् ।
प्रययौ भरतः शीघ्रं रामदर्शनकाम्यया ॥1॥

नन्तर प्रात:काळी आरूढ उत्तम रथी ।
श्रीरामदर्शन इच्छेने भरत शीघ्र निघे ॥1॥

**अग्रतः प्रययुस्तस्य सर्वे मन्त्रिपुरोहिताः।**

**अधिरुह्य हयैर्युक्तान् रथान् सूर्यरथोपमान् ॥2॥**

पुरोहित मन्त्री पुढती बसुनिया अश्वरथी ।

करती यात्रा तेजस्वी सूर्यरथासम भासती ॥2॥

**नवनागसहस्राणि कल्पितानि यथाविधि ।**

**अन्वयुर्भरतं यान्तमिक्ष्वाकुकुलनन्दनम् ॥3॥**

इक्ष्वाकुकुलनन्दन भरताच्या जाति मागुनी ।

अलंकृत विधिपूर्व नवसहस्र गजदळ ॥3॥

**षष्ठि रथसहस्राणि धन्विनो विविधायुधाः।**
**अन्वयुर्भरतं यान्तं राजपुत्रं यशस्विनम् ॥4॥**

यशस्वी राजपुत्राच्या मागे षष्ठि सहस्र रथ ।
बैसती आयुधांसह नाना योद्धे धनुर्धर ॥4॥

**शतं सहस्राण्यश्वानां समारूढानि राघवम् ।**
**अन्वयुर्भरतं यान्तं राजपुत्रं यशस्विनम् ॥ 5॥**

अश्वावरि लक्ष एक आरूढ योद्धे होउनी ।
अनुसरती भरता मागे रघुकुलनन्दना ॥5॥

**कैकेयी च सुमित्राच कौसल्या च यशस्विनी ।**

**रामानयनसंतुष्टा ययुर्यानेन भास्वता॥6॥**

रामागमने संतुष्ट कौसल्या यशस्विनी ।

सुमित्रा कैकयी येती तेजस्वी रथि बैसुनी ॥6॥

**प्रयाताश्चर्यसंघाता रामं द्रष्टुं सलक्ष्मणम् ।**

**तस्यैव च कथाश्चित्राः कुर्वाणा हृष्टमानसाः॥7॥**

ब्राह्मणांसह जन सर्व दर्शना रामलक्ष्मणा ।

आनंदे वार्ता करती यात्रा करता त्यांसवे ॥7॥

मेघश्यामं महाबाहुं स्थिरसत्त्वं दृढव्रतम् ।
कदा द्रक्षामहे रामं जगतः शोकनाशकम् ॥8॥

बोलती केव्हां दिसेल मेघश्याम महाबाहु ।
स्थितप्रज्ञ दृढव्रत रामा जगता शोकनाशक ॥8॥

दृष्ट एव हि नः शोकमपनेष्यति राघवः।
तमः सर्वस्य लोकस्य समुद्यन्निव भास्करः॥9॥

अन्धार होतसे दूर जगाचा सूर्योदये ।
तसा दर्शने रामाच्या शोक संताप आमचा ॥9॥

इत्येव कथयन्तसे सम्प्रहृष्टा: कथा: शुभा:।

परिष्वजानाश्चान्योअन्यं ययुर्नागरिकांस्तदा ॥10॥

गोष्टि करीता ऐशा आलिंगुनि परस्परा ।

नगरजन आनंदे यात्रा करति तेधवा ॥10॥

ये च तत्रापरे सर्वे सम्मता ये च नैगमा:।

रामं प्रतिययुर्हृष्टा: सर्वा: प्रकृतय: शुभा:॥11॥

सम्मानित नगरीत अन्य वैश्य प्रजाजन।

शुभ चिन्तिति ते हर्षे रामा मिळण्या प्रस्थित ॥11॥

मणीकाराश्च ये केचित कुम्भकाराश्च शोभना:।

सूत्रकर्मविशेषज्ञा ये च शस्त्रोपजीविन:॥12॥

मायूरका: क्राकचिका वेधका रोचकास्तथा ।

दन्तकारा: सुधाकारा: ये च गन्धोपजीविन:॥13॥

सुवर्णकारा: प्रख्यातास्तथा कम्बलकारक:।

स्नापकोष्णोदका वैद्या धूपका: शौण्डिकास्तथा ॥14॥

रजकास्तुन्नवायाश्च ग्रामघोषमहात्तरा:।

शैलूषाश्च सह स्त्रीभिर्यान्ति केवर्तकास्तथा॥15॥

**समाहिता वेदविदो ब्राह्मणा वृत्तसम्मता:।**

**गोरथैर्भरतं यान्तमनुजग्मु: सहस्रश:॥16॥**

चमकवती जे मण्यास कोणी कुम्भारहि उत्तम ।

सूत कातुनि विणती वस्त्रे अस्त्रे जे बनवती ॥12॥

मोरपिसे गुन्तवुनी कोणी बनविति वस्तू मोहक जे।

चन्दन जैसे काष्ठ कापती मणी मोत्यां करती छेद ॥13॥

हस्तिदन्त कारागिर तैसे बनविती सुगन्धि द्रव्ये जे ।

गन्धी तैसे सुवर्णकार उत्तम काम्बळ्या बनविणारे ॥14॥

धूपक वैद्य तसे धोबीही शिम्पी मद्यहि विकणारे ।
गाई राखति गोशालाही स्त्रियांसहित अभिनेते ते ॥15॥
नाविक तैसे सदाचाररत विद्वज्जन गोरथि बसुनी ।
भरतामागे निघती वनयात्रेस्तव उत्सुक रामा पहावया ॥16॥

भरताबरोबर प्रजाजनही रामास भेटण्यास व आणावयास जातात त्याचे वर्णन.
यादी मोठी आहे म्हणून वृत्त वेगळे वापरले आहे,

**सुवेषाः शुद्धवसनास्ताम्रमृष्टानुलेपिनः।**
**सर्वे ते विविधैर्यानै शनैर्भरतमन्वयुः ॥17॥**

घालुनी सुंदर वस्त्रे अंगास लेप सुंदर ।
बसुनी यानात सर्व भरतास अनुसरती ॥17॥

**प्रहृष्टमुदिता सेना सान्वयात् कैकयीसुतम् ।**
**भ्रातुरानयने यातं भरतं भ्रातृवत्सलम् ॥18॥**

सेना हर्ष आनंदे बन्धूस आणावया।
भ्रातृवत्सल भरताच्या जाती पाठीमागुनी ॥18॥

**ते गत्वा दूरमध्वानं रथयानाश्वकुञ्जरैः।**
**समासेदुस्ततो गङ्गां श्रृङ्गवेअरपुरं प्रति ॥19॥**

रथ अश्व गजा द्वारे मार्ग आक्रमता बहु ।
लोक ते गङ्गातीरे येती शृङ्गवेरपुरी ॥19॥

**यत्र रामसखा वीरो गुहो ज्ञातिगणैर्वृतः।**
**निवसत्यप्रमादेन देशं तं परिपालयन् ॥20॥**

गुह रामसखा जेथे राही बांधवासवे ।
सावध चित्ते देशाचे राही करित रक्षण॥20॥

**उपेत्य तीरं गङ्गायाश्चक्रवाकैरलंकृतम् ।**
**व्यवतिष्ठत सा सेना भरतस्यानुयायिनी॥21॥**

अलंकृत चक्रवाके गंगातीरी अवस्थित ।

सेना जी भरतामागे करी विश्राम त्यास्थळी ॥21॥

**निरीक्ष्यानुत्थितां सेनां तां च गङ्गां शिवोदकाम् ।**

**भरत: सचिवान् सनब्रवीत् वाक्यकोविद:॥22॥**

करुनी पुण्यसलिला भरत गंगादर्शन ।

सेना स्थापित होता बोले सचिवां वाक्पटु ॥22॥

**निवेशयत मे सैन्यमभिप्रायेण सर्वत:।**

**विश्रान्ता: प्रतरिष्याम: श्व इमां सागरङ्गगमाम् ॥23॥**

सैन्यास थांबवा त्यांच्या इच्छानुसार स्थळी।
विश्रामान्ति करू पार उद्या सागरगामिनी ॥23॥

**दातुं तु तावदिच्छामि स्वर्गस्तस्य महीपते:।**
**और्ध्वदेहनिमित्तार्थमवतीर्योदकं नदीम् ॥24॥**

स्वर्गस्थ महाराजांच्या कल्याणा पारलौकिक ।
गंगाजले तया देण्या जलाञ्जलि इच्छितो मी ॥24॥

**तस्यैव ब्रुवतोऽमात्यास्तथेत्युक्त्वा समाहिता:।**
**न्यवेशयंस्तांस्छन्देन स्वेन स्वेन पृथक पृथक ॥25॥**

ऐकुनिया त्याचे बोल मन्त्री तथास्तु वदती ।
सैनिकां इच्छेनुसार त्या त्या स्थानी धाडिले ॥25॥

**निवेश्य गङ्गामनु तां महानदीं चमुं विधानीः परिवर्हशोभिनीम् ।**
**उवास रामस्य तदा महात्मनो विचिन्तमानो भरतो निवर्तनम् ॥26॥**

छत्रचामरे सुशोभित सर्व सेनेस करूनि प्रस्थापित तटी महानदीच्या।
करीत विचार भरत महात्मा रामा परत आणण्याचा वास करी तिथे ॥26॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे त्र्यशीतितमः सर्गः॥83॥**

# अयोध्याकाण्ड सर्ग 84

ततो निविष्टां ध्वजिनीं गङ्गामन्वाश्रितां नदीम् ।

निषादराजो दृष्ट्वैव ज्ञातीन् स परितोऽ ब्रवीत ॥1॥

तेथे प्रस्थापित सेना भरताची गंगातिरी ।

पाहुनी निषादराज बान्धवा म्हणति आपुल्या ॥1॥

**महतीयमित: सेना सागराभा प्रदृष्यते ।**

**नास्यान्तमवगच्छामि मनसापि विचिन्तयम् ॥2॥**

बन्धुनो विशाल सेना अपार सागरापरी ।

विचार बहु करता मी याचा पार न लागतो ॥2॥

**यदा नु खलु दुर्बुद्धिर्भरत: स्वयमागत:।**

**स एष हि महाकाय: कोविदारध्वजो रथे ॥3॥**

येई भरत दुर्बुद्धि निश्चित या सेनेसवे ।

कोविदार ध्वजा चिन्ह त्याच्याच रथावरी ॥3॥

बन्धयिष्यति वा पाशैरथ वास्मान् वधिष्यति।

अनु दाशरथिं रामं पित्रा राज्यात विवासितम् ॥4॥

बद्ध पाशे करील आम्हा अथवा ठार मारिल ।

नंतर रामास मारील पिता वनी ज्या पाठवी ॥4॥

सम्पन्नां श्रियमन्विच्छंस्तस्य राज्ञः सुदुर्लभाम् ।

भरतः कैकयीपुत्रो हन्तुं समधिगच्छति ॥5॥

भरत कैकयीपुत्र राजलक्ष्मी सुदुर्लभ ।

एकट्या मिळविण्यास वधण्या रामास जातसे ॥5॥

**भर्ता चैव सखा चैव रामो दाशरथिर्मम ।**

**तस्यार्थकामाः संनद्धा गङ्गानूप्रऽत्र तिष्ठत ॥6॥**

स्वामी मम सखा राम अस्त्रशस्त्रे सुसज्जित ।

हितास्तव गंगातीरी त्याच्या उपस्थित रहा ॥6॥

**तिष्ठन्तु सर्वदाशाश्च गङ्गामन्वाश्रिता नदीम् ।**

**बलयुक्ता नदीरक्षा मांसमूलफलाशनाः॥7॥**

ससैन्य नाविक सर्व रहा गंगा तीरावरी ।

भक्षुनीया फलमूल नावेतिल रात्री रहा ॥7॥

नावां शतानां पञ्चानां कैवर्तानां शतं शतम् ।

संनद्धानां तथा यूनां तिष्ठन्त्वत्यभ्यचोदयत ॥8॥

पाचशे आपल्या नावा त्यावरी नाविकासह।

प्रत्येकी शत सैनिक सशस्त्र तयार रहा ॥8॥

यदि तुष्टस्तु भरतो रामस्येह भविष्यति ।

इयं स्वस्तिमती सेना गंगामद्य तरिष्यति ॥9॥

जर भरताचा स्नेह रामाप्रति दिसतसे ।

सकुशल त्याची सेना गंगापार करीतसे ॥9॥

इत्युक्तोपायनं गृह्य मत्स्यमांसमधूनि च ।
अभिचक्राम भरतं निषादाधिपतिर्गुहः॥10॥

गुह बोलुनिया ऐसे फले मधु कंदांसह ।
भेट देण्या घेउनिया भरताजवळ जातसे ॥10॥

तमायान्तं तु सम्प्रेक्ष्य सूतपुत्रः प्रतापवान् ।
भरतायाचचक्षेऽथ समयज्ञो विनीतवत् ॥11॥

पाहुनीया तया येता सूतपुत प्रतापि तो।
कर्तव्यदक्ष सुमन्त्र विनये भरता वदे ॥11॥

**एष ज्ञातिसहस्रेण स्थपतिः परिवारितः।**

**कुशलो दण्डकारण्ये वृद्धो भ्रातुश्च ते सखा ॥12॥**

**तस्मात पश्यतु काकुत्स्थं त्वा निषादाधिपो गुहः।**

**असंशयं विजानीते यत्र तौ रामलक्ष्मणौ ॥13॥**

निषादराज गुह हे ज्ञातिबांधवांच्या सवे ।

वृद्ध ते सखा रामाचे राहती दण्डकवनी ॥12॥

काकुत्स्था तरी भेटा त्यां ते जाणति निश्चित ।

रामलक्ष्मण कोठे संधि योग्य तयांस द्या ॥13॥

एतत तु वचनं श्रुत्वा सुमन्त्राद् भरत: शुभम् ।
उवाच वचनं शीघ्र: गुह: पश्यतु मामिति ॥14॥

भरत वदे ऐकोनी सुमन्त्र शुभवचना ।
शीघ्र गुहास भेटाया उत्सुक मी तसे करी ॥14॥

लब्ध्वानुज्ञां सम्प्रहृष्टो ज्ञातिभि: परिवारित:।
आगम्य भरतं प्रह्वो गुहो वचनमब्रवीतऽ ॥15॥

गुह अनुज्ञा मिळता आपल्या ज्ञातिबांधवां ।
घेउनी प्रसन्नचित्ते येत भरताशी वदे ॥15॥

**निष्कुटश्चैव देशोऽयं वञ्चिताश्चापि ते वयम् ।**

**निवेदयाम ते सर्वं स्वके दाशगृहे वस ॥16॥**

वाटिका जणु हा देश आपणा पूर्वकल्पना ।

नसता स्वागता मुकलो माना स्वगृह आपले ॥16॥

**अस्ति मूलफलं चैतन्निषादैः स्वमर्जितम्।**

**आर्द्रं शुष्कं तथा मांसं वन्यं चोच्चावचं तथा ॥17॥**

फलमूल आपणासाठी स्वत: निषाद आणती ।

आर्द्र शुष्क जरि काही अन्य वन्य पदार्थही ॥17॥

आशंसे स्वाशिता सेना वत्स्यत्येनां विभावरीम् ।
अर्चितो विविधैः कामैः श्वः ससैन्यो गमिष्यसि ॥18॥

रात्रीस इथे राहूनी सैन्यासह भोजना ।
मनोचाञ्छित वस्तु स्वीकारा सत्कारास्तव।
सैन्यासह करा गमन प्रभाती उद्या आपण ॥18॥


**इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे चतुरशीतितमः सर्गः॥84॥**

श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची इतर नऊ पुस्तकं.


यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा.








श्याम कुलकर्णी
तुझी माझी जोडी



हास्यरंगी रंगले
श्याम कुलकर्णी


श्याम कुलकर्णी
हसरी वारी
INSURANCE
STAMPING
VISA
IMMIGRATION

वाल्मिकीरामायण- ८





मराठी




श्याम कुलकर्णी




मराठी श्लोकानुवाद- श्री श्याम कुलकर्णी
॥ श्रीमदभगवदगीता ॥

लवकरच येत आहे.

श्री श्याम कुलकर्णी अनुवादित

मूळ वाल्मिकी रामायण मराठी श्लोकमय भाग आठवा

www.esahity.com